।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

मराठा विद्या प्रसारक समाजाचे

# श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, देवळाली कॅम्प, जि.नाशिक.

(नॅक पुर्नमूल्यांकन – अ )

# सारथ्य

‘आपत्ती व्यवस्थापन, गांधी विचार व स्त्री जीवनचिंतन विशेषांक’

वार्षिक नियतकालिक

## सन २०१९ - २०


संपादक
प्रा.दिलीप जाधव
(मराठी विभाग)

प्रकाशक
डॉ.विजय मेधणे
प्राचार्य

**✻ प्रकाशक व अध्यक्ष**
प्राचार्य, डॉ. विजय मेधणे
श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
देवळाली कॅम्प, नाशिक

**✻ प्रमुख संपादक**
प्राचार्य, डॉ. विजय मेधणे

**✻ प्रमुख कार्यकारी संपादक**
प्रा.दिलीप जाधव

**✻ संपादक मंडळ**
१) श्रीमती सविता आहेर
२) प्रा.एस.एस.मुरकुटे
३) प्रा. डॉ. स्वाती सिंग

**✻ मुखपृष्ठावरील छायाचित्र**
म.वि.प्र. समाज प्रिंटींग प्रेस, शिवाजीनगर,
गंगापूररोड, नाशिक

**✻ अक्षर जुळवणी, फोटो सेटींग, प्रिटींग व डिझायनिंग**
म.वि.प्र. समाज प्रिंटींग प्रेस, शिवाजीनगर,
गंगापूररोड, नाशिक

**✻ प्रकाशन स्थळ**
म.वि.प्र. समाजाचे,
श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
देवळाली कॅम्प, नाशिक

**वार्षिक नियतकालिक सन २०१९-२020**
दि प्रेस ॲन्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स नियम ८,
फॉर्म ४ प्रमाणे आवश्यक माहिती

**✻ प्रकाशनकाळ**
वार्षिक

**✻ राष्ट्रीयत्व:** भारतीय

**✻ मालकी:**
म.वि.प्र. समाजाचे,
श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
देवळाली कॅम्प, नाशिक

मी प्राचार्य, डॉ. मेधणे व्ही.जे. जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या समजूतीप्रमाणे बरोबर आहे.

**प्रकाशक**
**डॉ. विजय मेधणे**
**प्राचार्य,**
श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
देवळाली कॅम्प, नाशिक

सदर अंकात प्रसिध्द करण्यात आलेल्या साहित्यातील मताशी संस्था, महाविद्यालय,
संपादक मंडळ, मुद्रक वा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# भावपूर्ण श्रध्दांजली

सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षात
भारतातील  थोर नेते, शास्त्रज्ञ, जनप्रतिनिधी
साहित्यिक, विचारवंत, कलावंत, अर्थतज्ज्ञ,
समाजसेवक, कुशल व्यापारी, शिक्षणमहर्षी,
आणि संशोधक पंचतत्वात विलीन झाले.
त्यांना, तसेच देशरक्षणासाठी शहीद झालेल्या भारतीय
वीरजवानांना, जनसामान्यांच्या हीतासाठी
अविरत परिश्रम करताना,
सेवाव्रतात विसावलेल्या कर्मयोग्यांच्या,
आणि संस्थेशी, महाविद्यालयाशी संबंधित
ज्ञात-अज्ञात व्यक्तिंच्या
पुण्यस्मृतीस
भावपूर्ण
श्रध्दांजली.....



## महाविद्यालय विकास समिती (२०१७ ते २०२२)

| अ.नं. | नाव | पद |
|---|---|---|
| १) | श्री. कांतीभाई तेजुकाया | अध्यक्ष |
| २) | श्री. प्रवणकुमार तेजूकाया | सदस्य |
| ३) | श्रीमती अलका जीतेन सावला | सदस्य |
| ४) | श्री. सचिन पंडितराव पिंगळे | सदस्य |
| ५) | खा. हेमंत तुकाराम गोडसे | सदस्य |
| ६) | श्री. नामदेव शिवराम गोडसे | सदस्य |
| ७) | अॅड. श्री.एन. जी. गायकवाड | सदस्य |
| ८) | श्री. त्र्यंबकराव गबाजी गायकवाड | सदस्य |
| ९) | श्री. विलास हरीभाऊ धुर्जड | सदस्य |
| १०) | श्री. शंकरराव झुंबरराव धनवटे | सदस्य |
| ११) | श्री. शिवाजी संतू करंजकर | सदस्य |
| १२) | श्री. संजय पुंडलीक तुंगार | सदस्य |
| १३) | श्री. किशोर शशिकांत जाचक | सदस्य |
| १४) | श्री. दिपक मच्छिंद्र बलकवडे | सदस्य |
| १५) | श्री. पांडुरंग बाबुराव गायधनी | सदस्य |
| १६) | श्री. शांताराम धर्माजी ढोकणे | सदस्य |
| १७) | श्री. भरत तुकाराम गायकवाड | सदस्य |
| १८) | श्री. सुधाकर शिवराम गोडसे | सदस्य |
| १९) | श्री. अशोकराव काशिनाथ पा.मोगल | सदस्य |
| २०) | श्री. राजाराम धोंडीराम धनवटे | सदस्य |
| २१) | श्री. अरूण वामणराव जाधव | सदस्य |
| २२) | श्री. आबासाहेब रामचंद्र बोराडे | सदस्य |
| २३) | श्री. जगदिश दत्तात्रय गोडसे | सदस्य |
| २४) | डॉ. विजय जगन्नाथ मेधणे | सचिव |
| २५) | प्रा. दौलत श्रीपत शिंदे | शिक्षक प्रतिनिधी |
| २६) | प्रा. शशिकांत लक्ष्मण भोज | शिक्षक प्रतिनिधी |
| २७) | प्रा. शामराव मोतीराम जाधव | शिक्षक प्रतिनिधी |
| २८) | प्रा. अविनाश सुधाकर काळे | नॅक समन्वयक |
| २९) | श्री. रविंद्र निवृत्ती गोडसे | शिक्षकेतर प्रतिनिधी |

## शालेय समिती (२०१७ ते २०२२)

| अ.नं. | नाव | पद |
|---|---|---|
| १) | मा. श्री.कांतीभाई तेजुकाया | अध्यक्ष |
| २) | श्री. सदाशिव देवराम धुर्जड | सदस्य |
| ३) | श्री. रघुनाथ वाळुजी बरकले | सदस्य |
| ४) | श्री. सुभाष भिकाजी खालकर | सदस्य |
| ५) | श्री. बाबुराव निवृत्ती मोजाड | सदस्य |
| ६) | श्री. अंबादास जिवराम आडके | सदस्य |
| ७) | श्री. गोदीराम नामदेव जाचक | सदस्य |
| ८) | श्री. सुरेश दशरथ टिळे | सदस्य |
| ९) | श्री. रविंद्र कैलास धुर्जड | सदस्य |
| १०) | श्री. ज्ञानेश्वर पांडुरंग पाळदे | सदस्य |
| ११) | श्री. दिनकरराव मुरलीधर पाळदे | सदस्य |
| १२) | श्री. सुरेश परशराम कदम | सदस्य |
| १३) | श्री. संजय बाळासाहेब गोडसे | सदस्य |
| १४) | श्री. सुभाष किसन शिंदे | सदस्य |
| १५) | श्री. सुभाष त्र्यंबक चौधरी | सदस्य |
| १६) | श्री. शिवाजी कारभारी हांडोरे | सदस्य |
| १७) | श्री. गणपत आप्पाजी कोठुळे | सदस्य |
| १८) | श्री. रविंद्र सुगंध | सदस्य |
| १९) | श्री. महाराज बिरमाणी | सदस्य |
| २०) | श्री. मंगेश नामदेव शिंदोडे | सदस्य |
| २१) | श्री. प्रशांत हुकमतराव गोवर्धने | सदस्य |
| २२) | श्री. चंद्रकांत रामकृष्ण गोडसे | सदस्य |
| २३) | श्री. युवराज राजाराम गोडसे | सदस्य |
| २४) | डॉ. विजय जगन्नाथ मेधणे | सचिव |
| २५) | प्रा. चंद्रकांत शिवराम संधान | शिक्षक प्रतिनिधी |
| २६) | श्री. मुकुंद पोपटराव रायते | शिक्षकेतर प्रतिनिधी |

# Student Council- 2019-20

| Sr. | Post | Name of Member | Class |
|---|---|---|---|
| 1) | U.R. | Palde Nilam Govind | T.Y.B.A. |
| 2) | Class Representative | Porje Ankita Sanjay<br>Kedar Mayuri Dipak<br>Nisal Rutuja Ashok<br>Bothe Shubhangi Subhash<br>Godse Harshada Bhart<br>Porje Ashwini Arjun<br>Palde Nilam Govind<br>Dhanrajini Bhagyshree Narayndas<br>Shaikh Abuzhar Ashpak | F.Y.B.A.<br>F.Y.B.Com.<br>F.Y.B.Sc.<br>S.Y.B.A.<br>S.Y.B.Com.<br>S.Y.B.Sc.<br>T.Y.B.A.<br>T.Y.B.Com.<br>T.Y.B.Sc. |
| 3) | N.S.S. Representative | Shinde Suraj Prakash | T.Y.B.A. |
| 4) | N.C.C. Representative | Gawande Aniket Ambadas | S.Y.B.A. |
| 5) | Sports Representative | Bhavale Shivani Bhurav | T.Y.B.A. |
| 6) | Culture Representative | Berad Gaurav Shkharam | F.Y.B.Sc. |
| 7) | Ladies Representative | Palde Mansi Kailas | S.Y.B.Com. |
| 8) | Ladies Representative | Gaikwad Jayshree Dashrath | T.Y.B.A. |

Mr. S.S.Kawale
S.W.O.

**Dr. V.J.Medhane**
Principal

## प्राचार्यांचे मनोगत .....

सस्नेह नमस्कार,

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक नियतकालिक 'सारथ्य' चा अंक आपल्या हाती देताना व प्रकाशित करताना मला विशेष आनंद होत आहे. शिक्षण हे चैतन्यरुपी विचार आणि कृती परिवर्तनाचे साधन आहे. मानवाची प्रगती आणि सांस्कृतिक बदल शिक्षणाने झाला आहे. माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी योग्य करते ते शिक्षण होय. काळानुसार परिवर्तन ध्येय डोळ्यासमोर ठेवून मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय परिस्थिती, प्रसंग आणि युगाला सामोरे जाण्याकरीता विविध शैक्षणिक आणि व्यक्तिमत्व विकासाचे निर्णायक प्रयत्न करत आहे. या प्रयत्नांचे प्रतिबिंब 'सारथ्य' अंकांमध्ये उमटले आहे. सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञान आणि यंत्र संस्कृतीच्या पलीकडे गेले आहे. ज्ञानाला महत्त्व येऊन बौद्धिक संपदा हे मूल्यात्मक प्रमाण राष्ट्राच्या दर्जाचे मुल्यमापन परिमाण दिसत आहे. भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये हेच ज्ञानात्मक संवेदन आवश्यक असून ज्ञानात्मक नेतृत्वाची व काळाला सामोरे जाणारी अशी पिढी घडवण्याचा खारीचा वाटा आम्ही उचलत आहोत.

या शैक्षणिक वर्षांमध्ये महाविद्यालयाने तरुण विद्यार्थ्यांच्या भावभावना, सुप्त कला गुणांना,कला कौशल्य आणि शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबरच विविध कौशल्य यांच्या विकासावर भर देऊन वाङ्मय मंडळ, कलामंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा विभाग, विज्ञान मंडळ, वाणिज्य मंडळ, समाजशास्त्र मंडळ, निर्भय कन्या अभियान, व्यक्तिमत्व विकास, सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट, महिला सबलीकरण, कमवा आणि शिका व विद्यार्थी कल्याण मंडळ इत्यादींच्या अंतर्गत अनेक तज्ज्ञ मार्गदर्शकांची व्याख्याने आयोजित करून विद्यार्थी मनाची वैचारिक भूमी विकसित करून आत्मविश्वास निर्माण करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत केला आहे. आजचे स्पर्धात्मक युग लक्षात घेऊन व्यवसायाभिमुख व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र कार्यरत आहे. विविध उद्योग क्षेत्रात नोकरी भरतीची शिबिरे महाविद्यालयात आयोजित करून नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. शैक्षणिक सुविधा परिपूर्ण हेतूने वरील मजल्याचे बांधकाम पूर्ण करून आधुनिक, अद्यावत वर्ग व प्रयोगशाळा स्थापन केल्या आहेत.

विद्यार्थी केंद्रबिंदू मानून कामकाज केले जाते. महाविद्यालयातील विद्यार्थी हा ग्रामीण आणि शहरी असा मिश्र आहे. अनेक मुले दुर्गम भागातून येतात, त्यांना घरी जाण्यासाठी बराच वेळ लागतो त्यात मुलींची संख्या जास्त आहे. हे लक्षात घेऊन योग्य व सकस आहार मिळवा म्हणून अती अल्प दरात पुरी भाजी केंद्र सुरू केले आहे. तरुण हा राष्ट्राचा कणा आहे त्याला भौतिक व नैसर्गिक ज्ञान येणे आवश्यक आहे. या उद्देशाने पर्यावरण, सामाजिक, राजकीय, राष्ट्रीय प्रश्न यानिमित्ताने लक्ष वेधण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. वर्षभरात

परिसरातील विविध गावांना वृक्षारोपण करून पर्यावरणाची गांभीर्याने दखल घेतली आहे. या प्रयत्नांची सरकार दरबारी दखल घेऊन आमच्या महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे. परिसरातील नागरिकांनी त्यांच्या या कामकाजाचे कौतुक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय मेधणे यांना लहवित, ता.जि.नाशिक येथील छत्रपती शिवाजी महाराज समाज मंडळाच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज समाजभूषण पुरस्कार' प्रदान केला आहे. सांस्कृतिक उपक्रमांना चालना देऊन कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न महाविद्यालयाने केला असून त्याचे फलीत सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाचा म.वि.प्र. युवा स्पंदन जिल्हा स्तरीय पुरस्कार पटकावला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजीत राज्यस्तरीय लोककला स्पर्धा सन २०१९-२०चे प्रथम पारितोषिक आम्ही मिळविले आहे. या शै. वर्षाच्या अंतिम टप्प्यात कोरोना संसर्गजन्य महाभयंकर महामारीने जग हादरले होते. अशा अटीतटीच्या काळात आम्ही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून ऑनलाइन पद्धतीने अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. तसेच हा अंक पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने आपले लेख पाठवून महाविद्यालयाचा संस्कार जतन केला आहे. कोरोनाच्या काळात महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकी जतन करून , गरजू आणि आवश्यक लोकांना अन्न, औषध पुरवणे असे महत्त्वाचे काम केले आहे. हे सर्व काम करण्यासाठी महाविद्यालयाला संस्थेच्या सरचिटणीस आदरणीय श्रीमती नीलिमाताई पवार, अध्यक्ष डॉ. तुषार शेवाळे, सर्व पदाधिकारी आणि पालक संचालक मा. सचिन दादा पिंगळे, संचालक मंडळ, महाविद्यालयाचे देणगीदार मा. कांतीभाई तेजुकाया, सभासद, हितचिंतक व आजी-माजी विद्यार्थी या सर्वांचे अतिशय प्रेमपूर्वक असे सहकार्य लाभले. इमारत बांधकामाच्या वेळी परिसरातील नागरिकांनी मोलाचे अर्थसहाय्य करून महाविद्यालयाच्या विकासात भर घातली आहे. त्याकामी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचेही मोलाचे सहकार्य लाभले आहे. त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

धन्यवाद!

**डॉ. विजय मेधणे**
प्राचार्य

## संपादकीय .....

'सारथ्य' नियतकालिकाचा अंक संपादित करताना मला मनस्वी समाधान वाटतो. याचे कारण असे राष्ट्रीय नेतृत्वात भावी लेखक, विचारवंत, तत्त्वचिंतक, साहित्यिक, घडण्याची प्रक्रिया महाविद्यालयीन स्तरावर घडून येऊन, तरुणांची सर्वांगीण दृष्टी विकसित होत असते. सृष्टी , समष्टी आणि मानव यांचा जिज्ञासू ज्ञानसंगम हा उच्च शिक्षणातून होत असतो. व्यक्तिची द्विस्तरीय दृष्टी व्यापक होऊन कार्यकारणभाव मीमांसाचा शोध घेण्यापर्यंत मानसिक तयारी होत असते. उच्च शिक्षणाबद्दल थोर विचारवंत स्वामी विवेकानंदांचे विचार खरोखर विचार करायला लावणारे वाटतात. ते म्हणतात, शिक्षणाचा मूळ हेतू माणूस घडविणे हाच आहे. अद्वैताप्रमाणे मन, शरीर आणि आत्मा यांचा सुसंवादी विकास म्हणजे मनुष्याचे मनुष्यपण घडणे होय. त्यांच्या मते माणसात असलेल्या परिपूर्णतेचे प्रकटीकरण म्हणजे शिक्षण होय. ही परिपूर्णता विद्यार्थ्याला प्रकट करण्याच्या उद्देशाने एक मुक्त चिंतनाचे सारथ्यरूपी व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. समकालीन स्तरावर जीवन मूल्य, सांस्कृतिक मूल्य आणि विज्ञान मूल्ये यांची सांगड घालण्याचा प्रयत्न महाविद्यालय पाठ्यपुस्तका पलीकडे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना जीवनाकडे एक तटस्थ नजरेने न्याहाळण्याची उत्तेजना देत आहे.

या प्रेरणेने तरुण मनातली क्षमता विकसित होऊन, व्यक्तीमत्व, भाषिक कौशल्य विकास व आत्मपरीक्षण कौशल्यांचा विकास मुलांमध्ये घडत असतो. उदारमतवाद , उदात्तदृष्टी, समस्यांची व मूल्यांची सखोल जाणीव वाढते. सभोवतालच्या जीवन व्यवस्थेकडे एक तटस्थ नजरेने पाहण्याची क्षमता विकसित होते. हा अंक वाचल्यानंतर या सर्व तत्वांचा अनुभव आपल्याला येतो. आधुनिक काळात मूल्यात्मक जबाबदारी आजचा तरुण घेऊ शकेल याची शाश्वती येते. सध्याच्या काळाकडे लक्ष दिले असता, काळ कूस बदलत आहे. जग प्रगतीकडे जात असताना वर्चस्ववाद आणि विस्तारवाद यांच्या भोवऱ्यात अडकल्याचे दिसत आहे. यातून विश्वात्मक संघर्षाची शक्यता निर्माण झाली आहे. भारतासारख्या विकसनशील राष्ट्राला या सर्व घडामोडी परवडणाऱ्या नाही. याकरता क्षमा, शांती, दया, प्रेम, अहिंसा, मातृभूमीचा अभिमान, त्याग; अंतर्गत निर्माण होणाऱ्या नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्ती त्याचप्रमाणे महिलांची असुरक्षितता या विषयांची जाणीव तरुण भावी पिढीला व्हावी म्हणुन 'महात्मा गांधी: एक विचार', 'आपत्ती व्यवस्थापन' आणि 'स्त्री जीवनचिंतन' यासारखे विषय विद्यार्थ्यांना चिंतनासाठी दिले होते. महाविद्यालय आयोजित श्रीमती विमलाबेन खिमजी तेजूकाया विद्यापीठ स्तरीय निबंध स्पर्धेसाठी हेच प्रस्ताव ठेवण्यात आले होते. सध्या नैसर्गिक आपत्ती व मानवनिर्मित आपत्ती आणि मूल्यात्मक आपत्ती यांचा उच्छाद निसर्गनिर्मित आपत्ती आणि मानवनिर्मित आपत्ती या निर्माण होण्याच्या कारणांचा वेध घेतला असता असे लक्षात येते की, इथे मूल्यात्मक आपत्ती येऊन घसरण झाल्यानेच या प्रश्नांना कोंब फुटताहेत सर्वांची संवेदना भावी पिढीला

व्हावी ही अपेक्षा ठेवून असे विषय देण्यात आले होते कोरोनासारख्या संसर्गजन्य महामारीच्या काळात विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने आपले लेख लिहून आपली मत धाडसाने मांडल्याचे दिसते. खरोखर याचे कौतुक करावे तितके थोडेच. कविता व निबंध त्यांचे अवलोकन केले असता संवेदनशीलता सखोल झाली आहे. मांडणीतील तरलपणा आणि कल्पकता विकसित होण्याची प्रवृत्ती कशी उपयुक्त ठरत आहे याची अनुभूती आपल्याला येते. लेख अभ्यासल्या नंतर तरुण मनातील मते निश्चित थक्क करून आपल्याला प्रश्नांकित करतात. नवतरुणांची सृजनात्मक सृजनशीलता, प्रतिभा, कल्पनाशक्ती, चिंतनशीलता विकसित होत असल्याचा एक सुखद धक्का आपल्याला बसतो. भारतीय समाज एक उदार मतवादी आणि चारित्र्य संपन्न राष्ट्र उभारणीच्या उत्क्रांत परिस्थितीतून जात असल्याचा अनुभव आल्याने समाधान वाटते खरंच माणूस घडण्याची प्रक्रिया इथे घडतांना दिसते. अंक आपण वाचल्यानंतर याचा अनुभव आपणास देखील येणारच आहे. अंक संपादित करत असताना महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. विजय मेधणे, सर्व उपप्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालयाचे शाखा व सत्र प्रमुख, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी वृंद व मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे मुद्रणालय इ. कर्मचारी सर्वांचे अतिशय जिव्हाळ्याचे सहकार्य लाभले. मी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो व ऋण व्यक्त करतो.

धन्यवाद!

संपादक

**प्रा. दिलीप जाधव**

***

# अनुक्रमणिका



| क्र. | लेख-शीर्षक | लेखक / लेखिका |
|---|---|---|
| १) | आपत्तीकालीन उपक्रम | प्रियंका शिरसाठ, एस.वाय.बी.ए. |
| २) | मी मुलगी नसलेली बरी | माधुरी झाडे,एम.ए. |
| ३) | आपत्ती व्यवस्थापन | पल्लवी सुर्यवंशी, एस.वाय.बी.ए. |
| ४) | आपत्तीला जबाबदार कोण? | दिपाली हरळे, एस.वाय.बी.ए. |
| ५) | महात्मा गांधी व त्यांचे विचार | माया साळुंखे, एस.वाय.बी.ए. |
| ६) | आपत्तीचे प्रकार | गायत्री भोर, एस.वाय.बी.कॉम. |
| ७) | आपत्तीकालीन प्रतिबंधात्मक उपाय | शुभम गावडे, एफ.वाय.बी.कॉम. |
| ८) | आपत्ती व्यवस्थापन व जनजागृती | मोनिका पोरजे, एफ.वाय.बी.कॉम. |
| ९) | आपत्ती व्यवस्थापन स्वरूप | गौरी सुर्यवंशी, एफ.वाय.बी.कॉम. |
| १०) | आपत्ती व्यवस्थापन आणि लोकसहभाग | सुषमा आढाव,एफ.वाय.बी.कॉम. |
| ११) | नैसर्गिक आपत्तीचे प्रकार | स्नेहा वाघ,एफ.वाय.बी.कॉम. |
| १२) | नैसर्गिक आपत्ती | शितोष्णा जाधव, एफ.वाय.बी.कॉम. |
| १३) | आपत्ती व्यवस्थापन पूर्वतयारी | अर्चन चाटे, एफ.वाय.बी.कॉम. |
| १४) | मुलींचे शिक्षण प्रगतीचे लक्षण | निशा शेटे, एफ.वाय.बी.कॉम. |
| १५) | स्त्रीभृणहत्तेबाबत समाज जागृती गरजेची | धृती गिते, टी.वाय.बी.ए. |
| १६) | स्त्री म्हणजे नेमके काय? | लक्ष्मण गोडसे, एस.वाय.बी.एस्सी. |
| १७) | निसर्ग एक महान गुरू | पवन महाजन,एफ.वाय.बी.ए. |
| १८) | स्त्री भृणहत्या एक ज्वलंत समस्या | काजल काशिद, एफ.वाय.बी.एस्सी. |
| १९) | म.गांधी एक विचार | करिश्मा मन्सुरी, टी.वाय.बी.ए. |
| २०) | मानवतेचे पाईक म.गांधी | पुजा बिरारी, टी.वाय.बी.कॉम. |
| २१) | म.गांधी एक विचार | संगिता दौंड, एम.ए. भाग-१ |
| २२) | जलप्रलय : समस्या व निराकरण | श्रीमती आशा पाटील, इंग्रजी विभाग |
| २३) | Women Empowerment Making The world a better place | Vishakha Jaras, T.Y.B.A. |

| | | |
|---|---|---|
| २४) | Window to the world | Suraj Shinde, T.Y.B.A. |
| २५) | राजनिति में नैतिकता | सोनी रामपुरे, टी.वाय.बी.ए. |
| २६) | गांधीजी का जीवनसत्य | जयेश साळवे, एफ.वाय.बी.कॉम. |
| २७) | म.गांधी : एक विचार | काजल शिरसाठ, एफ.वाय.बी.ए. |
| २८) | म.गांधी : एक विचार | शिवानी जैन, टी.वाय.बी.ए. |
| २९) | म.गांधी : एक विचार | निलम पाळदे, टी.वाय.बी.ए. |
| ३०) | राजनिति में नैतिकता | जयश्री चौधरी, एफ.वाय.बी.ए. |


***

## पद्य विभाग


| क्र. | शीर्षक | लेखक / लेखिका |
|---|---|---|
| १) | मुलगी वाचवा | निलम पाळदे, टी.वाय.बी.ए. |
| २) | निसर्गाचे रूप | अंकीता पोरजे, एफ.वाय.बी.ए. |
| ३) | बेटी | कांचन पांडे, एफ.वाय.बी.कॉम. |
| ४) | गोदावरी | मयुरी केदार, एफ.वाय.बी.कॉम. |
| ५) | आई | शुभांगी बोथे, एस.वाय.बी.ए. |
| ६) | मैत्री | हर्षदा गोडसे, एस.वाय.बी.कॉम. |
| ७) | आई (संकलीत) | आश्विनी पोरजे, एस.वाय.बी.एस्सी. |
| ८) | मैत्री म्हटली की... | कांचन पांडे, एफ.वाय.बी.कॉम. |
| ९) | मेरी कहाणी | अनिकेत गावंडे,एस.वाय.बी.ए. |
| १०) | गुरूपोर्णिमा | कांचन पांडे, एफ.वाय.बी.कॉम. |


***

# आपत्तीकालीन उपक्रम

**प्रियंका शिरसाठ**
(एस.वाय.बी.ए., इतिहास विभाग)

**प्रस्तावना:**

२०साव्या शतकाच्या अखेरीज मोठ्या शहरांच्या वैशिष्ट्यांमध्ये मोठ्या प्रमाणात विशेष बदल अनुभवास येत आहे. हे बदल भुगर्भाच्या रचनेमध्ये झालेल्या बदलांमुळे निर्माण झाले असावेत त्यामुळे भूकंप, त्सुनामी, पुरसदृश्य परिस्थिती, थंड वादळी वारे, भुस्सखलन आणि दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तीने विक्राळ रूप धारण केले आहे. जी आज जागतिक समस्या बनली आहे.

नागरी क्षेत्र हे अनेकविध कारणांमुळे सतत मोठ्या संकटात असते आज शहरे धोकादायक स्थितीत आहे. उदा मागील २१ वर्षांमध्ये पुरामुळे हानाची शक्यता ही पाच पटीने बदललेली असून ही समस्या नागरी वस्तीमधील वाढती लोकसंख्या आणि सामाजिक संरचना यामुळे निर्माण झाली आहे. नैसर्गिक आपत्तीस लढा देण्यासाठी एकत्रित आपत्ती जोखीम व्यवस्थापन कार्यक्रम राबविणे हा एकमेव कार्यक्षम मार्ग अवलंबणे आवश्यक आहे. नैसर्गिक आपत्ती थांबवण्यासाठी आपल्याला लोकसंख्या आटोक्यात आणणे गरजेचे आहे. नंतर जंगलतोड थांबवावी निसर्गाला मानवाकडून कोणतीही हानी होऊ द्यायची नाही याचे भान ठेवायला हवे.

**आपत्ती म्हणजे काय?**

आपत्ती म्हणजे अशी घटना की ज्यामुळे प्रभावित परिसरातील जनहिताची, मालमत्तेची मोठ्या प्रमाणावर हानी होते व स्थानिक जनता या परिस्थितीचा मुकाबला करण्यास असमर्थ असते काही आपत्ती धीमपणाने येत असतात तर काही आपत्ती अचानक येत असतात. धीमपणाने येणाऱ्या आपत्तीमध्ये पूर व दुष्काळांचा समावेश आहे. यांचा परिणाम लगेच दिसून येत नाही व लोकांना स्वत:चा बचाव करण्यास वेळ मिळतो. अचानक येणाऱ्या आपत्ती कोणतीही पुर्वसूचना न देता उद्‌भवतात व यामुळे अधिक नुकसान संभवते यांमध्ये भूकंप, त्सुनामी अशा आपत्तींचा समावेश होतो.

**नैसर्गिक आपत्ती:** पृथ्वीवरील अथवा भूगर्भातील विविध नैसर्गिक हालचाली, घडामोडींमुळे उद्‌भवणाऱ्या आपत्तींना नैसर्गिक आपत्ती म्हणतात. उदा. भूकंप, पुर, चक्रीवादळ, दुष्काळ, त्सुनामी, ज्वालामुखी, वीज कोसळणे इ.

**हवामानशास्त्रीय आपत्ती**

**हिमवादळे :** खुप कमी तापमान, तीव्र वारे आणि प्रचंड प्रमाणातील हिमपात स्वभावात्मक लक्षणांनी युक्त अशा तीव्र स्वरूपाचा हिवाळी वादळांना हिम वादळे म्हणतात. हिमवादळे आणि हिमवादळी यातील मुख्य भेद म्हणजे बर्फाची तीव्रता हिमवादळे म्हणवले जाण्याकरीता हिमवर्षातील वादळाचा वेग ३५ ताशी मैल वा त्याहुन अधिक असणे दृश्यमानता १/४ मैलापर्यंत कमी होणे आणि ३ व अधिक तासांपर्यंत चालू राहणे ही लक्षणे दिसून यावी लागतात. ताज्या हिमपातापेक्षा आधीच झालेल्या हिमपाता घुसळून काढण्याकरता जमिनीवरील हिमवादळांत वेगवान वारे असावे लागतात. हिमवादळात स्थानिक आर्थिक व्यवहारांवर नकारात्मक प्रभाव पडत असतो आणि हिमपात क्वचित होणाऱ्या भागांत त्यामुळे दृश्यमानता नाहीशी होऊ शकते.

**भुपृष्ठीय जलीय आपत्ती**

**पुर** : पुर म्हणजे जलाशय भरून बाहेर वाहणारे पाणी त्यामुळे आसपासची जमीन बुडून जाते पुराचे युरोपीयन व्याख्या अशी आहे की, सामान्यत: पाण्याखाली नसलेल्या जमिनीचे तात्पुरते पाण्यात बुडून जाणे प्रवाही पाण्याच्या परिभाषेत लाटेच्या अंर्तप्रवाहासही पुर असे संबोधता येईल. भरून वाहणाऱ्या अनिर्बंध होणाऱ्या जलाशयांमुळे पुरस्थिती निर्माण होऊ शकते तलाव अथवा जलाशयाचा आकार, ऋतुनुसार होणाऱ्या पर्जन्यमान व बर्फ वितळण्यातील बदलामुळे बदलु शकतात तरीही जोपर्यंत बाहेर पडणारे पाणी मानवाच्या वापरातील खेडे, शहर किंवा इतर व्याप्त क्षेत्रास धोका निर्माण करत नाही, शहर किंवा इतर व्याप्त क्षेत्रास धोका निर्माण करत नाही तोवर तो पूर म्हणून फारसा महत्त्वाचा नसतो.

**भूकंप:** भूकंप म्हणजे अंतर्गत भुस्तर आपापसात आदळुन पृथ्वीच्या पृष्ठभागाचे अचानक हादरणे स्पंदनांचे परिणाम बदलु शकते भूकंपाचा भूमिगत मूळ बिंदू केंद्र म्हणून ओळखला जातो. केंद्राच्या थेट वर पृथ्वीच्या पृष्ठभागावरचा बिंदु प्राप्तकेंद्र म्हणुन ओळखला जातो. प्रत्यक्ष भूकंपामुळे उद्‌भवणाऱ्या दुय्यम घटना जशा की, इमारतीचे कोसळणे, आग लावणे, त्सुनामी येणे आणि ज्वालामुखी भडकणे ह्याच प्रत्यक्षात मनुष्याकरता आपत्ती इतर असता यापैकी बऱ्याच घटना बहुदा चांगले बांधकाम सुरक्षा प्रणाली, पुर्वसूचना आणि आपत्काली व स्थलांतराचे नियोजन यांच्याआधारे टाळता येते भुपृष्ठीत फटीतुन आढळलेल्या ऊर्जेचे विमोचन झाल्याने भूकंप घडून येतो भुकंपामुळे मानवहानी खूप होती.

***

## नारी

नारी तू नारायणी
उमजले ना कधी मनी
तमा बाळगू नको मनी
नारी तू नारायणी ।।१।।
अबला-सबला लेबल
तूच जननी
तूच स्वार हो सबल..
तूच मनोमनी
आव्हान पेलून आकाश
कवेत घेऊ
आपण मिळून सर्वजणी
यशाचे निनाद घूमती लेणोलेणी
तूच तू शिल्पकार जनी
नारी तू नारायणी ।।२।।
मागायचे ते माग आता मनोमनी
कुटुंब, समाजाला तूच उद्धारी
स्वत:ला पारखून घेऊ सर्वजणी
ज्योत ज्ञानाची लावू तिमिरातूनी
नारी तू नारायणी ।।३।।
समाज परिवर्तन धनुष्य पेलू धनुर्धारिणी
स्वातंत्र्य व स्वैराचार भेद जाणू साऱ्याजणी
संकल्पपूर्तीचा पाया रचू मनोमनी
कर्तृत्व व मातृत्वाचा सन्मान हिरकणी
नारी तू नारायणी ।।४।।

**- प्रा. श्रीमती पाटील आशा विश्राम**
(ज्युनिअर कॉलेज, इंग्रजी विभाग)

# मी मुलगी नसलेली बरी !

- झाडे माधुरी राजेंद्र
(एम.कॉम. १)

सकाळी सकाळी वर्तमानपत्र उघडले की, महिलांना जाळल्याच्या, कौटुंबिक हिंसाचाराच्या, छेडछाडीच्या, विनयभंगाच्या, बलात्काराच्या घटना सर्रास वाचायला मिळतात. म्हणजेच परस्त्रीला मातेसमान मानणाऱ्या छत्रपतींच्या राज्यात आज स्त्रीवर इतके अन्याय होत आहे, ही चिंतेची बाब आहे. भारताला स्वतंत्र होऊन ७१ वर्षे झाले असले तरीही भारतातील स्त्री खरचं स्वतंत्र दिसते का? असा प्रश्न मनात घर करून बसला आहे. संस्कृतमध्ये एक वचन आहे, ''यत्र नार्यस्तु पुज्यते, रमन्ते तत्र देवता'' अर्थात जिथे स्त्रीचा आदर केला जातो तिथेच देवाचा वास असतो असे म्हटले जाते.

पुरातन काळापासून स्त्रीला अनन्यसाधारण महत्त्व दिले जाते. आज स्त्री पुरूषाइतकीच आघाडीवर आहे. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय अशा अनेक क्षेत्रांत ती पुरूषाच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे. स्वत:च्या कष्टाने, कर्तृत्वाने अन् आपल्या बुद्धीमत्तेच्या जोरावर तिने समाजात स्थान कमावले आहे.

ज्या समाजात, ज्या देशात स्त्री ही स्वंतत्र आणि विचाराने मुक्त असते. तोच समाज किंवा देश सुसंस्कृत समजावा असे समाजसुधारक आगरकर यांनी म्हटले आहे. एका बाजूने बघितले तर २१व्या शतकात स्त्रियांना स्वातंत्र्य आहे. त्या घराबाहेर पडतात, शिकतात, नोकरी करून चार पैसेही कमावतात. मोठमोठे उद्योग व्यवसायही चालवितात. हे असे आशावादी चित्र दिसते. पण या चित्राची दुसरी बाजू मात्र काळीकुट्ट आणि मन विषण्ण करणारी आहे.

जननी, जन्मदात्री अशा विविध उपमा देऊन तिचा गौरव केला जातो. मग तिलाच पुन्हा घराघरातून ते समाजापर्यंत सर्वांकडूनच कलंक, ओझे म्हणून स्वीकारले जाते. खऱ्या अर्थाने अगदी सुरूवातीपासून ते आजपर्यंत पाहिले असता स्त्रीला मान दिला जातो का? ती खरचं स्वतंत्र आहे का? आजच्या घडीला या प्रश्नाचे उत्तर नाही हेच असू शकते.

घरापासून ते समाजाचा उद्धार करणाऱ्या मातेला तोच समाज उपभोगाची वस्तू म्हणून पाहतो. मग त्यातूनच देशात दर ७८ मिनिटांनी एक हुंडाबळी जातो. दर ५९ मिनिटांनी एका महिलेवर लैंगिक अत्याचार होतो. दर ३४ मिनिटाला बलात्काराचे प्रकरण घडते. तसेच शारीरिक अत्याचार, हिंसा, स्त्री-भ्रूण हत्या, प्रेम प्रकरणातून ॲसिड हल्ला आणि खून, अपहरण, फसवणूक या सर्वातुन स्त्रीला जावे लागते आहे. मग समाज काय म्हणेल? या भितीपोटी तिला एकच पर्याय उरतो, तो म्हणजे आपले जीवन संपविण्याचा! म्हणजेच,

*''या देवी सर्व भूतेषू मातृ रूपेण संस्थिता*
*नमस्तस्यै, नमस्तस्यै, नमस्तस्यै, नमो नम:''*

असे म्हणून देवीची पूजा करणाऱ्या समाजात देवीरूपी स्त्रीची विटंबना होऊ लागली आहे. शेवटी अशा समाजातून आपली सुटका करण्यासाठी ती स्वखुशीने मरण पत्करते. मग या स्त्रीची अशी दुरावस्था करणाऱ्या या समाजात मुलगी म्हणून जन्माला येऊन तरी काय उपयोग? ज्याचे सार्थक हे मरणानेच होणार. म्हणूनच निर्घृण वृत्ती असलेल्या या समाजात मी मुलगी म्हणून नसलेली बरी असा विचार मन विषन्न करायला लागते.

अगदी जन्माला येण्यापासून ते जन्माला आल्यानंतरही मुलींवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला जणू काही उधाणच आलेले दिसते. मुलगा हा वंशाचा

दिवा असतो म्हणून या दिव्याची ज्योत पेटविण्यासाठी वंशाचीच ज्योत कायमची विझविली जाते याचे कारण काय? ती परक्याचे धन असते म्हणून की तिच्या लग्नासाठी बक्कळ पैसा लागतो म्हणून? म्हणजेच वंशाला दिवा मिळणार या वासनेपोटी मुलीचा जन्म नाकारला जातो. पण त्यांना हे लक्षात येत नाही की याच दिव्याला ज्योत नसली तर घरात प्रकाश तरी कसा पडणार?

मुलगीच पुढे मोठी होऊन दोन घरांचा उद्धार करते. हे या रूढी परंपरांमध्ये अडकलेल्या समाजाला समजतच नाही. या कारणामुळेच महिलांचे प्रमाण दर १००० पुरूषांमध्ये फक्त ८६९ इतकेच आहे. हे असेच घडत गेले तर वंशवाढीसाठीसुद्धा मुली मिळू शकणार नाही. स्त्रीभृणहत्या इतकी गंभीर समस्या झाली आहे की, उच्च शिक्षित आणि सधन वर्गामध्येही याचे प्रमाण वाढलेले आहे.

मुलगी म्हणून जन्माला यांचे की नाही हा निर्णयही समाजच करतो आणि चुकून ती जन्माला आली तरीही तिच्यावर बंधनांचा डोंगर सोपविला जातो. मुलींना स्वातंत्र्य असता कामा नये हा जुना जपलेला दुष्ट समज वेगवेगळे अवतार घेऊन समाजात वावरत असतो. पण या साऱ्या नियम-बंधनांच्या कल्पनेतून मुलांना मात्र मुक्त केले जाते. मग आम्ही मुलींच्या जातीनेच समाजाचे काय वाईट केलेले असते. हेच समजत नाही. यातूनच पुढे जाऊन स्त्री-पुरूष आणि मुलगा-मुलगी या भेदभावाला सुरूवात होते.

मुलींनी हे करावं ते करू नये तसेच त्यांनी असं वागावं तसं वागू नये अशा बंधनांचा पगडा मुलींच्या माथी लावला जातो. पहिली मुलगी झाली तर ती आनंदाने स्वीकारली जाते. पण दुसऱ्या वेळीही मुलगी झाली तर नाक मुरडले जाते. मग मुलगा होण्यासाठी विविध चाचण्या, दवापाणी, बुवाबाजी परिणामी पुरूषांच्या शारीरिक अत्याचारही तिलाच सहन करावा लागतो. एवढे करूनही वंशाला दिवा मिळणार नाही म्हणून तिलाच दोष दिला जातो. मुलाला जन्म देण्यासाठी ती अशक्त असली तरीही सशक्त होऊन तिला या युद्धावर मात करावीच लागते.

अशी सर्व प्रकारचे संकटे झेलण्यापेक्षा या भूतलावर कशासाठी आणि कुणासाठी जन्माला यावे असा प्रश्न पडतो. त्यापेक्षा हा स्त्रीजन्मच मला नकोनकोसा वाटू लागतो.

पूर्वीपासून स्त्रीयांवर अनेक बंधने आणि मर्यादा लादल्या जातात 'चूल आणि मूल' यापर्यंतच त्या स्त्रीयांचे जीवन सिमित होते. सती प्रथा, बालविवाह, केशवपन यांसारख्या अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले. ज्या काळात स्त्रियांना शिक्षण देणे गैर मानले जायचे त्याच काळात सावित्रीबाई फुले आणि ज्योतिबा फुले यांनी शिक्षणाचे दार खुले करून दिले. त्याचाच परिणाम म्हणून देशातील पहिली महिला डॉक्टर होण्याचा मन आनंदीबाई जोशी यांना मिळाला नंतर हळूहळू महिला सुशिक्षित बनून आपल्या हक्कांप्रती जागृत होऊन ते मिळविण्यासाठी लढल्या. त्यांच्या या अथक प्रयत्नांमुळेच कुठेतरी आज स्त्रीला पुरूषांच्या बरोबरीने हक्क आणि अधिकार मिळाले आहेत. आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचारांविरूद्ध स्त्रीया लढत आहेत.

जिजाईंनी रयतेचा छत्रपती घडविला, तर राणी लक्ष्मीबाईंनी  इंग्रजांना पाणी प्यायला लावले. कल्पना चावला या मुलीनेच सर्वप्रथम अंतराळात झेप घेतली. लता मंगेशकर, प्रतिभाताई पाटील, पी.टी.उषा यांसारख्या मुलींनीच देशाचे नाव मोठे केले. म्हणजेच आज सर्वच क्षेत्रात या नको असलेल्या मुलीच प्रगती करीत आहेत. म्हणूनच मला म्हणावेसे वाटते,

*''आयुष्यरूपी घरामधुनी*
*ती जीवनाचे गूढ जाणते,*

*जगते, जगविते, प्रत्येक नाते जपते*
*म्हणून तिला स्त्री म्हटले जाते.''*

अशाप्रकारे मुलींची प्रगती तंत्रज्ञानासारखी झपाट्याने वाढत आहे. मग मनाला पुन्हा मुलीचा जन्म किती छान असो. असे वाटू लागते. पण याच मनाला पुढे जाऊन प्रगती करणाऱ्या मुलींवर होणाऱ्या हिंसेचे आणि बलात्काराचे चित्र दिसते. तेव्हा पुन्हा मनाचा निर्णय बदलतो आणि मन म्हणते, मी मुलगी नसलेलीच ठिक आहे. त्यातच माझे हित दडलेले मला दिसू लागते.

समाजात डोकाऊन पाहिले असता, अगदी दोन-तीन वर्षांच्या मुलीपासून ते नोकरी करणाऱ्या विशेष म्हणजे विवाहित असणाऱ्या स्त्रियांवर अत्याचार होत आहे. निर्भया, हैद्राबाद, कोपर्डी प्रकरणाची नुसती आठवण केली तरी अंगावर शहारे येतात. पूर्वी संतांनी म्हटले होते, परस्त्री ही मातेसमान असते. पण आज आई, मुलगी, बहिण तर कुणाची सुन कुणीही असो तिला उपभोगाचीच वस्तू म्हणून पाहिले जाते. तिच्याकडे डोळे वटारून बघणाऱ्या नराधमांच्या नजरा अगदी एखादी शिकार शोधावी त्या पद्धतीने टपून बसलेले असतात.

जगातील अशी कोणतीही स्त्री नाही ती रस्त्यावरील गलिच्छ नजरांना आणि भाषेला तोंड देत नसेल. महाराष्ट्र हा तर महिला अत्याचारामध्ये देशात तिसऱ्या क्रमांकावर आहे. स्त्रीवर अन्याय करणे, सामुहिक बलात्कार करणे, बलात्कार करतानाचे व्हिडीओ काढणे, पोर्नोग्राफी पाहणे, अल्पवयीन मुलींवर अत्याचार करणे, अशा एक ना अनेक पुरूषांकडून होणाऱ्या अत्याचाराला आम्हा स्त्रियांनाच सामोरे जावे लागते. त्या मुलीही कुणाची आई, बहिणी, पत्नी असते. याची या नराधमांना जराही कल्पना येत नाही. फक्त आपली शरीरभोगाची वासना हे पूर्ण करतात. पण त्यात मुलीच भरडल्या जातात. मग माध्यमांना आपल्या टी.आर.पी.साठी एक चांगला मार्ग सापडतो. पण बळी पडलेल्या त्या मुलीचे काय? याचा साधा विचारही कुणी करत नाही.

न्याय मिळवितांना सुद्धा कोर्टापुढे पुन्हा पुन्हा शाब्दिक बलात्काराला त्यांना सामोरे जावे लागते. समाज माध्यमांवरही तिला एक भोगवस्तू म्हणून पेश केले जाते. भांडवली बाजार चालविण्यासाठी स्त्री देहाचे मार्केटींग केले जाते. यापासून मुलींना वाचविण्यासाठी निर्भया कायदा झाला तरीही अजून स्त्रिया या अन्यायाच्या जाळ्यात अडकून असुरक्षित झाल्या आहेत. म्हणजेच याचाच अर्थ असा कही, कायदे करूनही स्त्रिया सुरक्षित नाही.

*''मदतीचा हात पुढे करणारे असतील कमी*
*अन् पाय खेचणारेच मिळतील जास्त,*
*त्यांचे मनसुबे ते ठेचून काढायला हवे*
*कुणाच्या साथीने अथवा एकटीने*
*आता तू पुढे व्हायला हवे. ''*

असे म्हणूनही प्रत्यक्ष साथ देणारे कमीच भेटतात नुसतं आवाजाला वाचा फोडून, मेणबत्या पेटवून उपयोग नाही. कारण आजही निर्भयाच्या नराधमांच्या फाशीच्या तारखा या पुढेच ढकलतांना दिसतात. मग यावरून कुठे मिळतोय आम्हाला न्याय? कायदे, न्याय या सर्व गोष्टी व्यर्थ जाऊन वाईट कृत्य करणारे राक्षसीरूप नराधम मात्र आज गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत मोकाट होऊन फिरतात आणि मुलींना मात्र चार भिंतीच्या आतच आपले जीवन व्यतीत करावे लागते. या अन्यायांवर आम्हाला समाजात न्याय मिळत नसेल तर जन्माला येऊन तरी न्याय कोणाकडे मागणार. असा प्रश्न मला पडतो.

आज २१व्या शतकातही मुलींना मंदिरात, मशिदीत प्रवेश नाकारला जातो. विटाळाने ती अपवित्र होते म्हणून प्रवेश नाकारून तिला पावित्र्याच्या परीक्षांनाही सामोरे जावे लागते. यासाठी शबरीमाला ते शनि शिंगणापूर असा प्रवासही परिणामी करावा लागतो. त्यासाठी न्यायालयाचे दरवाजे स्त्रियांना ठोठवावे लागतात.

समाजातच नाहीतर कुटुंबातही मुलगा-मुलगी भेदाभेद दिसतो. मुलींना खेळायला बाहुली आणि भांडे तर मुलांना गाडी आणि बंदूक दिली जाते. मुलगा कट्ट्यावर बसून टिंगलटवाळ्या करीत असला तरीही त्यालाच मुलींपेक्षा उच्च दर्जाचे शिक्षण दिले जाते. कारण मुलगा म्हणजे तांब्याचे भांडे आणि मुलगी म्हणजे काचेचे भांडे असा त्यांचा समज असतो. मुलींचीही काही स्वप्ने असतात. पण ती स्वप्नेही त्यांच्याकडून हिरावून घेतात.

तू शिकून काय करणार आहे, जा कामं कर घरातली तसेच किती झालं तरी तो मुलगा आहे आणि तू मुलीची जात आहे. अशा प्रकारचे उद्‌गार समाजाकडून ऐकायला मिळतात. आई-वडीलांसाठी मुलगा-मुलगी दोन्ही समान असतात, तर मुलांना का मर्यादा नसतात? मुलींनीच का बंधनांच्या बांगड्या घालून मिरावायचे?

एवढेच नाही तर लग्नाच्या बाजारातही मुलींच्या गुणांचे महत्त्व कमी आणि पगार किती, हेच विचारले जाते. कारण पगार जास्त असेल तर पुरूषी अहंकार दुखतो म्हणे या पुरूष जातीचा स्त्रीला स्वातंत्र्य आहे असे समजले तर लग्नांतरही तिला नवऱ्याच्या नावाची गरज का पडावी? असे मला वाटते. तिच्यात दोष आढळला तर घटस्फोट दिला जातो. बायको मेली तर नवरा महिन्यातच दुसरे लग्न करतो मात्र नवरा मेल्यावर बायकोने दुसऱ्या लग्नाचाही विचार करू नये, हा विरोधाभास नाही का? कारण ती एक स्त्री असते म्हणूनच ना!

स्त्रीलाही काही भावना आहेत. मन आहे स्वत:चे विचार आहे तिचे स्वत्व आहे याचा विचार कधी कुणी करतच नाही उत्तर न देणारी, सतत सहन करणारी, शांत राहणारी, सुसंस्कारी असते आरि हिंसेला विरोध करणारी, प्रश्न विचारणारी वाईट असते. अशा प्रकारची मानसिकता समाजामध्ये दिसून येते.

खऱ्या अर्थाने पाहिले असता अशी ही स्त्री नेहमी सोसत राहते. कधी तिचा संसार वाचविण्यासाठी तर कधी मुलांच्या भविष्यासाठी, कधी घरच्यांचा मान वाचविण्यासाठी, कधी समाज काय म्हणेल याच विचाराने ती गप्प राहते. पण तिला काय वाटते हे कधीच कुणी विचारत नाही आणि समजूनही घेत नाही.

बाळला जन्म दिल्यानंतर आईमार्फत त्याला अन्नपुरवठा करणारी नाळ कापली जाते. परंतु मुलगी जेव्हा जन्म घेते, तेव्हाच तिची नाळ ही समाजाशी बांधली जाते. नंतर रूढी-परंपरेच्या नावाखाली तिचे शोषण केले जाते. यातुनच अन्याय, अत्याचार, बलात्कार परिणामी स्व:ची हत्याही या मुलगी म्हणून जन्माला आलेल्या स्त्री देहाला करावे लागते ही मोठी शोकांतिका आहे.

कायदे करण्यापेक्षा तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन अंशत: जरी बदलला तर मुलगी म्हणून स्त्री स्वातंत्र्याने बागडेल आणि सर्व बंधनांतून मुक्त होईल. यातूनच देशातील प्रत्येक मुलगी खऱ्या अर्थाने गर्वाने 'मी मुलगी असल्याचा गर्व आहे' असे ताठ मानेने म्हणू शकेल. परंतु देशाला लागलेली ही नराधमांची कीड अशीच वाढत राहिली तर मग अन्याय सहन करण्यापेक्षा मी मुलगी नसलेलीच बरी हाच विर सतत माझ्या मनता घिरट्या घालू लागतो.

*''ना संपणार तुझे अस्तित्व*
*ना तू विरळ होणार*
*तुझवाचून हे विश्व आपुले*
*किती काळ टिकणार''.*

***

# आपत्ती व्यवस्थापन

विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धा
तृतीय क्रमांक

- सुर्यवंशी पल्लवी हाशिराम
(एस.वाय.बी.ए.)

सुरूवातीला मदतकार्य सुरू केल्यापासूनची खंत व्यक्त करते की, आम्ही सगळे सवंगडी खऱ्या अर्थाने गरजूपर्यंत पोहचू शकलो नाही. आता खरे गरजू म्हणजे तरी कोण? माझ्या मते खरे गरजू म्हणजे जे आपत्ती व्यवस्थापनासारख्या पुरग्रस्त गरजे ते, जे या आपत्तीमधून स्वत:च्या कुटुंबाला मदतीशिवाय वाचवू शकत नाही. असे पुरग्रस्त खरेच गावात असतात का? तर ते नक्की असतात तर मग थेट त्यांच्यापर्यंत का पोहचू शकत नाही? आम्ही गेलो ते पण शासनाच्या माध्यमातून.

आम्ही गेलो होतो ते मघाशी म्हटल्याप्रमाणे शासकीय यंत्रणेच्या आधारे गरजूपर्यंत पोहचण्यासाठी का कमी पडलो? गरजूपर्यंत पोहचण्यासाठी कमी पडलो. आमची १५ ते १६ सवंगडी आधी ब्रह्मनाळ या गावाला भेट दिली आणि नंतर अंकली या दोन्ही गावचा प्रमुख नागरिक म्हणजे सरपंच यांच्याशी चर्चा करून बीडीओ मॅडमकडून थेट ग्रामसेवक किंवा गावचा प्रमुख नागरिक म्हणजे सरपंच यांच्याशी चर्चा केली. त्यांच्यावरून असे वाटले की, या झालेल्या आपत्तीत झालेल्या नुकसानावरून जाणवले की, गरिबांसाठी मदतकार्य हे पोहचू देत नाही. यावरून असे ठरवले की, कुठलीही आपत्ती सांगून येत नसते, पण ती कोणकोणत्या कारणाने येऊ शकते. याचा विचार करून ती येऊ नये, असा प्रयत्न आपण नक्कीच करू शकतो.

भारताच्या भूमीवर माझा जन्म झाला. याचा मला सार्थ अभिमान आहे. आपल्या देशाला जगात भारतमाता म्हणून गौरवले जाते. मी या भारतमातेच्या संस्कृतीत लहानचे मोठी झाले आहे. माझ्या हातून काहीही वाईट कृत्य घडणार नाही आणि जिथे काही वाईट घडत असेल तर ते सुधारण्यासाठी मी पोहोचन, असा कयास मी मनाशी बांधलेला आहे. मातृभूमीने मला खूप काही दिले आहे.

'आपत्ती व्यवस्थापन' ही काही नवीन संकल्पना नाही. ज्या-ज्या वेळी देश घडला, त्या-त्या वेळी स्वराज्याचे स्वप्न पाहिले गेले. स्वातंत्र्यसंग्राम घडला आणि देशाला संकटांमधून बाहेर काढण्यात आले, त्या त्या वेळी आपत्ती व्यवस्थापन हा घटक अत्यंत महत्त्वाचा ठरला. छत्रपती शिवाजी महाराज लढायला जायचे, तेव्हाही आपत्ती व्यवस्थापनाने मोलाची भूमिका बजावली. त्यामुळे मी त्यांचाच एक अंश म्हणून काम करत आहे. या क्षेत्रात मी नवखे अथवा जगावेगळे काहीही केलेले नाही. आपण कोणत्याही गोष्टीचे पेटंट घेऊ नये. या मताची मी आहे. निसर्ग आपल्याला घडवत असतो.

जीवनमुक्ती सेवा संस्था १९९९ मध्ये सुरू झाली. बेवारस मृतदेहांवर अत्यंविधी करण्याचे काम सुरू केले. मी वाचत असतांना लक्षात आले की, वीर सावरकरांचे बंधूही त्या काळात अनोळखी लोकांच्या मृतदेहांचे अत्यंसंस्कार करत असत. कोणतेही काम करत असतांना कायम माणूसकीचा अंश आपल्यात जागा असला पाहिजे.

मी कामातून घडत गेली, त्यामुळे कामाला महत्त्व देते. काही दिवसांपूर्वी जसा पावसाचा तडाखा बसला, त्यापेक्षाही कित्येक पटींनी कोकणातील वैभववाडीला पावसाने झोडपले होते. २३ जुलै २००३ हा तो दिवस. अचानक दरड कोसळली आणि रेल्वे अडकली.

'आपत्ती व्यवस्थापन' हा विषय भारतात आला कसा? इतिहास माहित नसेल तर या विषयाची कल्पना येणार नाही. भारतात कोणतीही आपत्ती आल्याशिवाय 'आपत्ती व्यवस्थापन' होत नाही. परदेशी लोकांकडून ही संकल्पना भारतात आली. आशियाई प्रगत राष्ट्रांमध्ये पल्स पोलिओची साथ आली. रोटरी इंटरनॅशनलने याबाबत काम केले. खऱ्या अर्थाने आपत्ती व्यवस्थापन गुजरातमधील भूकंपानंतर भारतात आले. भारतात पूर, भूकंप अशा घटना घडल्या की, त्यातून मार्ग कसा काढायचा, असा प्रश्न नेहमीच उभा राहतो. यातून आपत्ती व्यवस्थापनातून मार्ग काढता येतो. भारताच्या पूर्वोत्तर भागात युनायटेड नेशन डेव्हलपमेंट अंतर्गत काम सुरू झाले. आसाम, बिहार या ठिकाणी काम सुरू झाले. २००५ साली आपत्ती व्यवस्थापन महाराष्ट्रात आले. त्या दृष्टीने यंत्रणा उभी राहिली. २५ जानेवारी २००५ मध्ये साताऱ्यात चेंगराचेंगरी झाली. मांढरादेवी घटनेनंतर भारतात पहिल्यांदा आपत्ती व्यवस्थापनाचा कठोर आयोग नेमा गेला. पोनकुंडलमध्ये १०७ मुले होरपळली, त्यानंतर शालेय आपत्ती व्यवस्थापन आले. महाड दुर्घटना घडल्यानंतर सर्व पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले.

आपण मूर्खाच्या देशात राहतो. आपल्याकडे कोणत्याही यंत्रणेची, व्यवस्थेची देखभाल दुरूस्ती वेळच्या वेळी आणि गांभिर्याने केली जात नाही. एखादी घटना, दुर्घटना घडली की, मृताच्या नातेवाईकांना ५ लाख रूपये देतात आणि नातेवाईक खुश होतात. आपल्याकडे जिवाचे काही मोल राहिलेले नाही. दुर्घटनाच घडू नयेत म्हणून काळजी घेतली जात नाही. थोडक्यात काय, तर आपत्ती व्यवस्थापन गांभिर्याने घेतले जात नाही.

पूर्वीच्या काळी ग्रामव्यवस्था बळकट होती. चावडी, मंदिरे, सर्व व्यवस्था चांगली होती. एखाद्या गावात तंटा उद्‌भवला तरी तो जिथल्या तिथे सोडवला जात असे. भांडण कधीही गावाच्या वेशीबाहेर जात नसे. हाही एक आपत्ती व्यवस्थापनाचा प्रकार होता. रस्ते, विहिरी यांची वेळच्या वेळी सफाई होत असे. आता ग्रामव्यवस्थेत हा फरक पडला? माणुसकीची साद घालण्याची वेळी वेळ का आली? माणूसकीचा जन्म प्रत्येक मनात होत नाही, तोवर ही परिस्थिती सुधारणार नाही. ग्रामीण भागात एखादी घटना घडली तर शहराकडे मदतीची याचना केली जाते.

एखाद्या गोठ्याला आग लागली आणि अग्निशमन गाडी २० किलोमीटर अंतरावरून येणार असेल तर तोपर्यंत आग रौद्ररूप धारण करू शकते. याउलट दुसरी मदत मिळेपर्यंत गावकऱ्यांनी आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केल्यास मोठे नुकसान टाळता येऊ शकते. यालाही आपण आपत्ती व्यवस्थापन म्हणू शकतो. तलाव, नदी, हायवे, आपत्तीप्रवण क्षेत्र, पूर्वी येऊन गेलेल्या आपत्ती, लोकसंख्या यांच्या आधारे नियोजनबद्ध प्रशिक्षण दिले जावू लागले. अशाने शासनाची यंत्रणा पोहोचण्याआधीच आपत्ती निवारणाचे कार्य सामान्य लोक हाती घेऊ शकतात.

काही आपत्ती व्यवस्थापन मानवनिर्मित तर काही निसर्गनिर्मित असतात. आपत्ती कोणत्या प्रकारची आहे, यावर त्याचे निवारण आणि व्यवस्थापन ठरते.

आपत्ती व्यवस्थापनाचे धडे घेतांना आपल्या परिसराबद्दल, देशाबद्दल आधी आत्मीयता वाटणे गरजेचे आहे. १५ ऑगस्ट, २६ जानेवारीला झेंडावंदन करायचे, जय हिंद म्हणायचे, जिलेबी खायची आणि मग सुट्टीचा आनंद घ्यायचा म्हणजे देशप्रेम नव्हे. कारगिल दिवस साजरा करणे हेही देशप्रेम नाही. देशप्रेम आपल्या रक्तात भिनले पाहिजे. मी सिग्नल तोडणार नाही. आजूबाजूच्या कोणाशीही वाईट वागणार नाही, नियमांचे उल्लंघन करणार नाही आणि होऊही देणार नाही असा निश्चय करून त्याप्रमाणे वागणे म्हणजे देशप्रेम. देशप्रेम एका दिवसात जागृत होत नसते, त्यासाठी शालेय वयापासूनच संस्कार व्हावे लागतात.

भारत हा सर्वात तरूण देश म्हटला जातो. २०४५ ला देश सर्वाधिक वृद्धांचा देश असेल. आतापासूनच योग्य दिशेने प्रगती केली नाही. देशाचे रक्षण केले नाही तर पुढील पिढी आपल्याला कधीच माफ करणार नाही. देशात कोणाला कशाची भिती उरलेली नाही. स्वातंत्र्य केवळ कागदापुरते उरलेले आहे. माणुसकी लोप पावत चाललेली आहे. देशाला आपत्तीतून बाहेर काढण्यासाठी एकजुटीची गरज असते. ही एकजुट माणुसकीतूनच होऊ शकते.

'साद माणुसकीची' हे मोठे अभियान राबवत असतांना या कार्यक्रमाच्या निमित्ताने हरिश बुटले या खुळ्या माणसाने त्यांच्यासारख्याच कामाच्या ध्येयाने पछाडलेल्या वेड्या लोकांना एकत्र आणले आहे, याचे कौतुक वाटते. मला या उपक्रमात सहभागी होण्याचे भाग्य लाभले. याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे. कोणत्याही आपत्तीसाठी तीन टप्पे फार महत्त्वाचे असतात. आपत्ती येण्यापूर्वीचे नियोजन, त्यात साधनांचा आढावा, धोक्याची स्थळे, गट तज्ज्ञ उपलब्धता लोकांमध्ये जागरूकता अशा अनेक बाबींचा समावेश असतो. आपत्तीवेळी कसा प्रतिसाद असला पाहिजे याचेही शास्त्र असते. आपत्तीनंतर झालेल्या हानीचा आढावा, त्यावर नुकसानभरपाई, पंचनामे असे बरेच काही काम प्रशासनाला करावे लागते. आपत्ती ही पाच-दहा वर्षातून एकदा तरी येत असते. पण आपत्तीला तोंड देण्याची तयारी मात्र बारा महिने करावी लागत असते. मानसिक, शारीरिक तयारी ही दैनंदिन शाखांच्या माध्यमांतून कार्यपद्धतीतूनच विकसित होत असते. यंत्रणा अंगातच भिनलेली असली की, आपत्तीच्या वेळी आपोआप नियोजनबद्ध काम केले जाते. कार्यकर्त्यांचा विकास त्याच दृष्टीने झालेला असतो आणि कामाचा विचारही विविध माध्यमांतून केला जातो. सर्वांना बरोबर घेऊन काम करण्याची सवय लागते. कोणीतरी काम सांगणार आणि मग ते काम कोणीतरी करणार अशी पद्धत येत नाही.

मानवाने स्वत:च्या गरजेसाठी, सुखसोयींसाठी विविध मार्ग शोधून आपले राहणीमान अधिक समृद्ध करण्यासाठी निरनिराळे प्रयोग व उपाययोजना करण्याचा निश्चय मनाशी बांधला. जगभरातील अनेक राष्ट्रांत मानवाच्या मूलभूत गरजा सारख्याच असतात. पण या

गरजा भागवतांना मानवाने निसर्गनिर्मित गोष्टींचा बेसुमार वापर करण्यास सुरूवात केली. निसर्गाच्या मती-मदतीशिवाय मानव आपल्यातील अपुरेपण पूर्ण करू शकत नाही. हे ही सिद्ध होऊ लागले. नैसर्गिक आपत्तीत येणारी संकटेही प्रचंड प्रमाणात येऊ लागली. त्यावेळी उद्‌भवणाऱ्या अनेक समस्यांना तोंड देण्यासाठी माणसाला आपत्ती व्यवस्थापनाची गरज आता भासू लागली. भूकंप, त्सुनामी, चक्रीवादळे, ढगफुटी, नद्यांना आलेले पूर, अतिवृष्टी, दुष्काळ यांसारख्या आपत्तीनंतर माणसाला अनेक गोष्टींना सामोरे जावे लागते, आग लावणे, संप-टाळेबंदी, बॉम्बस्फोट, युद्ध, अपघात, दहशतवाद यांसारख्या मानवाने स्वत:च्या इच्छेसाठी, हट्टासाठी, मागणी पूर्ण करून घेण्यासाठी अनेक मानवनिर्मित संकटे ओढवून घेतली जातात.

निसर्गनिर्मित काही आपत्ती या कुठल्याही पूर्वसुचनेशिवाय उद्‌भवतात. आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण महाविद्यालये, कार्यालये, शाळा यातून दिले जाते.कृत्रिम प्रसंग निर्माण करून हे प्रशिक्षण देतात. पण अशा प्रसंगी वापरावयाच्या वस्तूंचा सराव असायला हवा. काही साधने अशी जतन करावी. याची माहिती असायला हवी. काही वेळेस प्रात्यक्षिके चित्रे, पोस्टर्स, पथनाट्य, भित्तीचित्र, जाहिरातीचे फलक यातून जनजागृती करायला हवी. जिल्हा, तालुका, ग्रामपातळीवर यासाठी विविध गट करून त्यांना मार्गदर्शन करायला हवे. वृद्ध, बालके, स्त्रिया यांना कशाप्रकारे वाचवायचे याचे ज्ञान प्रशिक्षणातून मिळतो. सध्याच्या परिस्थितीत रस्त्यावर होणारे अपघात, घाटात होणारे अपघात, आजूबाजूच्या व्यक्तीला मदतीसाठी जाणारे लोक थोडे व व्हिडीओ काढणारे जास्त याचे प्रमाण वाढलेले दिसते. अशा वेळी आपण लोकांना या आपत्ती व्यवस्थापनाच्या कमी शिक्षणात पडतो का असे वाटते.

आपण निसर्ग ओरबाडतोय, नष्ट करतोय आपली विध्वंसक प्रवृत्ती वाढली आहे. त्याला निसर्गही उत्तरे देऊ लागला आहे. आपत्ती आपल्यामुळे उद्‌भवू नये असे वाटत असेल तर निसर्गाचे रूप आपणच जोपासले पाहिजे. त्याला विद्रुप करण्याचा प्रयत्न होऊ लागला, लागताच तो त्याचे अक्राळविक्राळ रूप दाखवतो तेव्हा मात्र मानव हतबल होतो, हे जाणवू लागलयं. अशा प्रकारे पर्यावरणीय आपत्तीमुळे बहुतेकवेळा प्राणहानी, वित्तहानी आणि संपदाहानी यासारखे अनर्थ घडतात. पर्यावरणीय आपत्ती ही अनाकलनीय व प्रक्षोभक घटना असल्याने काही वेळा पृथ्वीवर मोठ्या प्रमाणात प्रलय घडून येतात हे आपत्ती प्रय-प्रलये, मुद्रावरण, जलावरण यांच्या माध्यमातून घडत असतात. अचानक उद्‌भवणाऱ्या आपत्ती माणसाला थांबिवता येत नाहीत.

***

# आपत्तीला जबाबदार कोण?

- हरळे दिपाली रामदास
(एस.वाय.बी.ए.)

आपत्ती म्हणजे ''अचानक अपघात किंवा नैसर्गिक घटना ज्यामुळे मोठी हानी किंवा जिविताचे नुकसान होते. आपत्ती ही घटनांची मालिका आहे. आपत्ती हा शब्द उच्चारला की आपल्या डोळ्यासमोर विध्वंसक, जीवित हानी आणि विस्कटलेले जनजीवन यामुळे मालमत्तांचे नुकसान, पायाभुत सुविधा, पर्यावरण, आवश्यक सेवा किंवा उपजिवीकेची हानी होते. जगभरात आपत्तीमुळे आर्थिक विकास, विकासाचे सातत्य धोक्यात येते. गेल्या २० वर्षांपासून भुकंप, पुर, त्सुनामी, उष्ण कटिबंधीय वादळ आणि इतर आपत्तींमध्येस सुमारे ३० लाख लोक मृत्युमुखी पडले. जखमी दुखापत झालेल्या, आजार/रोग झालेल्या बेघरपणा यामुळे सुमारे १ अब्जच्या वर लोकांचे नुकसान झाले आहे आणि यामुळे लाखो रूपयांचे नुकसान झाले आहे. आपत्ती मानवी प्रयत्नांची आणि गुंतवणूकीची दशके नष्ट करतात, यामुळे पूननिर्माण आणि पुर्नवसनाची समाजापुढे गरज भासते.

सभोवतालचा परिसर म्हणजे पर्यावरण होय. आपल्या सभोवतालच्या प्रत्येक घटकांचा पर्यावरणात समावेश होतो. दरवर्षी ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो. अशा निसर्गरम्य वातावरणात अनेक नैसर्गिक व मानवनिर्मित संकटे येतात आणि पर्यावरणाचा विध्वंस करून जातात. मानवाच्या काही कृतींमुळे पर्यावरणाची हानी झालेली दिसते. उदा. जंगलतोड,जल, मृदा, हवा इत्यादींचे प्रदुषण झालेले दिसते.

काही आपत्ती या निसर्गनिर्मित असतात. आपत्ती या समाजाच्या सामान्य कार्यामध्ये व्यत्यय आणते. आपत्ती मोठ्या संख्येने लोकांवर परिणाम करते. यामुळे जीवित आणि मालमत्तेची मोठ्या प्रमाणात हानी होते. आपत्ती या दोन प्रकारच्या असतात. एक म्हणजे नैसर्गिक आपत्ती आणि दुसरे म्हणजे मानवनिर्मित आपत्ती. नैसर्गिक आपत्ती यामध्ये भुकंप, पुर, भुस्सखलन, चक्रीवादळ, त्सुनामी, दुष्काळ, ज्वालामुखी आणि हिमलोट इ. नैसर्गिक आपत्तींमध्ये भुकंपाला सर्वात धोकादायक आणि विनाशकारी नैसर्गिक आपत्ती मानली जाते. या घटनेचा प्रभाव अगदी तात्काळ होतो. तो. चेतावणीविना असतो. पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या कंपनीय हालचालीमुळे भुपृष्ठाचा भाग अचानक मागे-पुढे किंवा वरखाली होतो. भुकंप पृथ्वीच्या पृष्ठभागावरील भेगा (फॉल्ट लाईन) मध्ये घडून येतात. त्यामुळे भुकंप हा फार भयानक स्वरूपाचा असतो.

महाराष्ट्रातील भुंकपशीलता महाराष्ट्र राज्य हे द्विकल्पीय भारताचा मध्यवर्ती व पश्चिम भाग व्यापतो. तांत्रिकदृष्ट्या हे एक इंट्राप्लेट महाद्विपीय क्षेत्र आहे. ११ डिसेंबर १९६७ रोजी कोयना येथे रिश्टर स्केलवर ६.५ तीव्रता असलेला विनाशकारी भुकंप झाला. ३० सप्टेंबर १९९३ ला लातुर,किलारी येथे ६.४ तीव्रतेचा भुकंप झाला. २६ जानेवारी २००१ ला झालेला भुज भुकंप फार भयानक होता. भुकंपानंतर पुर हा देखील जीवनीतहानी घडविणारी आपत्ती आहे. प्राचीन काळापासून भारतात पूर ही सातत्याशने उद्भवणारी आपत्ती आहे. पूर हे तीन प्रकारचे आहेत. जसे की, अचानक आलेला पुर,नदीचे

पूर आणि समुद्र किनाऱ्यावरील पूर इ. त्सुनामी कृत्रिम जलसाठ्यांचा पूर आणि चक्रिवादळ हे देखील विनाशकारी आपत्ती आहे. यामुळे देखील जिवीत व वित्त हानी होते.

दुसरा प्रकार म्हणजे मानवनिर्मित आपत्ती. मानवनिर्मिती आपत्तीचे महत्त्वाचे कारण म्हणजे. मानव प्रेरीत आपत्ती अनेक आणि विविध कारणांमुळे होतात. अतिप्रमाणात औद्योगिकरण, लोकसंख्या वाढ, वाढता उपभोग, घातक पदार्थांचा वापर किंवा प्रक्रियांचा वापर करणे याचबरोबर विविध प्रक्रियांचे अपघात यामुळे उद्‌भवू शकतात. व्यावसायिकांचे तसेच जनतेचे अज्ञान व दुर्लक्ष यामुळे मानवनिर्मित आपत्तीची शक्यता वाढते. मानवनिर्मित आपत्तीमध्ये महत्त्वाची आपत्ती म्हणजे जैविक आपत्ती होय. जैविक आपत्ती नैसर्गिक परिस्थिती आहे. कारण अस्वच्छतेमुळे वेगवेगळे जंतु तयार होऊन जैवीक आपत्ती निर्माण होऊ शकते. मानवनिर्मित आपत्तीमध्ये अणुऊर्जा आपत्ती, आग, औद्योगिक आपत्ती या देखील महत्त्वाच्या आपत्ती आहेत. या भीषण आपत्तीचे व्यवस्थापन करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन-शाळा तात्काळ मदतीला सुरक्षा आपत्तीच्या काळात पोलीस खाते आरोग्य विभाग पोलीसांची/ अधिकाऱ्यांची जबाबदारी अशा अनेक आपत्ती व्यवस्थापन योजनांची व्यवस्था केलेली असते. महत्त्वाची आपत्ती व्यवस्थापन योजना म्हणजे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन योजना (डीडीएमपी) जिल्हा प्रशासनाच्या प्रयत्नांना पाठबळ देण्यासाठी बळकट करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याची स्वत:ची जिल्हा आपत्ती व्यवस्थापन योजना (डी.डी.एम.पी.) आहे. जी आपत्तींना जिल्ह्याच्या आपत्ती व्यवस्थापनेस प्रतिसाद देते. ही योजना आपत्ती आली तर जिल्ह्याचे व्यवस्थापन कसे काम करेल यासाठी आहे.

**डी.डी.एम.पी.ची उद्दीष्ट्ये:**

१) जिल्हा स्तरावर सज्जता, आपत्तीची जोखीम, विश्लेषण आणि होणारी मानवी आणि भौतिक संसाधनांची हानी याचा प्रभाव कमी करण्यासाठी जिल्हा पातळीवर सज्जतेत सुधारणा करते.

२) जिल्ह्यात समाविष्ट असलेल्या विविध प्रतिनिधींना उपलब्ध असलेली विद्यमान संसासधने आणि सुविधांची स्थिती निश्चित करणे आणि जिल्हा प्रशासनाच्या लोकांची क्षमता वाढविण्यासाठी याचा नियमित सराव करणे.

३) जिल्ह्याच्या विकासासाठी आपत्तीचे संभाव्य स्थान आणि क्षेत्रासंदर्भात विशिष्ट नियोजनासाठी साधन म्हणून विकास योजनांसाठी आपत्तीच्या विविध पैलूंचा अभ्यास करणे.

**आपत्तीचे प्रकार:**

| * **नैसर्गिक आपत्ती:** | **मानवनिर्मिती आपत्ती** |
|---|---|
| * भूकंप | रासायनिक |
| * पूर | जैविक |
| * भुस्खलन | अणुऊर्जा |
| * चक्रीवादळ | आग |
| * त्सुनामी | औद्योगिक अपघात |
| * दुष्काळ | रेल्वे अपघात |
| * ज्वालामुखी | हवाई अपघात |
| * हिमलोट | समुद्री अपघात |

***

# म.गांधी व त्यांचे विचार

- साळुंके माया विष्णू
(एस.वाय.बी.ए.)

आज खूप दिवसांनी मी माझ्या कुटुंबासोबत चित्रपट बघत बसली होती. चित्रपट हा मुन्नाभाई एम.बी.बी.एस. होता. हा चित्रपट बघतांना खुपच आनंद येत होता. यात असणारी प्रत्येक भूमिका, विनोद यामुळे सगळ्यांना हा चित्रपट बघण्यात खूपच आनंद येऊ लागला. यात मुख्य म्हणजे यात असणारे महात्मा गांधीजींची भूमिका व त्यांचे विचार यातच सर्व भारावून गेले. या चित्रपटात महात्मा गांधी व संजय दत्त यांच्यात झालेले संभाषण हे खूप महत्त्वाचे असल्याचे कळते. या चित्रपटात जेव्हा गांधीजी संजय दत्तला आपल्या विचारांबद्दल सांगतात तेव्हा मला असे वाटले की, जणु काही ते माझ्यासमोर असून मला त्यांच्याविषयीचे असणारे जे काही विचार आहेत ते पटवून देण्याचा प्रयत्न करत आहे.

जेव्हा संजय दत्तला गांधीजी म्हणतात या देशात जेवढे माझे पुतळे, स्मारके बांधलेली आहेत. ती सगळी पाडून टाका गांधीजींचे जेवढेपण फोटो या देशातील भिंतीवर आहे ते काढून टाका. प्रत्येक इमारत, प्रत्येक मार्ग किंवा कुठेही माझे नाव असेल तर तर पुसून टाका आणि जर कुठे मला ठेवायचे असेल तर आपल्या मनात ठेवा. जर प्रत्येक व्यक्तीने गांधीजींना आपल्या मनात ठेवून त्यांचे विचार आत्मसात केले तर नक्कीच हा देश विकसित होण्याचे गांधीजींचे स्वप्न पूर्ण होईल. गांधीजींचे विचार हे अत्यंत महत्त्वाचे ठरतात. म्हणूनच गांधीजींना स्वातंत्र्याचे शिल्पकार असे म्हणतात व त्यांना राष्ट्रपीता हा दर्जा देण्यात आला आहे. यंदाचे २०१९-२० हे वर्ष गांधीजींचे १५०वे जयंती वर्ष आहे. वर्षभर त्यांच्या विचारांचे विविध ठिकाणी जागर सुरू आहेत. अनेकांनी त्यांच्याकडून प्रेरणा घेतली. अगदी नेल्सन मंडेलापासून अमेरिकेचे आताचे अध्यक्ष बराक ओबामा यांचेही गांधीजी हेच प्रेरणास्थान आहे. गांधीजींनी आयुष्यात अनेक विषयांवर महनीय आणि मननीय विचार मांडले. त्यांची विधाने पोकळ नव्हती. त्यात काही विचार होते. म्हणून आज जगात ती गांधीजींचे वचने व विचार म्हणून प्रसिद्ध आहे. त्यातील काही वचने...

* जग बदलायचे असेल तर आधी स्वत:ला बदला.
* कुणालाही जिंकायच असेल तर प्रेमाने जिंका.
* माझ्या परवानगीशिवाय मला कुणीही दुखावू शकत नाही.
* इतरांच्या सेवेत स्वत:ला समर्पित करा. तुमचा 'स्व' तुम्हाला सापडेल.
* देवाला कोणताच धर्म नसतो.
* आम्ही आमचा स्वाभिमान कुणाला दिलाच नाही तर कुणी तो हिरावून घेऊही शकणार नाही.
* रोजच्या प्रार्थनेत शब्द नसतील तरीही चालेल, पण ह्दय हवे. ह्दयाशिवाय आलेले शब्द मात्र नकोत.
* एखादा देश आणि त्यांची नैतिक मूल्ये किती महान आहेत, हे तिथल्या प्राण्यांना कशी वागणूक देतात त्यावरूनही कळून येते.
* तुम्ही मला कैद करू शकता, माझ्या छळ करू शकता. माझे शरीर नष्ट करू शकता पण माझ्या मनाला कैद करू शकणार नाही.
* या जगातल्या सर्व महान धर्मांच्या मुलभूत सत्यावर माझ्या विश्वास आहे. ही सगळी देवाचीच देणगी आहे, हेही मला मान्य आहे. म्हणूनच फार पूर्वी मी एक निष्कर्ष काढलाय की सर्वच धर्म सत्य आहेत आणि सर्वांमध्ये

काही ना काही चुका आहेत.

* तुमच्या कृतीचे काय परिणाम होतील हे तुम्हाला कृती करण्याआधी कधीच कळणार नाही. पण तुम्हीच काहीच केले नाहीत, तर त्यातून काही निष्पन्नही होणार नाही.

* प्रेमाची शिकवण लहान मुलांकडन फार छान शिकता येते.

* धीर म्हणजे स्वत:चीच परीक्षा पाहाणे.

* कुणालाही जिंकायच असेल तर प्रेमाने जिंका.

* चिंतेसारखे स्वत:ला जाळणारे दुसरे काहीही नाही. देवावर पूर्ण विश्वास असेल तर कशाबद्दलही आपण चिंता का करतो. याचीच लाज वाटली पाहिजे.

* बलहिन व्यक्ती कुणालाही क्षमा करू शकत नाही. बलवान माणुसच क्षमा करू शकतो.

* अहिंसा हे बलवानाचे शस्त्र आहे.

* डोळ्यांच्या बदलात डोळा या तत्त्वज्ञानाने जग तेवढे आंधळे होईल.

* माझ्यातल्या उणिवा आणि माझं अपयश हे माझं यश आणि माझ्या बुद्धीमत्तेसारखं देवाकडून मिळाल आहे. मी या दोन्ही गोष्टी देवाच्या पायी वाहतो.

अशा प्रकारचे अनेक गांधीजींचे वचने ही जगभरात प्रसिद्ध आहेत. आजची तरूणाई त्यांच्या अनेक सिद्धांतावर जी मते व्यक्त करतात ते सिद्धांत त्यांनी कोणत्याही प्रवचनांतून सांगितले नव्हते, तर ती त्याची जीवनपद्धती होती. गांधीजींना जेव्हा संदेश देण्याचे विचारले त्यावेळी गांधीजींनी असा कोणताच संदेश द्यायला स्पष्ट नकार देऊन सांगितले. ''माझे जीवन हाच माझा संदेश आहे.'' गांधीजींना समजून घेण्यासाठी त्यांचे जीवन समूजन घ्यावे लागेल.

गांधीजींना समजून घ्यायचे असेल तर पहिल्यांदा हा देश समजुन घेतला पाहिजे; कारण हा देश, या देशाची संस्कृती, लोक समजल्याशिवाय या देशाचे नेतृत्व करणे अशक्य आहे. भारतीय लोकजीवनाच्या कोणत्याही अंगाने नेतृत्वासाठी जायचे असेल तर असा अभ्यासक आवश्यक ठरतो. गांधीजींच्या काळात भारत हा पारतंत्र्यात होता. १२५ वर्षांहुन अधिक काळ भारत गुलामीत होता. रूढी, परंपरा आणि दारिद्र्यात पिचलेला होता. ब्रिटीशांच्या रूपाने प्रथमच एकछत्री अमलाचा अनुभव होत होता; पण त्याला शोषणाची किनार होती. चर्चिलपासून अनेक धुरिणांनी या देशाला देश म्हणून संबोधण्यासही नकार दिला होता. अशा वेळी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात गांधी पर्वाचा उदय झाला. गांधीजींनी अवघे भारतीय जनमानस संमोहित केले. आपल्या आयुष्यात आसपासच्या प्रत्येक प्रश्नांवर गांधीजींनी उत्तर शोधले ते उत्तर सोपे होते, साधे होते. गांधीजींनी जे उपाय सुचविले ते अंगीकारणे अंमलात आणणे सर्वांना शक्य होते; म्हणूनच गांधीजी सर्वांना आपले वाटले. आजच्याही प्रत्येक समस्येसाठी गांधीजींच्या उत्तरातून, विचारातून उत्तर हे मिळते ते उत्तर आपण आपण शोधले पाहिजे. आपण कोणत्याही शिक्षणक्षेत्रात गेलो तरी तेथे गांधीजींच्या 'नई तालीम' हा गांधीजींचा शिक्षणप्रयोग समजेल. ''मॅनेजमेंट थिअरी'' शिकावी लागेल. राजकीय क्षेत्रात तर त्यांची बरोबरीच नाही. अध्यात्मक असो, ग्रामीण विकास असो, आंदोलनाचे विविध प्रयोग असो व इतर कोणतीही समस्या....गांधीजी तुमच्यासमोर असतात समस्येवर समाधान घेऊन कायमच आणि भविष्यातही!

गांधीजींच्या 'नई तालीम' या शिक्षणविषयक विचारांबद्दल हेच सांगता येईल. श्रमाला प्रतिष्ठा देणारे शिक्षण हवे या मताचे ते पुरस्कर्ते होते. जे केले तेच सांगितले, हेच गांधीजींच्या जीवनाचे सार आहे. गांधीजींना जे अपरंपार यश मिळाले; त्यामागे हेच गमक आहे. गांधीजींनी अशी कोणतीही गोष्ट सांगितली नाही की जी त्यांनी स्वत: करून पाहिली नाही. साधी राहणी, उच्च विचारसरणी हेच जगण्याचे सुत्र झाले, तर अनेक समस्या

आपोआप सुटतील.

गांधीजींचे दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचे प्रयोग यशस्वी झाले होते. त्यांनी स्थापन केलेल्या फिनिक्स फार्म व टॉलस्टॉय आश्रम यांचे नाव झाले होते. सत्याग्रहाचे प्रयोग यशस्वी होत असतांना नामदार गोपाळकृष्ण गोखले यांच्या निमंत्रणावरून ते भारतात आले. भारतात आल्यानंतर लगेचच त्यांनी आंदोलनाला सुरूवात केली नाही. आपल्या गुरूंच्या सांगण्यावरून सर्वप्रथम वर्षभर भारतयात्रा केली. लोकांत मिसळले. हा देश समजून घेण्याचा प्रयत्न केला, तोही आपल्या पद्धतीने असे नेहमीच म्हटले जाते, की पीटर मॉरीसबर्ग स्टेशनवर फर्स्ट क्लासच्या डब्यातून गांधीजींना ढकलून दिले. ती रात्र स्टेशनवर कुडकुडत काढल्यानंतर सकाळी गांधीजींना रेल्वेचे फर्स्ट क्लासचे तिकीट असतांना थर्ड क्लासच्या डब्यात जाण्यास सांगितले; म्हणून विरोध करणारे गांधीजी भारत बघण्यासाठी थर्ड क्लासच्या डब्यात फिरले. त्यांना माहित होते, खरा भारत समजून घ्यायचा असेल तर, थर्ड क्लासच्या डब्यातून प्रवास करून सामान्य माणसांना समजून घेतले पाहिजे. ज्याला सार्वजनिक जीवनात वावरायचे असेल, त्यांनी समाज ज्या अवस्थेत आहे त्याचे नीट आकलन करून घेतले पाहिजे ही गांधी विचारांची समकालीनता आहे.

गांधीजींच्या मुलतत्त्वाचे स्वरूप हे सत्य आणि अहिंसा असे सांगितले जाते. सत्याप्रत जाणे म्हणजे ईश्वराप्रत जाणे, सत्यनिष्ठा हीच ईश्वरनिष्ठा असते. सत्याचरणासाठी किंवा अहिंसा पालनासाठी अत्यंत धैर्याची आवश्यकता असते. माणसांनी अभयव्रत अंगिकारले पाहिजे असे त्यांचे मत होते. कुणालाही आपले भय वाटणार नाही असा माणुस गांधीजींना अभिप्रेत होता. भयमुक्तीसाठी हाती शस्त्र बाळगणे हा डरपोकपणा आहे, असे गांधीजींचे मत होते. सर्व भयापासून मुक्त झाल्याशिवाय सत्याचा शोध घेता येत नाही हेच गांधीजींनी राष्ट्राला सुचविले.

अन्याय करणाऱ्यांपेक्षा अन्याय सहन करणारा अधिक दोषी आहे, असे त्यांचे म्हणणे होते. अन्याय सहन करणाऱ्याची कृती ही कोणत्या ना कोणत्या भयातूनच होत असते असे गांधीजींचे स्पष्ट मत होते. गांधीजींचे मत असे होते की, '' मानवी शरीरसुद्धा एक अद्‌भूत यंत्र आहे आणि मी या यंत्राचा विरोध कसा करेन? माझा यंत्राला विरोध नाही, परंतु यंत्र माणसांच गुलाम झालं पाहिजे, माणुस यंत्राचा गुलाम होता कामा नाही'' असा विवेकी विचार गांधीजींनी मांडला होता.

गांधीजी ७८ वर्षाचे अर्थपूर्ण जीवन जगले. त्यांनी शरीराला मंदिर म्हटले आहे. त्यांनी शरीराला श्रमाची सवय लावली. शरीरावर अनेक प्रयोग केले. अन्नसेवनाचे, पाणी उपचार, उपवास असे अनेक प्रयोग केले. या सर्व प्रयोगातून सिद्ध झालेली गांधीजींची निसर्गोपचार ही पद्धत अस्तित्वात आली. गांधीजी हे आजही जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात महत्त्वाचे आहे. ''माझे जीवन हाच माझा संदेश आहे'' यास्तव त्यांची जीवनशैली आपण अंगिकारली पाहिजे. जसजसा कालखंड पुढे जाईल, तसतशी या विचारांची आवश्यकता भासेल हे नक्की! महापुरूषांना किंवा महात्म्यांना मोजण्याची एक पद्धत असते जितक्या अधिक कालावधीपर्यंत त्यांच्या विचारांची सुसंगती किंवा संदर्भ आढळून येईल, तितका तो महान असतो.

गांधीजींचे जीवन असेच आहे देश, धर्म, भाषा, कालखंड यापलीकडे जाऊन ते आपल्याला कायमच मार्गदर्शन करीत राहतील.

***

# आपत्तीचे प्रकार

- भोर गायत्री सुदाम
(एस.वाय.बी.कॉम.)

सजीव सृष्टीवर अचानक ओढवलेले संकट किंवा अरिष्ट, अपघात किंवा दु:खद घटना (महापूर, भूकंप, ज्वालामुखी उद्रेक, आग, वादळ, वाय, बॉम्बस्फोट, युद्ध, विज कोसळणे, रोगराई, अवर्षण, जलप्रलय, वायुगळती इ.) म्हणजेच आपत्ती होय.

आपत्ती ही पर्यावरणीय विनाशकारी घटना आहे. आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी, वित्तहानी होत असते. मानवी जीवनाची जीवनपद्धती बदलविणारी आपत्ती नैसर्गिक स्वरूपाची किंवा मानवी स्वरूपाची असू शकते.

आपत्तीचे स्थान वातावरण,मृदावरण किंवा जलावरण असू शकते. भू-विज्ञानाचा अतिशय जवळचा संबंध आपत्तीच्या घटनांशी येतो. भू-विज्ञानाशीच मानवी जीवन निगडीत असते. त्यामुळे आपत्तीकारक घटना थांबविणे किंवा त्या आपत्तीचे नियंत्रण, व्यवस्थापन करणे जरूरीचे असते. संरक्षण व सामाजिक विज्ञानाच्य बदलत्या स्वरूपानुसार त्याच्या आपत्तीचे व्यवस्थापन आवश्यक असते. त्या आपत्ती व्यवस्थापनामध्येच मानवी हित दडलेले असते. आपत्ती व्यवस्थापनामध्ये नैसर्गिक आपत्तीपासून निर्मित झालेले नुकसान भरून काढणे तात्काळ शक्य होऊ शकत नाही. मानवी आपत्तीचे व्यवस्थापन मात्र तात्काळ करता येणे शक्य असते. व्यवस्थापनामध्ये आपत्ती विषयी सूचना, माहिती मिळाली तर जीवितहानी कमी होऊ शकते.

आपत्ती विषयक परिस्थितीवर नियंत्रण करणे, धोकादायक परिस्थिती निवळणे म्हणजे आपत्ती व्यवस्थापन होय. आपत्ती व्यवस्थापनामध्ये आपत्तीचा सामना करण्याची क्षमता प्राप्त करणे, त्या क्षमतेत वाढ करणे, त्यासाठी प्रतिबंधात्मक योजना आखणे, आपत्तीचे निवारण तसेच आपत्कालीन व्यक्तीचे पुनर्वसन, पुनर्निर्माण इ. घटकांचा विचार करून कृती आराखडा करणे, योग्य सूत्रसंचालन करून कमीत कमी वेळात मानसिक स्थैर्यता मिळवणे अपेक्षित असते.

पृथ्वीची उत्पत्ती आणि तिच्यावरील संपूर्ण सृष्टी म्हणजे नैसर्गिक परिस्थिती होय. त्यामध्ये मृदावरण, भूगर्भातील विभाग, जलावरण, वातावरण समाविष्ट आहे. याच नैसर्गिक परिस्थितीमधील मानव हा एक सजीव घटक आहे. मानवावर येणारी निसर्गनिर्मित अरिष्ट्ये म्हणजेच नैसर्गिक आपत्ती होय.

निसर्गातील निरनिराळ्या घटना आपत्तीशी संबंधीत असतात. निर्माण होणाऱ्या आपत्तीमध्ये नैसर्गिक शक्तीचा, घटकांचा सहभाग असतो. अनेक प्रकारचे नैसर्गिक घयक आपत्तीस कारण ठरतात. उदा भूकंप, ज्वालामुखी, त्सुनामी लाटा, भूमीपात प्रक्रिया, वादळे, महापूर, दुष्काळ, हिमताप, हिमवादळे, अतिवृष्टी, गारपीट, जमिनीची धूप, प्रस्तरभंग इ. निरनिराळ्या प्रकारची संकटे नैसर्गिक शक्तीतूनच निर्माण होतात. काही प्रसंगी एक घटक दुसऱ्या घटकाच्या आपत्ती निर्मितीस कारणीभूत ठरतो सर्वच घटना सर्वच वेळी आपत्ती ठरत नाहीत. उदा. वारा-वादळ अनेक वेळा निर्माण होते.

**आपत्ती**

- नैसर्गिक आपत्ती
  - भूरूपशास्त्रीय व भूगर्भीय
    - भूकंप
    - ज्वालामुखी
    - त्सुनामी लाटा
    - भूमीपात
    - मृदाक्षारीकरण
    - प्रस्तरभंग
    - जलप्रलय
    - धूप
  - हवामानशास्त्रीय
    - चक्रीय वादळे
    - महापूर
    - अवर्षण
    - थंड हवेच्या लाटा
    - हिमपात, हिमवादळे
    - उष्ण हवेच्या लाटा
    - उल्कापात
    - सूर्यडाग व त्यातील बदल
- मानवनिर्मित आपत्ती
  - हेतुकारक
    - आग
    - दहशतवाद
    - युद्ध
    - मानवी बॉम्ब
    - औषध भेसळ
    - विष प्रयोग
    - टाळेबंदी
    - संप
    - घातपात
    - बलात्कार,खून
    - व्यावसायिक
  - अनाकलनीय
    - अणुस्फोट
    - वायुगळती
    - अपघात
    - (रेल्वे,रस्ते,जहाज,
    - विमाने,अचानक क्रिया
    - नजरचूक (औद्योगिक क्षेत्र)

**भूकंप:**

पृथ्वीच्या कवचास, भूपृष्ठास किंवा त्याच्या अंतर्गत भागात जे कंपायमान होते, हादरे बसतात त्या स्थितीस भूकंप म्हटले जाते.

अचानकरित्या काही क्षण किंवा काळ भू-भागावर निर्माण होणाऱ्या कंपनांना आपण भूकंप म्हणतो. त्यावरून पी लेक यांनी भूकंपाची व्याख्या स्पष्ट करताना म्हटले आहे की, ''भूकंप या शब्दामधूनच स्पष्ट होणाऱ्या अर्थानुसार भूकवच हादरणे म्हणजे भूकंप होय''

भूकवचामध्ये सुरू असलेल्या हालचालींमुळे खडकांच्या थरामध्ये विषम ताण निर्माण होतो आणि तो ताण असाय्य झाला की, खडकांचे थर भंग पावून पुढे मो किंवा खालीवर सरकतात ही विभंगाची क्रिया अकस्मात घडून धक्के बसून हादरे पोहचतात त्यालाच आपण भूकंप म्हणतो.

भूगोलतज्ञ डब्ल्यू.जी. भूर यांच्या विचारानुसार नैसर्गिक कारणाने भूपृष्ठाखाली होणाऱ्या हालचालींमुळे भूपृष्ठाला हादरे बसतात त्यालाच भूकंप म्हणतात. याचाच अर्थ असा की, भूगर्भातील निरनिराळ्या प्रक्रियांमधून जी ऊर्जा निर्माण होते. तिच्या परिणामाने भूपृष्ठाला कंप सुटतो.

भौगोलिक दृष्टीने भूकंपाची सर्वाधिक शक्ती ज्या ठिकाणी एकवटलेली असते. त्या ठिकाणास भूकंप केंद्र म्हणतात तसेच भूकंप उत्पत्ती केंद्राला भूंकपनाभी म्हणतात. अथार्त भूकंप नाभीपासून भूकंप लहरी सर्व दिशांना पसरतात. भूकंप लहरीची नोंदणी यंत्रावर होते ते यंत्र सायस्मोग्राफ म्हणून ओळखले जाते.

***






# आपत्तीकालीन प्रतिबंधात्मक उपाय व्यवस्थापन

- गावडे शुभम जनार्दन
(एफ.वाय.बी.कॉम.)

**१) समुदाय:** आपण वृत्तपत्रात नेहमी वाचतो. अतिवृष्टी झाली, पुर आला, विज पडती, भूकंप झाला त्यातून नुकसान झाले वगैरे.

**२) आपत्ती व्यवस्था-**शाळा-प्राथमिक शाळेतील मुले (विशेषत: ५-१२ वयोगटातील) आपत्तीच्या काळात दुर्बल असतात. अशा वेळी त्यांच्याकडे सर्वात अगोदर लक्ष देणे गरजेचे आहे.

**३) तात्काळ मदतीला 'स्वरक्षा':** रस्ते अपघातानंतर तात्काळ मदत न मिळाल्यानेही अनेकांचा जीवन जात आहे. आता अपघातग्रस्तांना तात्काळ मदत मिळावी यासाठी महामार्ग पोलीसांनी पुढाकार घेऊन 'स्वरक्षा' नावाचे मोबाईल ॲप्लीकेशन तयार केले आहे.

**४) आपत्ती व्यवस्थापन घड्याळ:** ऋतूनिहाय प्रत्येक गाव व गटाची दिनचर्या, कामाचे स्वरूप वेगवेगळे असते. जसे महिला, पुरूष, वृद्ध, लहान मुले यांच्या झोपेतून उठण्याची वेळ वेगवेगळी असते. काही गावात महिला लवकर उठून आवरा-आवर करतात.

**५) भूकंप:** भूकवचाखाली असणाऱ्या द्रवरूपी पदार्थामुळे जमिनीस जे हादरे बसतात त्याला भूकंप म्हणतात. भूकंपामुळे जमिनीच्या पोटात असणारे विविध स्तर मागे-पुढे, खाली-वर सरकून जमिनीला भेगा पडल्यामुळे भूकंप होतो. भुगर्भाचा अभ्यास करणाऱ्या काही तज्ज्ञांच्या मते जगभरात दरवर्षी सुमारे ३० लाख भूकंप होतात.

**६) आग:** इंधन, प्राणवायू (ऑक्सीजन) व उष्णता या तीन गोष्टी एकत्र आल्याने आग निर्माण होते. यामध्ये एखादी गोष्ट नसली तरी आग निर्माण होऊ शकत नाही. आग लागणे ही एक प्रकारची आपत्तीच आहे. आग मानव निर्मित किंवा नैसर्गिक असू शकते.

**७) पूर:** अतिवृष्टीमुळे नदी-नाल्यांतील पाणी वाढून आसपासच्या परिसरात पसरण्याची परिस्थिती म्हणजे थोडक्यात पूर होय.

**८) आपत्ती व्यवस्थापन व सावधानता:** प्रशासनातर्फे विविध उपाययोजना राबविण्यात येत असल्यातरी आपत्तीतील विविध प्रकारची होणारी हानी कमी करण्यासाठी नागरिकांनीदेखील जागरूक राहणे गरजेचे आहे.

**९) भूस्खलनाचे आपत्ती व्यवस्थापन:** उत्तराखंडामध्ये २०१३ व माळीणमध्ये २०१४ मध्ये झालेल्या प्रचंड पावसामुळे, दरडी कोसळल्याने तसेच जमीन खचल्याने भाविक व नागरिकांसमोर मोठे संकट उभे राहिले होते. अचानक आलेल्या या आपत्तींमुळे भाविक व नागरिक गोंधळून जाणे स्वाभाविक आहे.

**१०) आपत्ती व्यवस्थापन कार्य पद्धती:** पावसाळ्यात अनेक ठिकाणी पुरस्थिती निर्माण होऊन परिस्थिती गंभीर होते. त्यापार्श्वभूमीवर प्रत्येक जिल्हास्तरावर आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रभावित कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे.

**आपत्ती व्यवस्थापन घटक:**

१) रस्ता सुरक्षा
२) ग्राहक तक्रार निवारण मंच
३) स्पीड लॉक मनातच हवा
४) मोटार वाहन कायद्यातील तरतुदी
५) ग्राहक हक्क संरक्षण कायदा
६) जागा ग्राहक जागो.
७) आपत्ती व्यवस्थापनाच्या गरजा
८) आपत्ती निवारणात 'त्यांचा' ही सहभाग!
९) पूररेषा
१०) नागपुरातील पूररेषेची आखणी
११) नाशिक शहर पूररेषेची आखणी
१२) शाश्वत उपाय-जलफेरभरण
१३) दुष्काळ निवारणाच्या तातडीच्या व दूरगामी उपायोजना

**११) आपत्ती कालीन उपाययोजना:**

आपत्ती म्हणजे ज्या संकटामुळे राष्ट्राची किंवा समाजाची मोठ्या प्रमाणात जीवित, आर्थिक आणि सामाजिक हानी होते तसेच त्या शब्दावर किंवा समाजावर तिचे दुरगामी परिणाम होतात अशा संकटाला आपत्ती म्हणतात.

**१) आपत्तीपुर्व व्यवस्थापन:** यामध्ये प्रशिक्षण, जनजागृती उपक्रम, यंत्रणांचा सराव व प्रात्यक्षिक, आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करून यंत्रणा सुसज्ज ठेवणे, विविध आपत्ती प्रतिसाद दलांशी संपर्क व समन्वय ठेवणे.

**२) आपत्ती प्रसंगी व्यवस्थापन-** प्रत्यक्ष आपत्कालीन प्रसंगी मदत कार्याचे नियोजन करणे व मदत यंत्रणामध्ये समन्वय राखणे.

**३) आपत्ती नंतरचे व्यवस्थापन-** आपत्तीनंतर करावे लागणारे मदतकार्य नियंत्रित करणे, मदत व पुनर्वसन योजनेची योग्य अंमलबजावणी करणे इ.

**नैसर्गिक आपत्ती**

परिसर भुकंप, ज्वालामुखी, वादळवारे, पुर, ढगफुटी यासारख्या नैसर्गिक आपत्ती माणसाला पुरत्या हतबल करून टाकतात. त्यासाठी सतत सतर्क राहावे लागते. या आपत्तींना तोंड देण्यासाठी विशेष प्रशिक्षणांनी युक्त माणसांना सज्ज ठेवावे लागते. त्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर ऑक्टोबर महिन्याचा दुसरा बुधवार राखुन ठेवतात व या आपत्तींना आवर घालण्यासाठी करावयांच्या उजळणी करतात. संयुक्त राष्ट्रसंघाच्या २२ डिसेंबर १९८९ च्या सर्वसाधारण अधिवेशनात नैसर्गिक आपत्तींना आवर घालण्यासाठी प्रस्तुत दिवसाची घोषणा झाली होती. १९९०-९९ हा काळ नैसर्गिक आपत्तींना आवर घालण्याचे दशक म्हणुन घोषित झाले होते व या काळात सदर दिवसाचा सोहळा ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी साजरा होत गेला.

***

# आपत्ती व्यवस्थापन व जनजागृती

- पोरजे मोनिका पोपट
(एफ.वाय.बी.कॉम.)

सजीव सृष्टीवर अचानक ओढवलेले संकट किंवा अपघात किंवा दु:खद घटना यामध्ये महापुर, भुकंप, ज्वालामुखी उद्रेक, आग, वादळ-वारा, बॉम्बस्फोट, युद्ध, विज कोसळणे, रोगराई, जलप्रलय हे सर्व आपत्तीचे प्रकार आहे. आपत्ती ही पर्यावरणीय विनाशकारी घटना आहे. आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी व वित्तहानी होत असते. मानवी जीवनाची जीवनपद्धती बदलविणारी आपत्ती नैसर्गिक किंवा मानवी स्वरूपाची असू शकते. आपत्तीचे स्थान वातावरण किंवा जलावरण असू शकते.

भु विज्ञानाचा अतिशय जवळचा निगडीत असते व त्यामुळे आपत्ती ज्यामुळे येते ते थांबवून किंवा त्या आपत्तीचे नियंत्रण व व्यवस्थापन करणे अतिशय आवश्यक आहे. आपत्ती व्यवस्थापनामध्ये नैसर्गिक आपत्तीपासून निर्माण झालेले नुकासन भरून काढणे, लगेचच शक्य नसते. मानवी आपत्ती व्यवस्थापन मात्र तात्काळ करता येणे शक्य होते. व्यवस्थापनामध्ये आपत्ती विषयी सूचना, माहिती मिळाली तर जीवितहानी कमी होऊ शकते. तरी आपत्ती विषयक परिस्थितीवर नियंत्रण करणे, धोकादायक परिस्थिती निवळणे म्हणजे आपत्ती व्यवस्थापन होय.

आपत्ती व्यवस्थापनामध्ये आपत्तीचा सामना करण्याची क्षमता प्राप्त करणे, त्या क्षमतेत वाढ करणे, त्यासाठी प्रतिबंधनात्मक योजना आखणे, आपत्तीचे निवारण तसेच आपतकालीन व्यक्तीचे पुनर्वसन, पुनर्निर्माण इ.घटकांचा विचार करून त्याविषयी आराखडा तयार करणे, कमीत कमी वेळेत मानसिक स्थैर्यता मिळवणे ही अपेक्षित असते.

*''पर्यावरण ची करा रक्षा,
पृथ्वीची होईल सुरक्षा''*

आपण कुठेना कुठे नेहमी वाचतो ह्या ठिकाणी अतिवृष्टी झाली पुर आला. विज पडली, भुकंप झाला त्यातुन नुकसान झाले व त्यातुन मोठ्या प्रमाणात आर्थिक तसेच जीवित हानी मोठ्या प्रमाणावर होते. भुकंप, पुर, विज पडणे, वादळ, आग लागणे या आपत्ती येणे व त्यांची तीव्रता कमी करता येणे आपल्या हातात नसले तरी योग्य नियोजन केल्यास त्यांच्यापासून होणारे नुकसान कमी करता येणे शक्य आहे.

कुठेही निसर्ग किंवा मानव निर्मित आपत्ती उद्‌भवली की त्याक्षणी प्रथम दुर्बल होतो तो स्थानिक नागरिक! तो बाहेरून येणाऱ्या मदतीची प्रतिक्षा करण्याऐवजी थेट मदतकार्याला सुरूवात करतो. त्यावेळी कधी कधी त्याचे नुकसानह होते. म्हणुन स्थानिक नागरिकांना आपत्कालीन मदत करण्याचीही माहिती देणे आवश्यक आहे.

यासाठी समुदाय आधारित आपत्ती व्यवस्थापन तंत्र स्विकारायला हवं समुदाय आपत्ती व्यवस्थापन म्हणजे थोडक्यात स्थानिक लोकांनी एकत्र येऊन केलेलं आपत्तीपूर्व नियोजन. सविस्तर विचार केल्यास आपत्ती व्यवस्थापन म्हणजे, आपत्तीच्या सुनियोजित प्रतिकारासाठी योग्य तयारी तात्काळ प्रतिसाद आणि आपत्तीनंतर उद्‌भवणारी परिस्थिती पुर्वपदावर आणण्याची योजना होय.

आपण आज ज्याप्रकारे प्रदुषण करत आहो, ते जर असेच चालु राहिले तर पर्यावरणाचा ऱ्हास होईल. नैसर्गिक आपत्ती मोठ्या प्रमाणात येतील. एक दिवस असा येईल की जेव्हा पाणी जास्त होऊन आता पुरे जेथे गरज आहे तेथे बरस असे लोक पावसाला बोलतील. अशी परिस्थिती आपल्या सर्वांवर येऊ नये त्यासाठी

पर्यावरणाला आपल्याकडून कोणत्याही प्रकारची इजा किंवा हानी होणार नाही. आपण पर्यावरणाला हानी पोहोचवतो. पण मात्र याचे दुष्परिणाम आपल्यावर न होता आपल्या येणाऱ्या पिढीला होणार त्यामुळे त्याची काळजी घेतली पाहिजे. जास्तीत जास्त झाडे लावून, पाण्याचा योग्य वापर करून इंधनाचा ठरावीक वापर करून आपली व दुसऱ्यांची सर्वांनी काळजी घेतली पाहिजे. आपत्ती व्यवस्थापन हे तुम्ही आम्ही मिळूनच केले पाहिजे.

''पर्यावरण वाचवा
भविष्य घडवा''

नैसर्गिक आपत्ती किंवा दुर्घटना घडली की आपत्ती व्यवस्थापन त्याबाबत नागरिकांमध्ये असलेली भिती याबबात चर्चा सुरू होतात. सध्या शाळा, महाविद्यालये, प्रसारमाध्यमे आणि जाहिरातींच्या माध्यमातून या संदर्भात जनजागृती होत असली तरी पुरेशी नाही हे केरळमधील आपत्ती किंवा अन्य दुर्घटनांमुळे लक्षात येते.

गेल्या आठवड्यात आपण परळमध्ये इमारतीला आग लावली तेव्हा अग्निशमन दलाने किमन १५ जणांचे जीवन वाचविले, पण अग्निशमन दलाचे जवान तिथे पोहचण्याआधीच झेन या शाळकरी मुलीने आग आणि धुरापासून बचाव कसा करावा याचा सल्ला इमारतीतील रहिवाशांना दिला आणि त्यांचे जीव वाचवले. या मुलीला विचारणा केली असता तिने सांगितले. तिच्या शाळेत विविध आपत्तीत बचाव कसा करावा किंवा वेळी काय करावे आणि करू नये याचे प्रशिक्षण देण्यात आले होते.

अशा प्रकारे आपत्ती आल्यास त्याला कशाप्रकारे आपल्याला तोंड देता येईल याचा अभ्यास केला पाहिजे. आपत्ती आल्यास तेथे काय करावे याची माहिती आपल्याला असली पाहिजे. जेणेकरून एखाद्या वेळी कोणत्याही प्रकारची आपत्ती जर ओढावली तेथे न घाबरता तेथील परिस्थितीला थोडा हातभार आपण लावू शकतो.

आपण पर्यावरणाला हानी पोहोचवतो वेगवेगळ्या प्रकारची प्रदुषणे, वृक्षतोडी करून पर्यावरणाचा ऱ्हास करतो. त्यामुळे मानवनिर्मित आपत्ती तसेच नैसर्गिक आपत्तींना आपल्याला तोंड द्यावे लागते. आपण एक निश्चय केला पाहिजे की जेणेकरून पर्यावरणाला मानवाचा गालबोट लागणार नाही.

प्रदूषण टाळा,
पर्यावरण सांभाळा.

***



# आपत्ती व्यवस्थापन स्वरूप

- सुर्यवंशी गौरी गोविंद
(एफ.वाय.बी.कॉम.)

आपत्ती म्हणजे ज्या संकटामुळे राष्ट्राची किंवा समाजाची मोठ्या प्रमाणात जिवित, आर्थिक आणि सामाजिक हानी होते तसेच त्या राष्ट्रावर किंवा समाजावर तिचे दूरगामी परिणाम होतात. अशा संकटाला आपत्ती म्हणतात.

आपत्ती व्यवस्थापनाचे ३ प्रमुख टप्पे आहेत.

१) आपत्ती पूर्व व्यवस्थापन-यामध्ये प्रशिक्षण, जनजागृती उपक्रम, यंत्रणांचा सराव व प्रात्यक्षिक, आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करून यंत्रणा सुसज्ज ठेवणे, विविध आपत्ती प्रतिसाद दलांशी संपर्क व सुसज्ज ठेवणे, विविध आपत्ती प्रतिसाद दलांशी संपर्क व समन्वय ठेवणे.

२) आपत्ती प्रसंगी व्यवस्थापन-प्रत्यक्ष आपत्कालीन प्रसंगी मदत कार्योचे नियोजन करणे व मदत यंत्रणामध्ये समन्वय राखणे.

३) आपत्ती नंतरचे व्यवस्थापन-आपत्ती नंतर करावे लागणारे मदत कार्य नियंत्रीत करणे, मदत व पूनवर्सन योजनेची योग्य अंमलबजावणी करणे इ.

**नैसर्गिक आपत्ती:**

परिसर भूकंप, ज्वालामुखी, वादळवारे, पूर, ढगफुटी यासारख्या नैसर्गिक आपत्ती माणसाला पूरत्या हतबल करून टाकतात. त्यासाठी सतत संतर्क राहावे लागते. या आपत्तींना तोंड देण्यासाठी विशेष प्रशिक्षणांनी युक्त माणसांना सज्ज ठेवावे त्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर ऑक्टोबर महिन्याचा दुसरा बुधवार राखून ठेवतात व या आपत्तींना आवर घालण्यासाठी करावयांच्या कारवायांची उजळणी करतात. संयुक्त राष्ट्रसंघाच्या २२ डिसेंबर १९८९ च्या सर्वसाधारण अधिवेशनात नैसर्गिक आपत्तींना आवर घालण्यासाठी प्रस्तुत दिवसाची घोषणा झाली होती. १९९०-९९ हा काळ नैसर्गिक आपत्तींना आवर घालण्याचे दशक म्हणून घोषित झाले होते व या काळात सदर दिवसाचा सोहळा ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी साजरा होत गेला.

**आपत्ती व्यवस्थापन आणि लोकसहभाग**

मानवनिर्मित आणि निसर्गनिर्मित असे आपत्तीचे दोन प्रकार आहेत. विशेषत: हवामानातील बदलामुळे नैसर्गिक आपत्तीत आकस्मिकपणे उद्‌भवते. त्यामुळे अशा नैसर्गिक आपत्तीत जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपण दैनंदिन व्यवहारातही बघतो र एखाद्या वाहनाला फार मोठा अपघात झाला किंवा एखादी व्यक्ती अपघातात जखमी झाली तर त्यांना उपचारासाठी, त्यांचे प्राण वाचविण्यासाठी समाजातील अनेकजण धावपळ करतात. एकंदरित सांगावयाचे झाल्यास मानवी संवेदनामुळेच ही सकारामक कृती समाजाकडुनच घडते. तसेच यामध्ये प्रशासनाच्या वतीनेसुद्धा योग्य ती दखल घेतली जाते. म्हणूनच आपत्ती व्यवस्थापन आणि लोकांचा सहभाग ह्यांच नाव फार जवळच आहे.

**स्थानिक पातळीवर आपत्ती व्यवस्थापनाची गरज-**

आपत्ती काळात तसेच आपत्तीनंतर विशेषत: अल्पवयीन बालके, वृद्ध, महिला तसेच अपंग यांना कमीत कमी त्रास होईल याची खातर मजा करण्यासाठी याशिवाय आपत्ती काळात पाणी पुरवठा, जनावरांचा चारा, खानपान व्यवस्था, वैद्यकीय सेवा, औषध, सामग्री,

सांडपाण्याची व्यवस्था इ. सुरळीत चालतील याची खात्री करण्यासाठी स्थानिक पातळीवर आपत्ती व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. त्यासाठी तितकाच उत्स्फूर्तपणे लोकसहभाग मिळणे आवश्यक ठरते.

**विभागस्तरावरून करण्यात येत असलेल्या उपाय योजना–**

विभागस्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येते. याचप्रमाणे जिल्हा व तालुकास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या नियंत्रण कक्षाची सेवा २४ तास उपलब्ध राहणार आहे. निर्माण होणारी संभाव्य परिस्थितीला हाताळण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. याशिवाय पूरपरिस्थितीमुळे साथ रोगांना नियंत्रित ठेवण्यासाठी आरोग्य यंत्रणा, विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरण कंपनी, दूरध्वनी सेवा सुस्थितीत ठेवण्यासाठी दूरसंचार विभाग रस्त्याचे वाहतुकीचा संपर्क असावा. यासाठीही सार्वजनिक बांधकाम विभाग, राज्य परिवहन महामंडळ, पाटबंधारे विभाग व इतर संबंधित विभागांना आवश्यक सुचना देण्यात आल्या आहेत.

आपत्कालीन परिस्थितीत प्रशासकीय यंत्रणेसोबतच शालेय महाविद्यालयीन विद्यार्थी, एनसीसी, होमगार्डस्, पोलीस प्रशासन, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते आदींचा प्रामुख्याने सहभाग असतो. तसेच आपतकालीन परिस्थितीमध्ये ग्रामस्थांनी देखील हिरीरीने पुढाकार घेऊन व्यवस्थेला सहकार्य करण्याची गरज आहे.

आपत्ती व्यवस्थापन म्हणजेच Disaster Management हा एक अत्यंत मोठा आणि व्यापक विषय आहे. ह्या विषयावर इंटरनेटवर शोधायला गेल्यास असंख्य पुस्तके, लेख आणि वेबसाईट मिळतील. ह्या सगळ्याचा इत्भूंत आढावा घेणे तसेच अशक्य आहे. तरी देखील आपण व्यवहारात आवश्यक जुजबी माहिती मिळवण्याचा प्रयास नक्कीच करू शकतो. जेणेकरून आपत्तीसारख्या बिकट परिस्थितीत आपण मार्ग काढून आपले प्राण वाचविण्याचे प्रयत्न नक्की करू शकतो.

तहान लागल्यावर विहीर खोदायला गेले तर काय होईल हे आपण सारे जाणतोच मग तहान लागण्यासाठी जशी पाण्याची सोय करणे श्रेयस्कर असते तसेच आपत्ती आल्यावर जीव वाचविण्यासाठी धावाधाव करण्यापेक्षा, उपाय शोधण्यापेक्षा संकट निवारणाची उपाययोजना आधीपासूनच आखणे आणि त्याची पूर्वतयारी करून ठेवणे कधीही उचितच असेल.

कोणत्याही प्रकारच्या आपत्ती आल्या की आज आपण सगळे शासनाला दोष देण्यात धन्यता मानतो. परंतु आपण जर एक समंजस नागरिक म्हणुन आपली जबाबदारी ओळखून वागायला लागतो तर खूप प्रमाणात गोष्टी बदलू शकतील.

***

# आपत्ती व्यवस्थापन आणि लोकसहभाग

**- आढाव सुषमा पंडीत**
(एफ.वाय.बी.कॉम.)

मानवनिर्मित आणि निसर्गनिर्मिती असे आपत्तीचे दोन प्रकार आहेत. विशेषत: हवामानातील बदलामुळे नैसर्गिक आपत्तीत आकस्मिकपणे उद्भवते त्यामुळे अशा नैसर्गिक आपत्तीत जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपण दैनंदिन व्यवहारातही बघतो जर एखाद्या वाहनाला फार मोठा अपघात झाला किंवा एखादी व्यक्ती अपघातात जखमी झाली तर त्यांना उपचारासाठी त्यांचे प्राण वाचविण्यासाठी समाजातील अनेकजन धावपळ करतात. एकंदरीत सांगावयाचे झाल्यास मानवी संवेदना मुळेच ही सकारात्मक कृती समाजाकडूनच घडते. तसेच यामध्ये प्रशासनाच्या वतीनेसुद्धा योग्य ती दखल घेतली जाते. म्हणुनच आपत्ती व्यवस्थापन आणि लोकांचा सहभाग ह्याचं नात फार जवळच आहे. जर एखाद्या वाहनाला फार मोठा अपघात झाला किंवा एखादी व्यक्ती अपघातात जखमी झाली तर त्यांचा उपचार करण्यासाठी समाजातील अनेक लोक धावपळ करत असतात.

भूकंप, महापूर, चक्रीवादळ अतिवृष्टी ह्या सर्व घटना नैसर्गिक आपत्ती मध्येच मोडणाऱ्या आहेत. अशा आपत्तीमध्ये होणारी जीवित व वित्त हानी टाळण्यासाठी महाराष्ट्र आपत्ती जोखीम व्यवस्थापना अंतर्गत विभागीय व जिल्हास्तरावर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. इतकेच नव्हे तर केंद्र शासनाने २००५ मध्ये आपत्ती व्यवस्थापन कायदा पारीत केला आहे. याचा मुख्य उद्देश नैसर्गिक आपत्तीमध्ये होणारे नुकसान टाळणे हा सर्वांना सुरक्षितता प्रदाण करणे हा आहे.

***



# नैसर्गिक आपत्तीचे प्रकार

- वाघ स्नेहा काशिनाथ
(एफ.वाय.बी.कॉम.)

नैसर्गिक आपत्ती हा नैसर्गिक धोक्याचा एक प्रभाव असतो. उदा. पूर, झंझावात, चक्रीवादळ, ज्वालामुखी, भुकंप, उष्णतेची लाट किंवा भुस्खलन. यामुळे आर्थिक पर्यावरणात्मक अथवा जीवीतहानी होऊ शकते. प्रभावित लोकसंख्येच्या हानीप्रवणतेवर हाणी अवलंबून असते. हानी त्या लोकांच्या कणखरपणावरही अवलंबुन असते. ''धोका जेव्हा हाणी प्रवणतेस भेटतो तेव्हा आपत्ती येत असते'' ह्या उद्धारांत हेच तथ्य सामावलेले आहे. म्हणुनच जी क्षेत्रे हाणीप्रवण नसतात. तिथे नैसर्गिक धोका ही नैसर्गिक आपत्ती आणु शकत नाही. उदा. निर्जन भागात घडून आलेला तीव्र भुकंपही आपत्ती आणु शकत नाही. यातील नैसर्गिक शब्दाबदल वाद आहेत, कारण माणसे त्यात समाविष्ट असल्याखेरीज एखादी घटना ही, धोका किंवा आपत्ती ठरत नाही. नैसर्गिक धोका आणि नैसर्गि आपत्ती यांच्यातील फरकाचे ठोस उदाहरण म्हणजे १९०६ साली सॅन फ्रॉसेस्को मध्ये झालेला भुकंप ही आपत्ती होती. तर सर्वसाधारणपणे भुकंप हा धोका असतो. ह्या लेखात दखलपात्र नैसर्गिक आपत्तीची ओळख करून दिलेली आहे. नैसर्गिक आपत्तीच्या सर्वंकष यादीकरीता संदर्भिक यादी पहावी.

**भूकंप:** भूकंप म्हणजे अंतर्गत भुस्तर आपापसांत आदळून पृथ्वीच्या पृष्ठभागाचे अचानक हादरणे स्पंदणाचे परिणाम बदलु शकते. भुकंपाचा भुमिगत मुळ बिंदू केंद्र म्हणून ओळखला जातो. केंद्राया थेट वर पृथ्वीच्या पृष्ठभागावरचा बिंदू पृष्ठकेंद्र म्हणून ओळखला जातो. प्रत्यक्ष भुकंपामुळे उद्भवणाऱ्या दुय्यम घटना जशा की इमारतीचे कोसळणे, आगी लावणे, त्सुनामी येणे आणि ज्वालामुखी भडकणे ह्याच प्रत्यक्षात मनुष्याकरीता आपत्ती ठरत असतात. यापैकी बऱ्याच घटना बहुधा चांगले बांधकाम, सुरक्षा प्रणाली, पुर्वसुचना आणि आपत्कालीन स्थलांतराचे नियोजन यांचे आधारे टाळात येण्यासारख्या असतात. भुपृष्ठीत फुटीतुन साठलेल्या उर्जेने विमोचन झाल्याने भुकंप घडून येत असतात.

**ज्वालामुखी:**

ज्वालामुखी सर्वदुर विनाश घडवू शकतात आणि परिणामत: अनेक प्रकारे आपत्ती आणु शकतात. प्रभावांमध्ये स्वत: ज्वालामुखीच्या भडकवण्याचे विस्फोट आणि पथ्थरांच्या वर्षावाद्वारे होणारी हानी समाविष्ट असते. दुसरे म्हणजे ज्वालामुखी जागृत होत असताना लाव्हारस निर्माण होऊ शकतो. तो ज्वालामुखीच्या तोंडातुन बाहेर पडत असता. वाटेत लागतील ती बांधकामे आणि वनस्पती यांचा विनाश करत जातो. तिसरे म्हणजे ज्वालामुखीतुन बाहेर उडणारी राख म्हणजे सामान्यत: निवलेली राख असते. तिचा ढग बनून आसपासच्या परिसरात जाड थरांत जाऊन विसावतो. ही पाण्यासोबत मिसळली असता कॉंक्रीटसारखा घट्ट पदार्थ निर्माण होत असतो. पुरेशा प्रमाणात राख सांडली असता. घरांची छप्परेही कोसळून पडतात. अगदी कमी प्रमाणातही जर ती श्वसनात आली तरी मनुष्यात हानी पोहोचते.

**भुपृष्ठ जलीय आपत्ती**

**पूर:** पूर म्हणे जलाशय भरून बाहेर वाहणारे पाणी. ह्यामुळे आसपासची जमीन बुडून जाते. पुराची युरोपीअन व्याख्या

अशी आहे की, सामान्यत: पाण्याखाली नसलेल्या जमिनीचे, तात्पुरते पाण्यात बुडून जाणे. प्रवाही पाण्याच्या परिभाषेत लाटेच्या अंतप्रवाहासही पूर असे संबोधता येईल. भरून वाहणाऱ्या व अनिर्बंध होणाऱ्या जलाशयांमुळे पुरपरिस्थिती निर्माण होऊ शकते. तलाव अथवा जलाशयाचा आकार, ऋतुनुसार होणाऱ्या पर्जन्यमान व बर्फ वितळण्यातील बदलामुळे बदलु शकत असला तरीही जोपर्यंत बाहेर पडणारे पाणी मानवाच्या वापरातील खेडे, शहर किंवा इतर व्याप्त क्षेत्रास धोका निर्माण करत नाही तोवर तो पुर म्हणुन फारसा महत्त्वाचा नसतो.

**त्सुनामी:**

समुद्रांतर्गत घडलेल्या भुकंपामुळे त्सुनामी लाटा निर्माण होतात. अओ नांग येथील भुकंप, थायलंड २००४ मधील हिंदी महासागरातील भुकंप तसेच लिटुया बे येथे घडलेल्या भुस्खलन अशांसारख्या घटनांमुळे त्सुनामी लाटा उद्‌भवू शकतात.

१) २००४ मधील अओ नांग, थायलंड येथे घडून आलेली त्सुनामी २००४ मधील हिंदी महासागरातील भुकंपाने निर्माण केलेली बॉक्सींग डे त्सुनामी आणि तियलो आपत्ती

२)१९५३ मध्ये लिटुया बे अलास्का येथे घडलेल्या भुस्खलनाने ओढवलेली त्सुनामी.

३) २०१० मधील चिलीतील भुकंपामुळे ओढवलेली त्सुनामी

**हवामानशास्त्रीय आपत्ती:**

**हिमवादळे**: खुप कमी तापमान, तीव्र वारे आणि प्रचंड प्रमाणातील हिमपात या स्वभावात्मक लक्षणांनी युक्त अशा तीव्र स्वरूपाच्या हिवाळी वादळांना हिम वादळे म्हणतात. हिमवादळे आणि हिमवावटळी यातील मुख्य भेद म्हणजे वाऱ्यांची तीव्रता, हिमवादळ म्हणवले जाण्याकरता हिमवावटळीतील वादळाचा वेग ३५ ताशी मैल वा त्याहुन अधिक असणे, दृश्यमानता १/४ मैलापर्यंत कमी होणे आणि ३ वा अधिक तासापर्यंत चालु राहणे ही व्यवच्छेदक लक्षणे दिसुन यावी लागतात. ताज्या हिमतापापेक्षा आधीच झालेल्या हिमपातास घुसळून काढण्याकरीता जमिनीवरील हिमवादळात वेगवान वारे असावे लागतात. हिमवादळांत स्थानिक आर्थिक व्यवहारांवर नकारात्मक प्रभाव पडत असतो आणि हिमपात क्वचित होणाऱ्या भागांत त्यामुळे दृश्यमानता नाहीशी होऊ शकते.

**आग:**

वणवे ह्या वन जमिनीवर पेटणाऱ्या अनियंत्रित आगी असतात, सर्वसामान्य करणे असतात. वीज पडणे आणि दुष्काल पण मानवी निष्काळजीपणा आणि दंगली ह्याही वणवे पेटण्यास कारण ठरत असतात. त्यांच्यामुळे ग्रामीण जीवनास तसेच वन्य जीवांस धोका संभवतो.

दखलपात्र वणव्यांची प्रकरणे म्हणजे १८७१ मधील अमेरिकेतील पेष्टिगो-आग ज्यात किमान १७०० लोक मारले गेले आणि २००९ सालचा ऑस्ट्रेलियातील व्हिक्टोरियन वणवा.

**आपत्ती आणि मानव**

**प्रस्तावना:** २०साव्या शतकाच्या अखेरीस मोठ्या शहरांच्या वैशिष्ट्यामध्ये मोठ्या प्रमाणात विशेष बदल अनुभवास येत आहे. हे बदल भूगर्भाच्या रचनेमध्ये झालेल्या बदलामुळे झाले असावेत. त्यामुळे भुकंप त्सुनामी, थंड वादळी वारे आणि दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तीने विक्राळ रूप धारण केले आहे. जी आज जागतीक समस्या बनली आहे.

नागरी क्षेत्र हे अनेकविध कारणांमुळे सतत मोठ्या

संकटात असते. आज शहरे धोकादायक स्थितीत आहे. उदा. २१ वर्षीमध्ये पुरामुळे हानीची शक्तता पाच पटीने बदलेली असून ही समस्या नागरी वस्ती मधील वाढती लोकसंख्या आणि सामाजिक संरचना यामुळे निर्माण झाली आहे. नैसर्गिक आपत्तीस लढा देण्यासाठी आपत्ती जोखिम व्यवस्थापन कार्यक्रम राबविणे हा आपत्ती थांबवण्यासाठी आपल्याला लोकसंख्या आटोक्यात आणणे गरजेचे आहे. नंतर जंगलतोड थांबवणे निसर्गाला मानवाकडून काही हानी होऊ द्यायची नाही याचे भान घ्यायला नैसर्गिक आपत्ती ही मानवाकडून होणाऱ्या निसर्गाला त्रास यातून होते. नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ-मोठी शहरे उध्वस्त झाली. मानवहानी झाली. जंगलतोड होऊन तिचे सिमेंटचे मोठ मोठी बंगले होत आहेत. निसर्गाने हवामान चक्र बदलले आहे कधी ओला दुष्काळ तर कधी सुका दुष्काळ यामुळे निसर्ग आपत्ती व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

**आपत्ती म्हणजे काय?**

आपत्ती म्हणजे अशी घटना जी की ज्यामुळे प्रभावित परिसरातील जनहिताची, मालमत्तेची मोठ्या प्रमाणावर हानी होते व स्थानिक जनतेचा या परिस्थितीचा तोटा होतो.

आपत्ती काळातील धोके कमी करण्याच्या उद्देशाने धोरणे बनवण्यासाठी स्थानिक देश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मजबुरी करणे महत्त्वाचे असल्याचे मत या परिषदेत मांडण्यात आले. या परिषदेतील एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे बिल्ड बॅक वेटर म्हणजेच पूननिर्माण चांगले असावे आणि त्याच्या रूपरेषा आंतरराष्ट्रीय सहकार्यातून मजबूत कराव्यात.

**हवामानशास्त्रीय आपत्ती:**

**हिमवादळे** : खूप कमी तापमान, तीव्र वारे आणि प्रचंड प्रमाणातील हिमताप या स्वमानवात्मक लक्षणांनीयुक्त अशा तीव्र स्वरूपाच्या हिवाळी वादळांनी हिम वादळे असे म्हणतात. हिमवादळे आणि हिमवादळी यातील मुख्य भेद म्हणजेच ज्यांची तीव्रता हिमवादळे म्हणता येईल. हिमवादळातील वादळाचा वेग ३५ ताशी वा त्याहून अधिक असणे हिमवादळात स्थानिक आर्थिक व्यवहारांवर नकारात्मक प्रभाव पडत असतो आणि हिमवातवंचित होण्याच्या भागांवर त्यामुळे दृश्यमानता नाहिशी होऊ शकते.

**भूकंप:**

भूकंप म्हणजे अंतर्गत भुस्तर आपसांत आदळून पृथ्वीच्या पृष्ठभागाचे हादरणे स्पंदनांचे परिणाम बदलु शकते. भूकंपाचा भूमिगत मुख्य बिंदू केंद्र म्हणुन ओळखला जातो. केंद्राच्या थेट वर पृथ्वीच्या पृष्ठभागावरचा बिंदू प्राप्त केंद्र म्हणून ओळखला जातो. भुपृष्ठीत पूवीतून आढळलेल्या उर्जेचे विभोजन झाल्याने भूकंप घडून येतो. यामुळे मानवहानीही होते. आपण पूर्वसूचना आणि आपत्कालीन व स्थानंतरीची नियोजन यांच्याआधारे आपत्ती टाळू शकतो.

***

# नैसर्गिक आपत्ती

- जाधव शितोष्णा अनिल
(एफ.वाय.बी.कॉम.)

२० व्या शतकाच्या अखेरेस मोठ्या शहरांच्या वैशिष्ट्यांमध्ये मोठ्या प्रमाणात विशेष बदल अनुभवास येत आहे. हे बदल भूगर्भाच्या रचनेमध्ये झालेल्या बदलांमुळे निर्माण झाले असावेत. ज्यामुळे भूकंप, त्सुनामी, पूरसदृश परिस्थिती, थंड वादळी वारे, भुस्खलन आणि दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीने विक्राळ रूप धारण केले आहे. जी आज जागतिक समस्या बनली आहे.

गेली अनेक वर्षे दुष्काळ ही महाराष्ट्राची प्रमुख समस्या बनली आहे. पुरेशा पाण्याअभावी शेती ओसाड होतात. पिकांचे व पर्यायाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते; मात्र आज ही भीषण दुष्काळी परिस्थिती उद्भवण्यामागे निसर्गापेक्षा मनुष्यच अधिक जबाबदार आहे. भारतासारख्या उष्ण कटिबंधीय देशात. जिथे मान्सून असतो तेथे. पाण्याची वानवा निर्माण होणे ही खरेतर फार मोठी विसंगती आहे. इतर देशांच्या तुलनेत आपल्याकडे पर्जन्यवृष्टीमुळे अमाप पाणी उपलब्ध होते; मात्र ते फक्त उपलब्धच होते. या पाण्याचा साठा करण्याचा पद्धती आपण अजुनही आचरणात आणल्या नाहीत. पावसाचे पाणी अडवून, साचवून जमिनित मुरवले म्हणजेच पुनर्भरण केले; तरी दुष्काळाचा तडाखा कमी होण्यास मदत होईल.

नागरी क्षेत्र हे अनेकविध कारणांमुळे सतत मोठ्या संकटात असते. आज शहरे धोकादायक स्थितीत आहेत. उदाहरणार्थ मागील ३१ वर्षामध्ये पूरामुळे हानीची शक्यता ही पाच पटीने वाढली असून ही समस्या नागरी वस्तीमधील वाढती लोकसंख्या आणि सामाजिक संरचना यामुळे निर्माण झाली.

**भूकंप : -**

नैसर्गिक आपत्ती प्रामुख्याने भूभौतिक आणि जैविक स्वरूपाच्या असतात. त्यातील भूगौतिक आपत्तीमध्ये भूकंप, ज्वालामुखी, त्सुनामी लाटा, भूमीपात, चक्रीय वादळे, महापूर, दुष्काळ, हिमपात, हिमवादळे इत्यादीचे समावेश आहे तर जैविक आपत्तीमध्ये विषारी प्राण्यांचा दंश, रोगराई, विषाणू, जीवाणू, जंगलआग, तणनिर्मिती, बुरशीजन्य रोग इत्यादीचा समावेश आहे.

नैसर्गिक आपत्तीच्या प्रमुख आपत्तीचा सविस्तर अभ्यास करणे अत्यावश्यक असते.

पृथ्वीच्या कवचास भूपृष्ठास किंवा त्याच्या अंतर्गत भागास जे कंपायमान होते. हादरे बसतात त्या स्थितीत भूकंप म्हटले जाते.

अचानकरित्या काही क्षण किंवा काळ भू-भागावर जे कंपायमान निर्माण होणाऱ्या कंपनांना आपण भूकंप म्हणतो. त्यावरूनच पी.लोक यांनी भूकंपाची व्याख्या स्पष्ट करताना म्हटले आहे की. ''भूकंप या शब्दामधूनच स्पष्ट होणाऱ्या अर्थानुसार भूकवच हादरणे म्हणजे भूकंप होय.''

भूकवचामध्ये सुरू असलेल्या हालचालीमुळे खडकांच्या थरामध्ये विषम ताण निर्माण होतो आणि तो ताण असह्य झाला की, खडकांचे थर भंग पावून मागे किंवा खालीवर सरकतात. ही विभंगाची क्रीया अकस्मान घडून धक्के बसून हादरे पोहचतात त्यालाच आपण भूकंप म्हणतो.

भूगोल तज्ञ डब्लू.जी. मूर यांच्या विचारानुसार ''नैसर्गिक कारणाने भूपृष्ठाखाली होणाऱ्या हालचालीमुळे भूपृष्ठाला हादरे बसतात त्यालाच भूकंप म्हणतात. याचाच

अर्थ असा की, भूगर्भातील निरनिराळ्या प्रक्रियामधून जी ऊर्जा निर्माण होते. तिच्या परिणामाने भूपृष्ठाला कंप सुटतो.

भौगोलिक दृष्टीने भूकंपानी सर्वाधिक शक्ती ज्या ठिकाणी एकवटलेली असते. त्या ठिकाण्यास भूकंप केंद्र म्हणतात. तसेच भूकंप उत्पत्ती केंद्राला 'भूकंपनाभी'' (Gesmic ॠत्र्ली) म्हणतात. अर्थात भूकंप नाभीपासून भूकंप लहरी सर्व दिशांना पसरतात. भूकंप लहरीची नोंदणी यंत्रावर होते ते यंत्र, सायस्मोग्राफ म्हणून ओळखले जाते.

**आपत्ती व्यवस्थापन**

**❊ आपत्ती व्यवस्थापन समुदाय** :- आपण वृत्तपत्रात नेहमी वाचतो. अतिवृष्टी झाली, पुर आला, विज पडली, भूकंप झाला त्यातून नुकसान झालं वगैरे.

**❊ आपत्ती व्यवस्थापन शाळा** :- प्राथमिक शाळेतील मुलं (विशेशत: ५-१२ वयोगटातील) आपत्तीच्या काळात दुर्बल असतात. अशा वेळी त्यांच्याकडे सर्वात अगोदर लक्ष देणे गरजेचे आहे.

**❊ तात्काळ मदतीला 'स्वरक्षा'** :- रस्ते अपघातानंतर तत्काळ मदत न मिळल्यानेही अनेकांचा जीव जात आहे. आता आपघातग्रस्तांना तत्काळ मदत मिळावी यासाठी महामार्ग पोलिसांनी पुढाकार घेऊन 'स्वरक्षा' नावाचे मोबाईल अप्लिकेशन तयार केले आहे.

**❊ आपत्ती व्यवस्थापन घड्याळ** :- ऋतू निहाय प्रत्येक गाव व गटाची दिनचार्या, कामाचे स्वरूप वेगवेगळे असते. जसं महिला, पुरूष, वृध्द, लहान मुले यांच्या झोपेतून उठण्याची वेळ वेगवेगळी असते. काही गावात महिला लवकर उठून आवराआवर करतात.

**❊ भूकंप** :- भूकवचाखाली असणाऱ्या द्रवरूपी पदार्थामुळे जमिनीस जे हादरे बसतात त्याला भूकंप म्हणतात. भूकंपामुळे जमिनीच्या पोटात असणारे विविध स्तर मागे-पुढे, खाली-वर सरकून जमिनीला भेगा पडल्यामुळे भूकंप होतो. भूगर्भाचा अभ्यास करणाऱ्या काही तज्ज्ञांचा मते जगभरात दरवर्षी सुमारे ३० लाख भूकंप होतात.

**❊ आग** :- इंधन, प्राणवायू (ऑक्सीजन) व उष्णता या तीन गोष्टी एकत्र आल्याने आग निर्माण होते. या मध्ये एखादी गोष्ट नसली तरी आग निर्माण होऊ शकत नाही. आग लागणे ही एक प्रकारची आपत्तीच आहे. आग मानव निर्मित किंवा नैसर्गिक असू शकते.

**❊ भूस्खलनाचे आपत्ती व्यवस्थापन** :- उत्तराखंडमध्ये २०१३ व माळीणमध्ये २०१४ मध्ये झालेल्या प्रचंड पावसामुळे दरडी कोसळल्याने तसेच जमीन खचल्याप्रमाणे भाविक व नागरिक समोर मोठे संकट उभे राहिले होते. अचानक आलेल्या या आपत्तीमुळे भाविक व नागरिक गोंधळून जाणे स्वाभाविक आहे.

**❊ आपत्ती व्यवस्थापन कार्य पद्धती** :- पावसाळ्यात अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण होऊन परिस्थिती गंभीर होते. त्यापार्श्वभूमीवर प्रत्येक जिल्हास्तरावर आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रमाणित कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे.

**❊ पूर** :- अतिवृष्टीमुळे नदी-नाल्यातील पाणी वाढून आसपासच्या परिसरात पसरण्याची परस्थिती म्हणजे थोडक्यात पूर होय.

❊❊❊

# आपत्ती व्यवस्थापन पूर्वतयारी

– चाटे अर्चना अनंत
(एफ.वाय.बी.कॉम.)



आपत्तीचे दोन प्रकार असतात. एक मानवनिर्मित आणि नैसर्गिक आपत्ती. विशेषत: हवामानातील बदलामुळे नैसर्गिक आपत्तीत जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

गावात येणारे महापूर वा अन्य नैसर्गिक संकटाचा मुकाबला करण्यासाठी गावकरांना हिमतीने सज्ज व्हावे. नागरिकांचे मनोबल वाढविण्यासाठी स्थानिक पातळीवर व्यवस्थापनाची गरज निर्माण होते. दरवर्षी सातत्याने येणाऱ्या आपत्तीचा सामना करण्यासाठी आकस्मात येणाऱ्या आपत्तीना तोंड देण्यासाठी अज्ञान तसेच माहितीचा अभाव यामुळे होणारी हानी टाळण्यासाठी कमीत कमी वित्त हानी होईल याची खात्री करण्यासाठी आपत्तीनंतर दैनंदिन जीवन उद्ध्वस्त होऊ नये याची तयारी करावी लागते. स्थानिक पातळीवर आपत्ती व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. तितकाच उत्स्फुर्तपणे लोकसहभाग मिळणे आवश्यक आहे.

विभागस्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येते. नियंत्रण कक्षाची सेवा २४ तास उपलब्ध राहणार आहे. आपत्तीमुळे निर्माण संभाव्य परिस्थितीला हाताळण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. आपत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ग्रामीण लोकांना प्रशिक्षण देणे अत्यंत गरजेचे आहे. समाजावर याचे दूरगामी परिणाम होतात.

पावसाळ्यात अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण होऊन परिस्थिती गंभीर होते. पाश्वभूमीवर प्रत्येक जिल्हास्तरावर आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रमाणित कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे. प्रत्येक विभागांना कामे नेमूण देण्यात आली आहे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आपत्तीच्या प्रसंगी अपवादग्रस्तांना तातडीने मदत देणे व विविध आपत्ती संदर्भात प्रतिबंध निवारण पूर्वतयारी प्रतिसाद मदत व पूनर्वसन इत्यादी बाबी हाताळण्यासाठी जळगाव जिल्ह्याच्या क्षेत्रासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे.

मंडळनिहाय पर्जन्यमापक यंत्र आपल्या जिल्ह्यात प्रामुख्याने पावसाळ्यात अतिवृष्टी होऊन पुरस्थिती निर्माण होत असते. त्यासाठी पर्जन्यमानाचे सातत्याने निरीक्षणासाठी जिल्ह्यात एकूण मॅन्युअल पध्दतीचे एकूण ८६ पर्जन्यमापक यंत्रे मंडळस्तरावर बसविण्यात आली आहे. प्रमाणित कार्यपद्धतीचा अवलंब करताना आपत्तीच्या प्रसंगी व नंतर प्रत्येक विभागाने करावयाची कामे व कार्यपद्धती निश्चित करण्यात यावी.

महाराष्ट्रातील गेल्या सात-आठ महिन्यांच्या अभूतपूर्व दुष्काळाचा व तीव्र पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर राज्यात यंदा अगदी आपत्ती आलेली दिसून येते.

आपत्ती म्हणजे ज्या संकटांमुळे राष्ट्राची किंवा समाजाची मोठ्या प्रमाणात जीवित आर्थिक आणि सामाजिक हानी होते तसेच राष्ट्रावर व समाजावर याचे दूरगामी परिणाम जाणवतात अशा आपत्ती (संकटाला) म्हणतात.

परिसर भूकंप, ज्वालामुखी वादळवारे पूर ढगफुटी यासारखे नैसर्गिक आपत्ती माणसाला पुरते हतबल करून टाकते. नैसर्गिक आपत्तीमुळे कितीतरी लोकांची घरेदारे नष्ट झाली आहेत. आपत्ती व्यवस्थापन ही सध्या काळाची गरज बनत आहे.

भूकंप ही सुद्धा एक आपत्ती आहे. भुकंपामुळे पृथ्वीच्या आतून भूपृष्ठावर अचानक ऊर्जा बाहेर येते ज्यामुळे भूकंपाचा लहरी निर्माण होतात. पृथ्वीच्या पृष्ठभागावर भूकंप स्पंदन थरथरणाऱ्या स्वरूपात आणि कधीकधी जमिनीवर विस्थापन करून स्वत:ला स्पष्ट करतात. भुकंपामुळे भुस्तर गल्यांमध्ये गळतीमुळे येत आहे. भूकंपाचा मूळ भूमीगत बिंदूला भूकंपाचा फोकस असे म्हणतात.

ज्वालामुखी हा सुद्धा आपत्तीचा एक भाग आहे. ज्वालामुखीमुळे बऱ्याच मार्गांनी व्यापक नशा आणि परिणामी आपत्ती येऊ शकते. ज्वालामुखीच्या किंवा स्फोटाच्या विस्फोटानुसार ज्वालामुखीचा उद्रेक ज्यामुळे नुकसान होऊ शकते अशा परिणामांवर आपत्तीचा परिणाम होतो. दुसरे म्हणजे ज्वालामुखीच्या उद्रेकात लावा तयार केला जाऊ शकतो आणि ज्वालामुखीमुळे ज्वालामुखीतून लाव्हाने अनेक इमारती वनस्पती व प्राणी यांना अत्यंत उष्णतेमुळे नष्ट केले आहे.

आपत्ती ही पर्यावरणीय विनाशकारी घटना आहे. मानवी जीवनपद्धती बदलणारी आपत्ती नैसर्गिक व मानवी स्वरूपाची असू शकते. आपत्ती विषयक अशा परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे धोकेदायक परिस्थिती निवळणे म्हणजे आपत्ती व्यवस्थापन होय.

**आपत्ती व्यवस्थापनासाठी पुढील गोष्टी लक्षात घेऊ शकतो.**

**पूर्वतयारी** : संभाव्य धोक्यांची चाचणी, अभ्यास आपत्तीचा अंदाज व इशारा

**प्रतिबंध** : धोके कमी करणे. सातत्यपूर्ण प्रशिक्षण कृतीशील आकस्मितता योजना तयार करणे.

**प्रतिसाद** : तात्काळ आणि एकात्मिक प्रतिसाद मदत, शोध आणि बचाव, प्रथमोपचार

**पूर्वपद** : परिस्थिती पूर्वपदावर आणणे, नुकसान भरपाई कार्यवाही

**पूनर्वसन** : आवश्यकतेनुसार समुपदेशन, पुर्नबांधणी आणि पुनर्वसन

***

# मुलींचे शिक्षण-प्रगतीचे लक्षण

- शेटे निशा अरूण
(एफ.वाय.बी.कॉम.)

'एक सुशिक्षित आई ही शंभर शिक्षकांपेक्षा श्रेष्ठ आहे.' हा आपल्या राष्ट्रपित्याचा संदेश अनमोल आहे. कारण ज्या घरातील स्त्री शिकलेली आहे, ते घर कधीच अशिक्षित राहणार नाही. तरीपण आजही आपल्या देशातील स्त्री-साक्षरतेचे प्रमाण हे पन्नास टक्क्यांपेक्षाही कमी आहे.

खरं पाहता, आज महाराष्ट्र शासनाने मुलींना पहिलीपासून पदवीपर्यंतच्या शिक्षणाची मोफत व्यवस्था केली आहे. त्याशिवाय 'सावित्रीबाई दत्तक बालक' योजनेतून तिला शिक्षणासाठी येणाऱ्या इतर खर्चासाठी मदत मिळू शकते. त्यामुळे आज शहरातून मुली स्त्रिया शिक्षण घेताना आढळतात. आज कित्येक कर्तबगार स्त्रिया जबाबदारीची पदे सांभाळत आहेत. कर्तृत्वाचे कोणतेही क्षेत्र आज स्त्री हुशारीने सांभाळू शकते, हे स्त्रीने सिद्ध केले आहे. तरीही आपल्या देशातील स्त्री शिक्षणाची समस्या कठीण का झाली आहे ?

'किशोरी प्रशिक्षण' या प्रकल्पामुळे आता स्पष्ट झाले आहे की, स्त्री शिक्षणात अनेक अडथळे आजही उभे आहेत. वर्षानुवर्षे आपल्या समाजात स्त्रीला शिक्षणासाठी विरोधच होता. चूल आणि मूल सांभाळायला शाळेत कशाला जायला हवे, अशी मनोधारणा होती. स्त्रीवर अनेक बंधने होती. आजचा समाज या समजूतीतून थोडा-थोडा बाहेर पडला आहे. तरीपण ग्रामीण भागात स्त्री शिक्षणाच्या बाबतीत उदासीनता दिसून येते.

स्त्री शिक्षणातील मुख्य अडचण आहे गरिबी. गरिबीमुळे शासनाने दिलेल्या अनेक सोयीसवलती त्यांच्यापर्यंत पोहोचवू शकत नाहीत. गरीबीने ग्रासलेला माणूस मुलांच्या शिक्षणाचा विचार करू शकत नाही. त्यात भर असते ती पालकांच्या अज्ञानाची. पालकांचे अज्ञानामुळे मुलांना शिक्षणाचा लाभ घेता येत नाही. मुळात पालक अज्ञान असल्याने मुलांनी शिकावे असे त्यांना वाटत नाही. शिक्षणाचे फायदे त्यांना समजत नाही. आपल्या बाळांना शिकवले तर आपले व त्याचे भवितव्य बदलेल, ही जाणीवच या पालकांना नसते.

काही पालकांना जाणीव झाली, तरी परिस्थिती त्यांना आगतिक करते. उदरनिर्वाहासाठी त्यांना दिवसरात्र राबावे लागते. आईबाबा कामावर गेल्यावर लहान भावंडांना सांभाळायची जबाबदारी मोठ्या भावंडांवर विशेषत: मोठ्या मुलींवर येते. परिणामी त्यांना शिक्षण घेता येत नाही. परिणामी अज्ञानाने मुलींना त्याचा त्रास हुंड्याच्या स्वरूपात, व अन्य वेगवेगळ्या मार्गानी सहन करावा लागतो. कित्येक गरीब घरांतून तर या हुंड्याच्या रूढीपायी कित्येक मुली आजन्म अविवाहित राहतात.

जग जसे प्रगत होईल, शिक्षणाचा जसा प्रसार होईल, तसा हा मुलींना शिकू न देण्याची भावना कमी होण्यास मदत होईल. आज शहरांतून तरी शिक्षणाचा खूप प्रसार आहे. मुली पदवीधर झाल्या आहेत. स्वत: मिळवू लागल्या आहेत. तरी काही भागात मात्र स्त्री-शिक्षणाबाबत उदासीनता दिसून येते. त्यांच्या मते उलट, मुलगी जास्त शिकलेली असेल, तर जास्त हुंडा द्यावा लागतो. सध्या हुंडा वेगवेगळ्या स्वरूपात घेतला जातो. मुलाच्या शिक्षणाचा खर्च, वरदक्षिणा, दागदागिने, मानपान, राहण्याची जागा, वाहन, टिव्ही, फ्रिज अशा विविध रूपांत हुंडारूपी भस्मासुर थैमान घालत असतो. ही विचारसरणी स्त्री-शिक्षणाने भरपूर प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. स्त्री शिक्षणामुळे विविध प्रकारच्या अंधश्रद्धा, विविध प्रकारच्या अनिष्ट रूढी, परंपरा इ.ना

आळा बसत आहे. स्त्री-शिक्षणामुळे समाज परिवर्तन, समाज प्रबोधन व्हायला खूप मोठा हातभार लागत आहे.

काही महिला संघटना आपापल्या परीने समाज सुधारण्याचा प्रयत्न करीत आहेत. स्त्री शिक्षणामुळे तिने आज आपली कार्यक्षमता सिद्ध केली आहे. शहरातील स्त्री कचेरीतील बौद्धिक काम लीलया करते. अगदी प्रमुख अधिकारपदही सांभाळते. विद्यालयात, महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य करते. तिने वैद्यकिय क्षेत्राबरोबर स्थापत्य क्षेत्रातही नावलौकिक मिळवला आहे. आजच्या युगातील 'माहिती तंत्रज्ञान' या क्षेत्रातही ती अग्रेसर आहे. ती गाडी, आगगाडी, विमान चालवते. अंतराळात झेप घेते आणि समुद्राच्या तळाशीही संशोधनासाठी जाते. कोणतेही क्षेत्र तिला असाध्य नाही. खेड्यातही स्त्रिया आज पुरूषांच्या बरोबरीने शेतात राबतात, कष्टाची कामे करतात; गुरे सांभाळतात, कुक्कुटपालन अशी कामे करतात; सरपंच, उपसरपंच अशी पदे सांभाळतात आणि गावाचे प्रश्न जिद्दीने सोडवतात. मग आजच्या काळात स्त्री-शिक्षण अनमोल खजिना आहे असे म्हणायला काहीच हरकत नाही.

मुलांना शिकवण्याचा मुद्दा आला की, मुलीपेक्षा मुलाला शाळेत पाठवण्याला प्राधान्य मिळते. कारण तो वंशाचा दिवा असतो ना ! याशिवाय शाळेत जाणाऱ्या मुलींना समाजकंटकांपासून होणारा त्रास, शाळा दूर असणे याही गोष्टी स्त्रीशिक्षणाच्या आड येतात. काही कुटुंबे पोटासाठी गावोगाव हिंडत असतात. मग त्यांच्या शिक्षण कोठून व कसे मिळणार ? 'शाळा तुमच्या दारी' 'फिरत्या शाळा' अशा काही मार्गांनी या समस्या सोडवण्याचा प्रयत्न काही सामाजिक संस्था करत आहेत, पण ते प्रयत्न अपुरेच पडतात.

जोवर स्त्रिया साक्षर, सुशिक्षित होत नाहीत तोपर्यंत समाज निकोप होणार नाही. कारण अज्ञानातून अंधश्रद्धा, अविवेक या गोष्टी येतात. म्हणूनच ज्योतिराव फुले सांगतात की, **'विद्येविना सर्व काही व्यर्थ आहे.'**

***



# स्त्रीभ्रुण हत्येबाबत समाज जागृती गरजेची

**- गिते धृती**
(टी.वाय.बी.ए.)




आज भारतीय समाजात मुलीचा जन्म दुर्भाग्याचा वाटतो. पहिली मुलगी झाली की, घरातील लोकांचा चेहरा हिरमुसतो. पाठोपाठ दुसरी मुलगी झाली तर चिडचिड होते. आणि तिसरी मुलगी झाली की, आईच्या नावाने शिव्याशाप सुरू होतो. मुलगी झाली की समाजात पाप समजले जात असे. अशिक्षित, मागास, बहुजन वर्गात ही धारणा अजुनही आढळते. मुलगा म्हणजे पुत्र मानले जातो कारण नरकापासून तो पित्तरांचे रक्षण करतो अशी समजूत निर्माण झालेली आहे.

पूर्वीपासूनच मुलीचा जन्म ही स्वागत न करणारी घटना मानली जात असे. तिच्या जन्माबाबतच्या नावडीमुळे मुलीमधील बालहत्याची पध्दत कदाचित रूढ झाली असावी. वैदिक काळानंतर स्त्री स्वातंत्र्यावर अनेक बंधने लादली गेली. विधवा स्त्रियांच्या पुर्नविवाहावर बंदी आणल्यामुळे तरूण वयातील विधवा स्त्रीच्या नित्तिमत्तेवर याचा मोठा परिणाम होत असे. समाजात बाल विवाह प्रथा रूढ होती. चांगल्या वैद्यकीय सोयी उपलब्ध नव्हत्या. पुर्नविवाह करता येत नसल्याने अनेक मुलींवर त्याच्या तरूण वयात त्यांच्या घरातील पुरूषांकडून अनेक मुलींवर त्याच्या तरूण वयात त्यांच्या घरातील पुरूषांकडून अत्याचार होत असत. त्यामुळे मातृत्व नशिबी येई. या मातृत्वाला, समाजातील तिरस्काराला बळी पडावे लागते. साहजिकच तिच्या समोर आत्महत्या किंवा भ्रुणहत्या हे दोनच पर्याय असत.

अनेक ठिकाणी मुलींना जन्मत:च मारून टाकले जात असे गुजरातमध्ये दुधपिती नावाची प्रथा होती. नको असलेली मुलगी जन्माला आली की, तिला उकळत्या दूधात बुडवून मारत असे आणि ती स्वर्गाला पोहचली

असे म्हणत. राजस्थानात बाई बाळांतीण व्हायच्या आधीच एक मडकं आणुन ठेवले जात असे. नको असलेली मुलगी झाली की मुली सकट नाळ मडक्यात घालून मडक्याच तोंड बांधुन पुरून टाकीत असे. आंध्र प्रदेशात रंगारेड्डी जिल्ह्यातील आदिवासी समाजात मुलगी झाली की तिचे स्तनपानच बंद करतात. तिला गावाबाहेर निर्जन ठिकाणी ठेवून दिले जाते. तडफडून तिचा जीव जात असे. उत्तर भारतातील काही राज्यांमध्ये मुलगी जन्माला आल्यावर तिला पाण्याच्या हौदात बुडवून मारले जात. प्रत्येक ठिकाणी पध्दत वेगळी असली तरी अंतिमत: क्रिया एकच होती. मुलीच्या बालहत्येची जागा स्त्री भ्रुण हत्येने घेतली आहे. आजही कायद्याने बंदी असताना सुद्धा गर्भजल चाचणी करून मुलींची जन्मापुर्वीच हत्या करण्याचे प्रमाण समाजात दिसत आहे.

मुलींचा जन्मदर कमी झालातर भविष्यात अनेक सामाजिक समस्या निर्माण होतील. कुटुंबसंस्था मोडीत निघतील. स्त्रियांच्या सुरक्षिततेला धोका उत्पन्न होणे, गुन्हेगारीचे प्रमाण वाढणे अशा अनेक समस्या निर्माण होतील. ह्या समस्या कमी करायच्या असतील तर मुलीला मुलापेक्षा कमी लेखण्याची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. मुलगाच हवा असा हट्ट करणे हा विचार गुन्हा करण्यास प्रवृत्त करणारा आहे. या विचारा विरूद्ध मोहिम उघडण्याची गरज आहे. प्रत्येक मुलींना शिक्षण सक्तीचे केले पाहिजे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण देऊन स्वावलंबी बनविले पाहिजे. अल्पवयात लग्न करून देणाऱ्या आई–वडिलांवर गुन्हेगारीचा खटला भरला तर बालविवाह थांबण्यास मदत होईल.

महात्माफुले व सावित्रीबाई फुल्यांनी केशवपन बंद करण्यासाठी संप घडवून आणला होता. आज गर्भजल परीक्षा न करण्यासाठी सर्व डॉक्टरांनी एकत्र येऊन संप करण्याची गरज आहे. भारतात दर हजारी पुरूषांबरोबर स्त्रियांचे प्रमाण घटत आहे, त्याचे समाजावर दुष्परिणाम होत आहे. एकीकडे जगात २०२० मध्ये महासत्ता होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भारतात स्त्रियांच्या बाबतीत उदासिनता दिसते हे दुर्दैवी म्हणावे लागेल. समाज, सेवाभावी संघटना, स्त्रिया यांच्याकडून स्त्री भ्रुणहत्या थांबविण्यासाठी समाजात जागृती घडवून आणणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग असला पाहिजे. त्यांच्यातील सुप्तगुण विकसित करून संपूर्ण मानव जातीचा विकास केला पाहिजे.

***

# स्त्री म्हणजे नेमके काय ?

- गोडसे लक्ष्मण लहानू
(एस.वाय.बी.एस्सी.)

मित्रांनो स्त्री म्हणजे नेमके काय ?

काही थोर पुरूषांनी स्त्री नावाच्या काही व्याख्या केल्या आहे. त्या अशा ''स्त्री म्हणजे एक आई असते तिच्या बाळाची, स्त्री म्हणजे बहिण असते तिच्या भावाची, स्त्री ही पत्नी असते तिच्या पतिची आणि सर्वांत महत्त्वाचा आधार असते कुटुंबाची.''

मित्रांनो आपणाला माहितच आहे की, जेव्हा पासून ही पृथ्वीची निर्मिती झाली आहे, तेव्हा पासून मानवाने भरपूर उत्क्रांती केली आहे, पण आपल्या विचारांत मात्र त्याला क्रांती करता येऊ शकली नाही. म्हणजेच भरपुर पुरातन काळापासून मानव हा स्त्री जातीला आपल्या मुठीत दाबुन धरण्याचा प्रयत्न करत आहे, पण ते कधी शक्य झालेच नाही. कारण पृथ्वीतलावर उपस्थित असलेल्या प्रत्येक प्राणी जीवाला एक स्वतंत्र्य अस्तित्व असते. त्याच प्रमाणे स्त्रीला देखिल एक स्वातंत्र्य अस्तित्व आहे. म्हणुन पुरूष हा स्त्रिचे अस्तित्व हिरावुन घेऊ शकत नाही. आणि स्त्री देखील आपले अस्तित्व हिरावुन देणार नाही. कारण ह्या २१ व्या शतकात स्त्रीयांनी प्रत्येक क्षेत्रात प्रगती केलेली आहे. आणि म्हणुनच पुरूष हा स्त्रीच्या ह्या प्रगतीला अडथळा आणु शकणार नाही.

आज असे कोणतेही क्षेत्र नाही की, ज्यात स्त्रियांनी बाजी मारलेली नाही, किंवा त्यात स्त्रीयांनी हस्तक्षेप केलेला नाही. पायलट असो, पोलीस निरिक्षक, रिक्षा चालक, डॉक्टर, वकील, तिकीट कंडक्टर आणि कलेक्टर तर मुख्यमंत्री पदी देखील स्त्री जाऊन पोहचली आहे. आपणास माहितच आहे की फार प्राचीन काळापासून भारतीय स्त्रीयांना गुणगौरव मिळतच आहे.

पण गेल्या काही दशकात स्त्रीयांचा जन्मदर पुरूषांपेक्षा दर हजारात घटतच आहे ? याचे नेमके कारण काय ? याचे परिणाम काय होतील ? चांगले परिणाम होतील की दुष्परीणाम होतील ह्या २१ व्या शतकात प्रत्येक पुरूषाला फक्त आपल्या वंशाचा दिवा पाहिजे आहे. त्याना फक्त आपल्या घराचे नाव रोषन करण्यासाठी मुलगा पाहिजे आहे पण त्याला याचा अंदाज येत नाही की ज्या प्रमाणे घराचे नाव रोषण करण्यासाठी मुलाची गरज असते त्याच प्रमाणे त्या वंशाच्या दिव्याला जन्म देण्यासाठी एका स्त्रीची गरज असते. प्रत्येकाने मुलगा-मुलगी पाहिजे असा हट्टाहास धरला तर त्या मुलांसाठी मुली कोठुण आणणार आणि जर मुली नसतील तर आपल्या घराचा वंश कसा वाढणार याचा विचार ह्या २१ व्या शतकातील पुरूषाने केला पाहिजे.

जर राजे महाराजे यांच्या काळापासुन स्त्रीयांना महत्त्वाचे स्थान प्राप्त आहे तर ही संस्कृती २१ व्या शतकातील पुरूष का विसरत चालला आहे. इतिहास काळापासून देखील असे कित्येक राजे महाराजे आहेत की ज्यांना फक्त मुलीच आहेत मुलगा नाही. मग त्यांनी हाच हट्टाहास करायचा काय की आम्हाला फक्त राजकुमारच हवा आहे. पण त्यांना ह्या गोष्टीची पूर्णपणे जान होती की, किंवा त्यांनी मुलगा, मुलगी हा भेद कधीच केला नाही.

''मुला पेक्षा मुलगी बरी प्रकाश देते दोन्ही घरी'' ह्या घोषवाक्या नुसार मुलगी ही माहेरी जन्माला येते व तिकडे ति आपल्या शिक्षणाच्या आणि कार्यक्षमतेच्या जोरावर आपल्या दोन्ही घरांचे नाव उज्वल करते. कोणी एका महात्म्याने सांगितलेले आहे की, ''स्त्री शिकली

म्हणजे समान शिकला म्हणजेच आपल्या घरातील स्त्री जर सुशिक्षित असेल तर तिला समाज घडवण्यास वेळ लागत नाही. ती तीचे चांगले संस्कार ती आपल्या कुटुंबातील मुलांना शिक्षण घडवते. त्या स्त्रीयांमुळेच आपल्या मुलांचे मुलांना शिक्षण घडवते. त्या स्त्रीयांमुळेच आपल्या मुलांचे भविष्य सुधारते आणि घरातील मुले शिकली तर त्यांच्यामुळे समाज घडण्यास वेळ लागत नाही.

आणि इतके सारे माहिती असुन देखिल २१ व्या शतकातील पुरूष हा आपली पत्नी गर्भवती असल्यास तिचा गर्भ तपासण्यास दवाखाण्यात जातो आणि मुलगा असेल तर ठिक आणि मुलगी असेल तर नको अशा शब्दांचा वापर करूण आपल्या पत्नीचा गर्भपात करतो. यात फक्त पुरूषच नव्हे किंवा पतीच नव्हे तर सासु, सासरे, डॉक्टर आणि काही समाजात भ्रष्ट लोक सामिल असतात. आणि स्त्रीयांवरती अत्याचार करतात. आणि वारंवार सुनवणी करतात की, ''आम्हाला आमच्या कुळाचा चिराग हवा ''आमच्या वंशाचा दिवा पाहिजे आहे.''आमच्या खानदानीचा वारस हवा आहे. ''जर तो नसेल तर ती मुलगी नको किंवा आमच्या मुलाचा दुसरा विवाह लावून देवू असे घृणास्पद शब्द वापरले जातात. फक्त शब्दच नव्हे तर कधी-कधी मानव जातीला अपमानास्पद असे कृत्य केल्याचे दिसून येते. त्या निरागस, कोवळी कळी जो आत्ताच कुठे उमलणार होती ती उमलण्यापूर्वी तोडून टाकली जाते. त्या बिचाऱ्या, निरागस जिवाचा, निष्पाप जीवाचा काय दोष असतो यात ? तिला अधिकार नाही का ? या जगात येण्याचा ? मग का तिची हत्या केली जाते ? का ?

ती फक्त मुलगी आहे म्हणून, पण आपणांस माहित आहे कि, ज्यांनी झाशीची लढाई जिंकली त्या राणी लक्ष्मीबाई, ज्यांनी राज्याचे राजे महाराजे शिव छत्रपती शिवाजी महाराजांना घडवलं त्या माता जिजाऊ, ज्यांनी आपल्या पतीच्या मृत्यूनंतर त्यांचे संपूर्ण साम्राज्य मोठ्या शौर्याने सांभाळले अशा अहिल्याबाई होळकर आणि ज्यांनी आपल्या पतीच्या सहकार्याने स्त्री शिक्षणाचा प्रसार केला त्या सावित्रीबाई फुले ह्या देखिल स्त्रीच होत्या. मग हा २१ व्या शतकातील पुरूष हा स्त्री भ्रूणहत्येसारख्या घोर पापाचा भागेदारी होत आहे. आणि आपल्या नाजुक निरागस, निष्पाप मुलींची हत्या करत आहे.

हा २१ व्या शतकातील पुरूष हे का विसरते की, आपल्याला जन्म देणारी देखील एक स्त्रीच आहे. जर अशा स्त्रीयांचे प्रमाण कमी होऊ लागले तर पुरूषांना साथ देण्यासाठी स्त्रीया कोठे मिळणार. आणि तो हे देखील विसरून  जातो की आपल्या हातावर राखी बांधणारी बहीण ही स्त्रीच असते. आणि त्याच्या सोबत गृहस्थ जीवन व्यतीत करणारी देखील एक स्त्रीच असते. मग तरीही का २१ व्या शतकातील पुरूषांना आणि मानवांना स्त्रीचे महत्त्व कळत नाही.

आपल्याला मुलगी होणार की मुलगा हे काही आईच्या हातात नसते. किंवा ते आईवरती अवलंबुन नसते. आता विज्ञानाने देखील सिद्ध केले आहे की, पुरूषात्वावर अवलंबुन असते. तरीही काही पती, सासु सासरे हे महिलेवरती टोप लावुन तुच चांगली नाहीस तुझ्यातच दोष आहे. म्हणुन तिला त्रास देतात आणि तिचा छळ करतात. तर काही ठिकाणी सुनेला जाळले, तिला विहरित ढकलुन दिले अशा प्रकारच्या घटणा घडल्याचे दिसुन येते. अन असे लाज्यस्पद कृत्य करतांना त्यांना थोडीशी देखिल दया येत नाही.

म्हणुन शेवटी जातांना सांगावेसे वाटते की ''मुलगा-मुलगी भेद नको, नकोत त्यांचा छळ, फक्त आहे आपले अपत्य हेच आमचा आणि सर्वांना सोनं. ''स्त्री भ्रूण हत्या थांबवणे ही काळाची गरज बनली आहे. नाहीतर काही दिवसांनी स्त्री गुणोत्तर अगदीच कमी होऊन जाईल.

***

# निसर्ग-एक महान गुरू

- महाजन पवन
(एफ.वाय.बी.ए.)

**''देणाऱ्याने देत जावे,**
**घेणाऱ्याने घेत जावे**
**घेता घेता एक दिवस**
**देणाऱ्याचे हात घ्यावे''**

जो जो जयाचा घेतला मी गुण । तो तो म्या केला गुरू जाण ।। ही संत एकनाथ महाराजांची उक्ती वाचली तेव्हा मला सभोवताली असे असंख्य गुरू दिसू लागले. या सर्वांमध्ये निसर्ग हा सर्वश्रेष्ठ गुरू होय, असे मला वाटते. मानवी गुरूपेक्षा निसर्ग हा मानवाचा आगळा वेगळा गुरू आहे. मानवी गुरूसारखा तो वाचाळ नाही. आपल्या कृतीतून तो मानवाला बहुमोल शिकवण देतो. मानवी गुरूला गुरूदक्षिणा द्यावी लागते, उलट निसर्ग हा इतका दिलदार वृत्तीचा गुरू आहे की, मानवालाच त्यांच्या पासून अनेक बहुमोल भेटी लाभतात.

कड्याकपाऱ्यांतून धावत जाणारी आणि जीवन समृद्ध व सस्यट्यामल करणारी नदी ही दातृत्वाचा अमोल संदेश आपल्याला देत असते. दुसऱ्यांसाठी जगलास, तरच खरा जगलास हे सांगणारे वृक्ष आपले जीवनसर्वस्व दुसऱ्यांसाठी वेचतात. उन्हात उभे राहून इतरांना सावली देतात. अनेक वृक्षांनी औषधी पाने, सुगंधी फुले व फळे ही सुद्‌धा दुसऱ्यांच्या सेवेसाठीच असतात. हजारो पक्षी वृक्षांच्या आक्षयाने आपली घरकुले उभारतात.

सूर्य स्वत: अग्निदिव्य करतो व सृष्टीला प्रकाश देतो. जणू तो स्वत:च्या आदर्शातून मानवांना त्यांच्या अवतीभोवतीच्या दारिद्र्याचा दु:ख दैन्याचा अंधार नाहीसा करण्यास सुचवत असतो. अंधाऱ्या रात्रीही आकाशात चमचमणारे चंद्र व तारे 'तम अल्प द्युतिबहु' असेच सुचवत नाहीत का ? हिमालयाची भव्यता व उत्तुंगता, सागराची अथागता, आकाशाची विशालता या साऱ्या गोष्टी माणसाला काहीतरी भव्यदिव्य करावे अशी प्रेरणा देतात.

भूमी हा माणसाचा आणखी एक गुरू आहे. भूमीत पेरलेला एक दाणा हजारो ओंब्या घेऊन वर येतो. पृथ्वीची ही सर्जनशीलता माणसाला निर्मितिक्षम बनवते. वसुधेचे मन एवढे विशाल आहे की ती सर्वांशी समानतेने वागते. राजा असो वा रंक असो शेवटी तो या धरितीच्या कुशीतच चिरनिद्रा घेतो. तिला तुडवणाऱ्यानाही ती गोंजारते म्हणून तर ती क्षमा आहे. माणसाला सर्जनशीलते बरोबरच क्षमाशीलतेची शिकवण देणारी धरतीमाता केवढी महान गुरू आहे बरे !

पशु-पक्षी, विविध प्रकारचे कीटक हे ही निसर्गाचेच घटक आहेत. या सर्वांकडून माणूस काही ना काही शिकत असतो. भिंतीवर जाळे विणणारा कोळी अनेकदा अयशस्वी होतो. तरी पण तो आपला प्रयत्न सोडत नाही. एका मुंगीला नेण्यास अवघड असलेला दाणा अनेक मुंग्या सहकाराने उचलुन नेतात बोचरी थंडी असह्य झाली की पक्षी हजारो किलोमीटरचे स्थलांतर करतात आणि ऋतू बदलला की मागे फिरतात. वादळे वर्षाव टोळधाड अशी नाना संकटे आली तरी निसर्ग आपली सर्जनता सोडत नाही.

''अशा वेळी क्षुल्लक अपयशाने खचून जाणाऱ्या माणसासाठी निसर्गसारखा महान गुरू अन्य कोण बरे असू शकेल ?

निसर्ग लहरी आहे. कारण तो एक थोर कलावंत सुधा आहे. कलावंत वेडे असतात असे सामान्य लोकांच्या व्यवहारात त्यांना रस वाटत नाही. आणि मग जग त्यांना

वेडे म्हणते. या सर्व कलावंताचा गुरू म्हणजेच निसर्ग होय. मग त्यांच्या लहरी पणाचा वाटाही मोठा नसणार का ?

या थोर कलावंताचा हा नभपट तर पाहा. त्याच्या पार्श्वभूमीवरील रंग संगती देखील किती बदलतो हा निसर्गरूपी कलावंत कधीही थकत नाही. त्याचा अदृश्य कुंचला सतत फिरत असतो. बदलत्या ऋतूत बदलती चित्रे कुठे विविध रंगांनी चमकणारी वाळवंटे हा कधी बर्फाने वेढलेले हिमाच्छादित प्रदेश !

या निसर्गाच्या कलेची थोरवी पाहा वयाची असेल तर भूलोकावरील मानवाकडे पाहा. कोणाचा वर्ण शुभ्र तर कोणाचा आरक्त कोणाचा वर्ण पीत तर काहीचा कृष्णवर्ण डोळ्यांच्या छटा विविध तोंडवळ्यात फरक प्रत्येकाची ठेवण वेगळी आहे ना हा निसर्ग थोर व लहरी कलावंत !

कितीही थोर व्यक्ती ह्या, तो निसर्गाची थोरवी मान्य केल्याशिवाय राहणार नाही. मानवी कुंचल्याने करामत केली तरी निसर्गाचे रंग त्यात येऊ शकत नाहीत. बागेत जा, विविध रंगाची फुले पाहा सकाळी छटा दुसऱ्यात नाही एकाच फांदीवर तीन-चार फुललेली असतील; पण त्यातही रंगाच्या छटात फरक हा दिसतो. विविध फुलांचा गंध विविध फुलण्याची वेळ वेगवेगळी प्रत्येक वृक्षाकडे पाहा त्यांची पाने वेगवेगळी. एकच हिरवा रंग त्यांच्या छट्टा किती विविध प्रकारच्या असतात. आपल्याला हे सर्व निसर्गामुळे पाहायला मिळते.

वि.दा. करंदीकरांच्या या ओळी खूप काही सांगून जातात हात किंवा झोळी पुढे असते, पण आपण कोणाला उदारपणे देतो का ? विचार करण्यासारखी गोष्ट आहे. या दृष्टिकोनातून जर आपण निसर्गाकडे पाहिजे. तर निसर्गालाच गुरू मानावा लागेल. तो सर्वांना देत असतो. पण परतफेडीची अपेक्षा तो कधीच करत नाही. निसर्गातील प्रत्येक घटकाचा आपल्याला काहीना काहीतरी उपयोग होतो. साऱ्या विश्वावर पसरलेला नभोमंडप आताला हठाया अर्थात सावली देतो. नद्या दुथडी भरून वाहायला लागल्या की दोन्ही तीर सुजलाम-सुफलाम करून टाकतात. सर्वजण एकजुटीने राहावेत हा संदेश पर्वतराजे आपल्याला देतात. येणाऱ्या संकटाशी कसे तोंड दयावे यांचे समर्थन समुद्राच्या उसळणाऱ्या लाटा करतात. त्याचप्रमाणे निसर्गाचा वापर घर बांधण्यासाठी होतो. आपण निसर्गातील प्रत्येक घटकाची काळजी घेतली पाहिजेत. त्यांची आपण योग्य प्रकारे काळजी घ्यावी.

**''उभारूनी कर, उभे माड हे**
**शिरी वीरांपरी झेलित वृष्टी''**

असा हा सर्वांचा आवडता गुरू निसर्ग मलाही खूप-खूप आवडतो.



***

# स्त्री भ्रुण हत्या एक ज्वलंत समस्या

- काशिद काजल रवी
(एफ.वाय.बी.एस्सी.)

**स्त्री जन्म ही तुझी कहानी**
**तुझा शत्रु ही तुझीच वाणी**
**आईपासून दाईपर्यंत**
**सर्व तुझलाही नवती,**

ज्या घटकावर संपुर्ण जग अवलंबून आहे ते म्हणजे स्त्री. परंतु आजच्या युगात तिचे स्थान दुय्यम आहे. मनाविरूद्ध घडले तरी ती संघर्ष करीत नाही. आज आपण जे ऐकतो पाहतो ते किती भयानक आहे. भारताची कुटुंबपद्धती ही पितृसत्ताक आहे. त्यामुळे पुरातन काळापासून भारतवर्षात स्त्रीचे दुय्यम स्थान आहे. २० व्या शतकापर्यंत स्त्री चुल आणि मुल एवढ्यापर्यंत मर्यादित होती. परंतु २१ व्या शतकात सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई अशा स्त्री समाजसुधारकांमुळे स्त्री आत्मनिर्भर झाली. भारतातील सर्व उच्च पदावर स्त्री असून देखिल सुद्धा कुटुंबात मात्र तिला दुय्यम स्थान आहे.

मुलगा म्हणजे वंशाचा दिवा अशा समजुतीमुळे अल्पशिक्षित, अशिक्षित पुष्कळशा शिक्षित कुटुंबात देखिल मुलालाच प्राधान्य दिले जाते. महाराष्ट्रात दर हजारी पुरूषांमागे स्त्रीयांचे प्रमाण ९२५ व भारताचे ९४० आहे. अहो नाशिक जिल्ह्याचेच ना, पुरूषांमागील स्त्रीयांचे प्रमाण फक्त ८३२ एवढे आहे.

या अशा समजुतीमुळे समाजात मुलीचा गर्भ पाडण्याची प्रवृत्ती वाढिस लागली आहे. त्यामुळे भारतातील पंजाब, हरियाणा यांमध्ये मुलींचे दरहजारी प्रमाण कमी झाले आहे. ० ते ६ वयोगटातील बालिकांची स्थिती यांपेक्षाही गंभीर आहे.

नुकतीच बीड जिल्ह्यातील घटना बघाना ! एका निर्दयी पित्याने २२ दिवसाच्या चिमुकलीला २०० लीटर ड्रमच्या पाण्यात बुडवून मारले. स्त्री भ्रूण हत्येमुळे संपुर्ण जिल्ह्याची प्रतिमा मलिन झाली आहे. स्त्री-भ्रूण हत्येमुळे अनेक डॉक्टर गजाआड झाले असून शास्त्रज्ञांनी जरी उपाय सुचवले परंतु नागरिकांची भूमिका बदलने आवश्यक आहे. जर भूमिका बदलली नाही तर स्त्री-भ्रूण हत्या थांबणार नाही. या सर्व कारणांसाठी पुढील काही वर्षात अतिशय गंभीर परिस्थिती उद्‌भवू शकते. ती उद्‌भवू नये याकरीता शासनाने अतिशय कडक कायदे योजले आहेत.

**''मुलगी म्हणजे जन्माची शिदोरी**
**नका तोडू तिची, आयुष्याची दोरी ।।''**

स्त्रीच्या या अवस्थेसाठी बहुतांशी स्त्री स्वजबाबदार असते. कारण एक स्त्री म्हणून ती स्वत:कडे दुर्लक्ष करते व कुटुंबाची काळजी घेते. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा अशा समजुतीमुळे मुलीचा गर्भ खुडते व मुलाला प्राधान्य देत. खर तर स्त्रीने स्वत: हा जागरूक राहुन गर्भपातास विरोध त्याच बरोबर गर्भलिंग निदानास सुद्‌धा विरोध करायला हवा.

मुलगा जन्माला आला तर 'कुलदिप जन्माला आला... नर देह सार्थकी लागला' या खुशीत आनंदोत्सव साजरा करण्यात येतो. याउलट मुलगी झाली तर 'कार्टी उपजली.... खर्चाची आपत्ती आली' या विचारांनी मन ग्रासले जाते का मुलगी नकोशी झाली. या समाजाला, अशी कोणती गोष्ट आहे. जी मुलगी समाजाला देवू शकत नाही. आणि मी गोष्ट मुलगाच सहज देवू शकतो.

एक आईच आपल्या मुलीला जन्माला येवू देत नाही. याच कारण स्त्री आणि संघर्ष आई बघत असते किती बंधने, किती जाच आपल्याला सहन करावी लागतात. किती स्वातंत्र्य आपल्या वादयाला आलंय, किती दु:ख

तिला सहन करावे लागते. या सर्वांतून मुक्त श्वास घेण्यासाठी तिचं हक्काचं व्यासपीठ म्हणजे मुलगी असते. म्हणूनच तर तिला मुलगी हवी असते. परंतु समाजामुळे तिच्या हातून हे अघोरी कृत्य घडते.

आजही नाही आपल्या भोवती आई, बहीण, मुलगी या विवेकी नात्यांतून वावरत असते. संकटांचा सामना करण्यासाठी तिही सदैव तयार असते. मुलांना शिक्षित करण्यासाठी सामाजिक दोष दुर करून प्रसंगी ती दुर्गेचं रूप धारण करते स्त्री कालही सर्वश्रेष्ठ होती, अन आजही आहे आणि पुरूष तिचा कालही आभारी होता अन् आजही आहे. प्रत्येक यशस्वी पुरूषामागे एका स्त्रीशक्तीचा हात असतो. म्हणून तर नारीशक्तीचे खरे रूप ओळखूण प्रत्येक स्तरांत, समाजात, घरा-घरांत तिचा सन्मान करायला हवा.

स्त्रीच्या कोवळ्या हळूवार मनांच्या भावनांचा विचार केला का तुम्ही ?

पेरेल तसं उगवेल, हे आजकाल उच्च वर्गीय ज्ञानी लोक सुद्धा विसरलेत का ? का ते त्यांच्याच मनाचं समर्थन करतात ?

बागेतल्या एका वेलीला येणाऱ्या कळीची जशी आपण आतुरतेने वाट पहातो मग या संसाराच्या वेलीवर फुलु पाहणाऱ्या कळीच्या अस्तित्वावर अशी घाला का ? तिची हत्या का ?

अहो तिला या सुंदर अंगणात बागडू द्या. तिच्या रूणझुण पैजणाचा नाद करीत तुमच्या कानात आणि मनात सुंदर निणाद !

धावू द्या सावरपाडा एक्सप्रेस तुमच्या ही आयुष्यात, राहून निराळे म्हणजे होईल. ती सुंदर बहीण प्रेमळ वहिनी आणि कर्तव्यदक्ष, ज्ञानी, गुणी, आनंदी एक पत्नी, तिच्या मध्ये ईश्वरीय सामर्थ्य असते. जी आपला संसार, आपली नोकरी, नाती, गोती सर्व लिलया सांभाळते.

ती आपले दु:ख, ईच्छाआकांक्षा सर्व मनात ठेऊन उत्साही राहते, आनंदी राहते.

अहो ! तुमचा मुलगा करू शकेल का या सर्व गोष्टी.

इतरांना सांगण्यापेक्षा स्वपरिक्षण करा
करा थोडा आध्यात्मिक विचार

**नका करू स्त्री-भ्रूण हत्या ।**
**नका करू स्त्री-भ्रूण हत्या यय**

या स्त्रीजीवनाला वाचविण्यासाठी तुम्हा आम्हा सगळ्यांना सजग व्हायचंय आणि सर्वोतोपरी प्रयत्न करायचेत. जेव्हा एक स्त्री-भ्रूण हत्या होत असेल तेव्हा ती हेच म्हणत असेल.

**का तुम्हाला नको मी,**
**दाहिदिशांचा प्रकाश मी,**
**सगळ्यांचा आधार मी,**
**होईल तुमचा श्वास मी,**
**का हे  जग बघण्याआधी**
**तुम्हाला नकोशी झालीय मी ।।**

शेवटी जुन्यापिढीतल्या लोकांची माफी मागुन एकच म्हणावेसे वाटते.

**''पहली बेटी तुप की रोटी**
**दुसरी बेटी धन की पेटी''**

***

# महात्मा गांधी : एक विचार

– मन्सुरी करिश्मा मुनीर



भारताला स्वातंत्र्य मिळवुन देण्यामध्ये अनेक थोरपुरूषांनी आपले योगदान दिले त्यामधील एक थोर महापुरूष म्हणजे मोहनदास करमचंद गांधी. दक्षिण आफ्रिकेत वकिलीचा व्यवसाय करत असतांना त्यांना अनेक अनुभव आले. त्या अनुभवामुळेच त्यांच्या मनात देशाविषयीची आत्मीयता जागृत झाली व तेथुन पुढे देशाला गुलामगिरीतुन मुक्त करण्यासाठी सत्य आणि अहिंसा या मार्गाने त्यांचा प्रवास सुरू झाला. अखेर १५ ऑगस्ट १९४७ ला भारताला ब्रिटिशांच्या जुलमी पाशातुन मुक्त केले. अशा या थोर महापुरूषाने स्वातंत्र्याची लढाई लढत असताना अनेक असामान्य विचार मांडले.

भारताच्या इतिहासात महात्मा गांधीजींचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहले गेले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळवुन देण्यात त्यांचे महत्त्वपुर्ण योगदान आहे. जरी त्यांचा सर्वाधिक संबंध भारतीय स्वातंत्र्य लढ्याशी आलेला असला तरी त्यांचे आर्थिक विचार कमी महत्त्वाचे आहे असे कोणालाही म्हणता येणार नाही. महात्मा गांधीजींनी ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासा संदर्भात आपले अनमोल विचार मांडले आहेत. ते आजही उपयुक्त ठरत आहेत. त्यांनी ग्रामस्वराज्य, स्वयंपुर्ण ग्राम, ग्रामोद्योग, कुटीर उद्योग, खादी, सर्वोदय, आदर्श ग्राम, विश्वस्त इत्यादी संकल्पनांच्या माध्यमातुन आत्मनिर्भर ग्रामीण अर्थव्यवस्थेचे विश्लेषण केले आहे.

महात्मा गांधींनी स्वतंत्र्यरित्या आपले आर्थिक विचार मांडलेले नाहीत किंवा अर्थशास्त्रावर कोणताही स्वतंत्र ग्रंथ लिहला नाही. परंतु त्यांनी राजकारण धर्म निती व जीवनाचे एकुण तत्त्वज्ञान सांगितले आहे. त्यातच त्यांचे आर्थिक विचार विखुरलेले आढळतात. त्यांचे हे विचार एकत्र आणण्याचे कार्य त्यांचे अनुयायी डॉ. कुमाराप्पा यांनी केले आहे. त्यातुनच गांधीवादी अर्थशास्त्राचा जन्म झाला आहे. महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारावर नैतिकतेचा फार प्रभाव दिसून येतो.

महात्मा गांधीजींचे ग्रामीण विकासाबाबतचे विचार तळागाळातील दुर्बल लोकांच्याबरोबर संबंधीत खेड्याच्या परिपुर्ण विकासाशी निगडित होते. महात्मा गांधीजींनी ग्रामीण विकासासाठी परावलंबित्व असणाऱ्या लघु आणि कुटीर उद्योग स्थापनेला प्राधान्य दिले. ग्रांधीजींच्या मते, कष्टाने मिळवलेले स्वातंत्र्य अर्थपूर्ण ठरवायचे असेल तर खेड्यातील प्रत्येक युवक स्वयंनिर्भर झाला पाहिजे. चरखा हे अहिंसेचे प्रतीक असुन त्या माध्यमातुन स्वराज्य निर्माण होऊ शकते, असे गांधीजींचे मत होते. चरख्याच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळु शकतो. त्याचबरोबर ग्रामीण विभागातील स्थानिक व परंपरागत संसाधनांचा पर्याप्त वापर होऊ शकतो. थोडक्यात गांधीजींच्या मते, चरखा हे भारतीय अर्थव्यवस्थेतील दारिद्रय कमी करण्याचे साधन आहे. दक्षिण अमेरिकेतून परत आल्यानंतर गांधीजींनी खादी उद्योगाची चळवळ देशभर सुरू केली. गांधीजींच्या मते, ग्रामीण भागात खादी ग्राम उद्योग उभारल्यामुळे लोकांची होणारी आर्थिक पिळवणुक थांबवता येईल.

गांधीजींच्या मते, खरा भारत खेड्यात आहे. मात्र खेड्यातील आर्थिक व सामाजिक परिस्थिती शहराच्या तुलनेमध्ये मागासलेली आहे. खेड्यात दारिद्रय, आर्थिक विषमता, अस्वच्छता, अनारोग्य उद्योगांचा अभाव अशी परिस्थिती होती. हे सर्व नष्ट करून प्रत्येक खेहे स्वतंत्र स्वयंपुर्ण विकसीत झाले पाहिजे. यासाठी त्यांनी स्वतंत्र खेड्याची संकल्पना सांगितली. गांधीजींनी खेड्यांच्या कल्याणाच्या विकासाच्या योजना लोकांच्यापुढे मांडण्यासाठी सेवाग्राम केंद्र सुरू केले. जे खेडे अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपुर्ण असेल, तेथे दवाखाना, स्वच्छ रस्ते, फळझाडे, समाज मंदिरे, खेड्यांची संरक्षणाची व्यवस्था, सार्वजनिक हॉल, उत्तम सहकार, न्यायपूर्ण पंचायत असेल तर खेडी विकसीत बनेल. गांधीजींच्या मते अशी खेडी निर्माण झाली तर भारताला कमीत कमी समस्यांना तोंड द्यावे लागेल.

ब्रिटिशांनी ग्रामीण भागातील लघु उद्योग धंदे बंद करून स्वत:चा माल विक्रीला आणला होता. त्यामुळे गांधीजी निराश होते. परंतु त्याला प्रतिउत्तर म्हणुन गांधीजींनी स्वदेशी संकल्पना लोकांच्या मनात रूजवुन उत्पादनाला प्रखर विरोध केला. गांधीजींच्या मते, ज्या वस्तु स्थानिक पातळीवर उत्पादित होत नाहीत व ज्या वस्तु देशहिताच्या आहेत अशा वस्तु बाहेर आणल्या पाहिजेत. तसेच प्रत्येकाने आपल्या गरजा कमी केल्या तर अशा वस्तुंची गरज सुद्धा भासणार नाही. केवळ अत्यावश्यक वस्तु आयात केल्या तरी चालतील. परंतु अनेक वस्तुच्या बाबतीत आपण परकीयांवर अवलंबुन राहिलो तर भारतीय उद्योगावर संकट येईल. ते संकट घालण्याकरिता स्वस्त विदेशी वस्तुऐवजी स्वदेशी वस्तु महाग असल्या तरी त्याचा वापर केला पाहिजे. परकीयां बरोबर व्यापार सुरू झाल्यास अनेक हेवेदावे वाढतात. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर परकीय दबाव वाढतो. त्यामधून देशादेशातील संघर्ष वाढीस लागतो व हितसंबंध बिघडतात. हे सर्व अनिष्ट परिणाम टाळण्यासाठी गांधीजींनी स्वदेशी ही संकल्पना मांडली.

महात्मा गांधीजींच्या मते, समाजात आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. ती नष्ट करण्यासाठी गरिबांना संधी देऊन त्यांना सबळ बनविणे, रोजगार देणे, उत्कर्ष साधण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे इत्यादी गोष्टी केल्यास दुर्बलांची उन्नती होऊन गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी कमी होईल. त्यामुळे समाज सुखी आणि समाधानी होईल.

महात्मा गांधीजींनी ग्रामीण विकासाबाबत मांडलेले विचार आजसुद्धा मार्गदर्शक ठरत आहेत. आज खेड्यात आर्थिक व सामाजिक परिस्थिती खालावलेली आहे. ती सुधारण्यासाठी गांधीजींचा लघुउद्योग धंद्यांची स्थापना करण्याचा व ते टिकवण्याचा मंत्र उपयोगी ठरेल असे उद्योगधंदे स्थापन केल्यास ग्रामीण भागात हजारो तरूणांना रोजगार मिळेल व परिणामत: त्या खेड्यांच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल. त्याचबरोबर आज समाजात वर्गभिन्नता निर्माण झाले आहे. गरीब व श्रीमंतांमधील दरी रूदांवत आहे. ती अधिक वाढल्यास वर्ग संघर्ष उफाळून येऊ शकतो. तो थांबवायचा असेल तर ग्रामीण उद्योगांची स्थापना करून रोजगार निर्मिती त्याचबरोबर शेतीकडे विशेष लक्ष देऊन सुधारणा करून उत्पादन वाढवल्यास आजची जी आर्थिक विषमता वाढत आहे ती आपणास कमी करता येईल.

गांधीजींची श्रमाची, श्रमप्रधान उत्पादन तंत्राची व ग्रामवादाची संकल्पना जागतिकीकरणामध्ये टिकुन राहत नाही. कारण जागतिकीकरणामध्ये उत्पादन खर्च कमी करून उत्पादन सुधारणे यावर भर दिला जातो. ग्रामस्वराज्यातील श्रमप्रधान व्यवस्थेत हे साध्य होणार नाही. अशा परिस्थितीत गांधीजींच्या तत्त्वज्ञानातील जे विचार आज लागु पडतात. त्यांचा स्विकार करून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारताचा आर्थिक विकास गतिमान करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, महात्मा गांधीजीं ज्ञानाने अर्थशास्त्राचे अभ्यासक नसले तरीसुद्धा त्यांच्यावरील आर्थिक विचारांमुळे त्यांना अर्थतज्ञ म्हटले तरी वावगे ठरणार नाही. गांधीजींचे ग्रामीण विकास विषयीचे विचार भारतासारख्या विकसनशील देशासाठी की ज्यांच्याकडे समाज अधिक प्रमाणात व भांडवल कमी प्रमाणात उपलब्ध आहे त्यासाठी दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहेत.

गांधीजी हे आजही जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात महत्त्वाचे आहेत. त्यांसाठी गांधीजींचा असा कोणताही एक विचार आपल्याला जाणीवपुर्वक अंगीकारला पाहिजे. असे नाही तर, आपणांस गांधीजींचे जीवन अभ्यासायला हवे 'मेरा जीवन ही मेरा संदेश है ।' असे गांधीजी म्हणाले होते. यास्तव त्यांची जीवनशैली आपण आंगीकारली पाहिजे. जसजसा कालखंड पुढे जाईल, तसतशी या विचारांची आवश्यकता अधिकच भासेल हे नक्की ! या महापुरूषांना किंवा महात्म्यांना मोजण्याची एक पद्धती असते. जितक्या अधिक कालावधीपर्यंत त्यांच्या विचारांची सुसंगती किंवा संदर्भ आढळून येईल, तितका तो महात्मा महान असतो.

गांधीजींचे जीवन असेल आहे. देश, धर्म, भाषा, कालखंड, यापलीकडे जाऊन ते आपल्याला कायमच मार्गदर्शन करीत राहील.

धन्यवाद !

***

# मानवतेचे पाईक : महात्मा गांधी

– बिरारी पुजा सुनिल
(टी.वाय.बी.कॉम.)

''जेथे जेथे दिव्यत्त्वाची प्रचिती तेथे कर माझे जुळती'' या विचारांचा प्रत्यय आपल्याला जगात काही व्यक्तिमत्व व त्यांच्या कार्यातून दिसतो. जगात महान व्यक्तींची संख्या दुर्मिळ असते. आपण त्यांना 'युगपुरूष' असे म्हणतो. अशाच एका महत्त्वाच्या भारतीय युगपुरूषाचे नाव 'महात्मा गांधी !' 'महात्मा' म्हणजेच महान असा आत्मा' लोकांनी त्यांना ही पदवी दिली. महात्मा गांधी जरी आज नसले, तरी त्यांचे विचार व कार्य आजही टिकून आहे. 'जे केले, तेच सांगितले' हेच गांधीजींच्या जीवनाचे सार आहे. 'साधी राहणी, उच्च विचार सरणी' हे माणसाच्या जगण्याचे सूत्र झाले तर अनेक समस्या आपोआप सुटतील, असे गांधीजी नेहमी म्हणत. गांधीजींना समजून घ्यायचे असेल तर पहिल्यांदा हा देश या देशाची संस्कृती, लोक समजून घ्यावे लागतील.

गांधीजींच्या कालात भारत हा पारतंत्र्यात होता. १२५ वर्षांहून अधिक काळ गुलामीत होता. रूढी, परंपरा आणि दारिद्र्यात पिचलेला होता. आपल्या देशाला 'देश' म्हणून संबोधण्यासाठीही इंग्रजांनी नकार दिला होता. आपल्या आसपासच्या प्रत्येक प्रश्नावर गांधीजींनी उत्तर शोधले. ''भयमुक्तीसाठी हाती शस्त्र बाळगणे हा भित्रेपणा आहे.'' असे त्यांचे मत होते. सर्व भयांपासून मुक्त झाल्याशिवाय सत्याचा शोध घेता येत नाही, हेच गांधीजींनी राष्ट्राला सूचविले.

निरक्षर व राबणाऱ्या सामान्य लोकांमध्ये त्यांनी निर्भयता निर्माण केली आणि हीच माणसे इंग्रजांच्या आधुनिक व सुसज्ज बंदुकांना निर्भयतेने सामोरी गेली. गांधीजींनी अहिंसा अंगीकारत इंग्रजी सत्तेविषयीचे भय लोकांच्या मनातून काढून टाकले. या युगपुरूषाचा जन्म २ ऑक्टोबर, १८६९ रोजी झाला. गांधीजी 'भारताच्या' स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख 'नेते' आणि 'तत्त्वज्ञ' होते. भारतातील लोक त्यांना आदराने 'बापूजी' म्हणत.

'अन्याय करणाऱ्यापेक्षा अन्याय सहन करणारा अधिक दोषी आहे. अन्याय सहन करण्याची कृती ही कोणत्या ना कोणत्या भयातूनच होत असते, असे त्यांचे मत होते.

गांधीजींच्या मते ''पृथ्वी प्रत्येकाच्या गरजा भागविण्याइतकी समर्थ आहे. त्याचा योग्य वापर सर्व प्राणीमात्रांनी केला पाहिजे.'' गांधीजींबद्दल नेहमी अपप्रचार केला जातो की, गांधीजी यंत्रविरोधी होते. परंतु वास्तव वेगळेच आहे. मुळात गांधीजी यंत्रविरोधी अजिबात नव्हते. याबाबतच्या एका प्रश्नाला उत्तर देताना गांधीजींनी सांगितले होते, ''मानवी शरीरसुद्धा एक अद्भुत यंत्र आहे. माणूस यंत्राचा गुलाम हेता कामा नये, यंत्र माणसाचे गुलाम झाले पाहिजे.''

याच विचारातून ते कृती करत. त्यांनी स्वत:च्या शरीराला श्रमाची सवय लावली होती आणि इतरांनाही असे करण्यास प्रवृत्त केले होते.

गांधीजींच्या 'नई तालीम' या शिक्षणविषयक विचारांमधूनही हेच सांगता येईल. ''श्रमाला प्रतिष्ठा देणारे शिक्षण हवे. तरच येणाऱ्या काळात भारत प्रगती करू शकेल.'' अशी त्यांना दूरदृष्टी होती. केवळ हेच नव्हे तर गांधीजींचे कितीतरी विचार जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात महत्त्वाचे आहेत. गांधीजींचे लहानपणापासून सत्यावर प्रेम होते. इतिहासाचे मर्म सांगतांना गांधीजींनी प्रेम हाच मानवतेचा स्थायीभाव असल्याचे आवर्जून सांगितले ''वारंवार निर्माण झालेले कलह जर तलवारीच्या किंवा

तोफेच्या जोरावर सोडविले गेले असते तर मानवजात टिकलीच नसती, उलट कलह अजून वाढले असते.'' याचा अर्थ मानवी प्रेरणा मुख्यत: प्रेमाचीच आहे. कलहाचे निराकरण करण्यासाठी युध्द हा एकच उपाय नसून सत्याग्रह हा अधिक प्रभावी पर्याय आहे, हे त्यांनी कृतीतून सिद्ध केले.

'सफेद टोपी' दीर्घ आयुष्य घेऊन जन्मली होती आणि तिचा जन्मदाता गांधीजर जर स्थिर सत्याग्रही, तर कितीही विरोध झाला तरी ती कशी मरणार ? पुढील काळात भारतात सर्वांना सफेद टोपीची सवय झाली.

सर्वांना ती आवडली गरीब माणसांना स्वस्त वाटली म्हणून त्यांनी ती धारण केली. स्वच्छ माणसांनी रोज सहज धुवून साफ करता येईल म्हणून ती धारण केली. मुले सफेद टोपी घालण्यात अभिमान बाळगू लागले. असे करता-करता खादीच्या सफेद टोपीचे नाव प्रसिद्ध झाले...'गांधी टोपी'

गांधी टोपीचे मूल्य पैशात तर फक्त आणि फक्त चारच आणे होते पण आता तर, त्याचे मूल्य इतके अधिक झाले आहे की, ती अमूल्य झाली आहे. 'प्रथम मूल्य' हे की, त्या टोपीची सुरूवात गांधीजींनी केली. 'दूसरे मूल्य' हे की, ती पवित्र खादीची आहे. तिसरे मूल्य हे की, ती नेहमी बगळ्याच्या पंखाप्रमाणे शुभ्र ठेवता येई.

'चौथे मूल्य' हे की ती सुंदर होती. 'पाचवे मूल्य' हेच की ती हलकी, साधी व स्वस्त होती. 'सहावे मूल्य' हे की, ती आपल्या राष्ट्रीय पोशाखाच्या गौरवास पात्र ठरली. 'सातवे मूल्य' हे की तिचे नाव 'गांधी टोपी' असे छापले गेले होते. आणि सर्वांहून अधिक मूल्य तर हेच की, टोपीमुळे खूपशा देशभक्तांनी आपले बलिदान दिले. अशी आमूल्य 'गांधी-टोपी' घालण्याचा कोणाला अभिमान वाटणार नाही.

'महात्मा गांधी' त्या काळातले श्रेष्ठ पुरूष होते. गांधीजींची हत्या हा इतिहास आहे. त्यांची हत्या जरी झाली तरी ते आज संपूर्ण विश्वात जिवंत आहे. काहींच्या मते, आजही गांधी तत्त्वज्ञान आचके देत लाहोरच्या वेशीवर रक्तबंबाळ होऊन उभे आहे. एवढेच नव्हे, अहिंसा, सत्य यांच्या चिंध्या साऱ्या भारतभर विखुरल्या आहेत. बऱ्याचदा हिंदू आणि मुस्लिम यांच्यात मतभेद निर्माण होतात. ढासळत जाणाऱ्या खिलाफत चळवळीला त्यांनी आधार दिला आणि ते मुस्लिमांचे नेते बनले.

'१९४२' मध्ये त्यांनी इंग्रजांविरूद्ध 'भारत छेडो आंदोलन' चालू केले. या आणि यांसारख्या इतर कारणांसाठी त्यांना भारतात तसेच दक्षिण आफ्रिकेमध्ये अनेकदा तुरूंगवास झाला. स्त्रियांचे समान हक्क, सर्व-धर्म समभाव आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे 'स्वराज्य' यासाठी देशभरात चळवळ चालू केली. गांधीजी कोणावर झालेला अन्याय सहन करत नव्हते. स्वत: आपला जीव धोक्यात घालून ते इतरांची सेवाभाव, श्रद्धा, आपुलकी आणि आपल्या विचारांनी ते इतरांना कायम मदत करत राहिले.

गांधीजींचा असा कोणताही एक विचार आपण जाणीवपूर्वक अंगीकारला पाहिजे असे नाही तर आपणास गांधीजींचे संपूर्ण जीवन अभ्यासायला हवे.

''मेरा जीवन ही मेरा संदेश है,'' असे गांधीजींच्या विचार व कृतीबद्दल म्हणता येते. त्यांचे विचार आत्मसात करायला हवेत. यास्तव त्यांची जीवनशैलीही आपण अंगीकारली पाहिजे. 'मानवता सागर की तराह है, अगर सागर की कुछ बुंदे खराब हो, तो पूरा सागर खराब नही होता. अशी पूरोगामी विचारांची व्यक्ती कायम सर्वांमध्ये आहे. जसजसा कालखंड पुढे जाईल, तसतशी या विचारांची आवश्यकता अधिकच भासेल हे नक्की ! महापुरूषांना किंवा महात्म्यांना मोजण्याची एक पद्धती असते जितक्या अधिक कालवधीपर्यंत त्यांच्या विचारांची सुसंगती किंवा संदर्भ आढळून येईल, तितका तो महात्मा 'महान' असतो.

गांधीजींचे जीवन असेच आहे. देश, धर्म, भाषा,

कालखंड यांपलीकडे जाऊन ते आपल्याला कायमच मार्गदर्शन करीत राहतील यंदाचे हे वर्ष गांधीजींचे १५० वे जयंतीवर्ष ! वर्षभर त्यांच्या विचारांचे विविध ठिकाणी जागर सुरू आहेत व राहतील. देश महत्त्वाचा असून भारत हे हिंदू राष्ट्र नसून इथे इतर धर्मियांनादेखील समान हक्क आहे. या एकच तत्त्वासाठी त्यांनी आपले उभे जीवन (आणि मृत्यू) समर्पित केले. आयुष्याची परिणती मृत्यूत होते, हे मनुष्य पुरेपूर जाणतो. प्रत्येकाच्या मृत्यूचा काळ आणि मार्ग मनुष्याला अज्ञात असतो. ''केवळ तर्कशास्त्राच्या आधारावर माणूस जगू शकत नाही, त्याला काव्यही पाहिजे असते'' असे गांधीनी एकदा लिहून ठेवले होते.

'श्रद्धा, सहज प्रवृत्ती, अंतर्ज्ञान व प्रेम हे विषय संवेदनाक्षम आकलनातून व तर्कशुद्ध मानसिक दृष्टीकोनातून पाहावेत, असे नेहमी गांधीना वाटले.

खरचं असा हाडा-मांसाचा माणूस या पृथ्वीतलावर वावरला होता. असा विश्वास प्रत्येक पिढीमध्ये रूजावा, यासाठी गांधीजींच्या विचारांचा सतत जागर झाला पाहिजे. आज गांधीजी नाहीत, तरीदेखील त्यांचे विचार, त्यांची प्रेमभावना आजही 'अमर' आहे.

गांधीजींसारख्या 'महात्मा' शतकातून एखादाच जन्मतो, त्यांचे मूल्य योगदान अमूल्य आहे. येणाऱ्या काळात भारताला महासत्ता बनविण्यासाठी जे सामर्थ्य आपल्याला आवश्यक आहे. त्यामध्ये महात्मा गांधीजींची विचारसरणी आणि कृतीयुक्त शिक्षण केंद्रस्थानी ठेवणे अपरिहार्य असणार आहे. जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी, समतोल विकासासाठी आणि कष्टकरी शेतकरी वर्गाचा दर्जा उंचाविण्यासाठी 'खेड्यांकडे चला', 'साधी राहणी, उच्च विचारसरणी' या तत्त्वांना पर्याय नाही हे आपल्याला समजून घ्यावे लागेल तर आणि तरच महात्मा गांधी शतकानुशतके 'अमर' राहतील.

***



# महात्मा गांधी : एक विचार

**(विद्यापीठ स्तरीय निबंध स्पर्धा प्रथम क्रमांक)**

- **दौंड संगिता संपत** (एम.ए.भाग-१)

**''तोडफोड राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान, रास्ता रोको सारख्या,**
**कृतींना लोक शाहीत काहीही स्थान नाही,**
**जो अशा कृतींना प्रोत्साहन देतो,**
**त्याला लोकशाही बद्दल बोलण्याचा,**
**काहीही अधिकार नाही.''**

असे म्हणणाऱ्या महान व्यक्तीचे नाव 'मोहनदास करमचंद गांधी' असे होते. त्यांचा जन्म गुजरात मधील 'पोरबंदर' येथे एका सुसंस्कृत व प्रतिष्ठित कुटुंबात झाला. गांधी हे वैष्णव वाणी. गांधीजींचे आजोबा 'उत्तमचंद' यांना पोरबंदर संस्थानची दिवाणगिरी मिळाली होती. गांधीजींचे वडील 'करमचंद' हे प्रथम पोरबंदर संस्थानचे व नंतर राजकोट संस्थानचे दिवाण होते. आई 'पुतळाबाई' व वडील हे दोघेही शील संपन्न व धर्मनिष्ठ होते, ते नियमाने धार्मिक ग्रंथाचे पठन करीत व आपल्या मुला-बाळांना धार्मिक कथा सांगून सदाचरणाचे महत्त्व त्यांच्या मनावर बिंबवीत असत. त्यावेळी धार्मिक नाट्यप्रयोग फार होत असत. ते पाहण्यात आणि ध्रुव, प्रल्हाद, हरिश्चंद्र यांच्या कथा ऐकण्यात मोहनदास बालपणी सात ते आठ वर्षांचे असतांना रंगून जात. हरिश्चंद्राच्या अद्भूत रम्य कथेचे त्यांना वेडच लागले होते. अहिंसात्मक सत्याग्रहाला आवश्यक निष्ठेची मनोभूमिका लहानपणीच तयार झाली.

**'तारूण्य हे वाया घालवण्यासाठी नव्हे तर,**
**ते विकासावर विजय मिळवण्यासाठी मिळालेलं आहे.'**

कस्तुरबा आणि मोहनदास यांचे वय सारखेच होते. या दोघांचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी झाला. ही विद्यार्थी दशा होती. घरचे वातावरण शील संपन्नाचे असले, तरी बाहेरचे सवंगडी आणि मित्र निरनिराळ्या कौटुंबिक परिस्थितीत होते, त्यांनी मांसाहार, धुम्रपान, वेश्यागमन इ. गोष्टींचे प्रलोभन मोहन दासांना दाखवण्याचा प्रयत्न केला. परंतु ते त्यात काही काळ फसलेही. नंतर तीव्र पश्चाताप होऊन ते त्यातून लवकरच बाहेरही पडले. १८८७ साली ते मॅट्रिकच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. वडिलांचे निधन झाल्यानंतर वेचरजी स्वामी यांनी पुतळीबाईंना सांगितले की, मोहन दासाला उच्च वैद्यकीय शिक्षणा करीता इंग्लंडला पाठवावे. नंतर १८८८ मध्ये मोहनदास इंग्लंडला गेले. इंग्लंडमध्ये असतांना गांधीनीं 'शाकाहारी मंडळ' स्थापन केले. वडिलांच्या पायापाशी बसून हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती मित्रांच्या संवादामध्ये अनेक धर्मांच्या तत्त्वांचे जे विचार त्यांनी ऐकले, ते इंग्लंडमध्ये गीता, बुद्धचरित्र व बायबल यांच्या वाचनाने अधिक दृढ झाले, गांधीजी १० जून १८९१ रोजी बॅरिस्टर झाले. तत्पूर्वी लंडनची मॅट्रिक परीक्षा ते उत्तीर्ण झालेच होते त्यामुळे ते स्वदेशी परतले.

**''आपल्या योजनेवर विश्वास ठेवणारा एक**
**सूक्ष्म जीव संपूर्ण इतिहास बदलू शकतो.''**

भारतात आल्यावर त्यांनी मुंबई येथे वकिली सुरू केली पण जम बसेना. यावेळी इंग्रजी पद्धतीचा पोषाख ते करीत होते. गांधीजी १८९३ च्या एप्रिलमध्ये दक्षिण आफ्रिकेत गेले. दक्षिण आफ्रिकेत प्रसिद्ध तत्त्वज्ञ सेनापती व सत्ताधारी जनरल स्पट्स यांच्याशीच गांधीनी अनेक वेळा सत्याग्रही संग्राम केला. त्यावेळी नाताळ, ट्रान्सवाल

व ऑरेंज फ्री स्टेट' या तीन स्वतंत्र राज्यात हिंदी लोकांची स्थिती अस्पृश्यांपेक्षाही वाईट होती. हिंदू मजूर मुदतीच्या कराराने तेथे मोठ्या संख्येने नेले जात होते. त्या ठिकाणीच गांधीजींना सक्त मजुरीची शिक्षा झाली. या सत्याग्रहाचे पडसाद आफ्रिकेप्रमाणेच इंग्लंड व हिंदुस्तान येथेही उमटले, त्यानंतर या महान नेत्याने अनेक विचारांचे पैलू समोर येऊ लागले. संपूर्ण इतिहास गांधीनी बदलवण्यास सुरूवात केली, त्यांचे अनेक अमुल्य विचार त्यांनी जगासमोर इतिहासाच्या रूपाने मांडून ठेवलेले आहेत.

**'सच्चा व्यक्तित्व अकेले ही**
**सत्य तक पहुँच सकता है ।'**

गांधीजींच्या वरील विचारानुसार पुढे गांधीजी 'वृत्तपत्रकार' म्हणून ओळखले गेले. गांधीनी आपल्या राजकीय विचारसरणीचा आणि तत्त्वज्ञानाचा प्रचार करण्याकरिता ७ एप्रिल १९१९ पासून 'सत्याग्रही' या संपादकीय नावाखाली 'सत्याग्रह' नावाचे साप्ताहिक सरकारी परवान्याशिवाय प्रसिद्ध करण्यास सुरूवात केली. 'यंग इंडिया' (इंग्रजी) व 'नवजीवन' (गुजराती) ही नियतकालिके १९१९ पासून गांधीजींच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध झाली. नवा विचार, नवी भाषा, नवी वृत्तपत्र पद्धती आणि कसल्याही जाहिराती नसणे, ही या नियतकालिकांची प्रमुख वैशिष्ट्ये होती. 'ना फायदा ना तोटा' या पध्दतीने ही प्रकाशने चालू राहिली. चरखा व स्वदेशी, हरिजन सेवा, सत्याग्रहाचे व असहकारितेचे आंदोलन, आध्यात्मिक जीवन पद्धती, अहिंसेचा महिमा, ग्रामोद्योग, हिंदु-मुस्लिम ऐक्य, अस्पृश्यता निवारण इ. विषयांवर सुंदर इंग्रजीत व गुजराती मध्ये लेखन प्रसिद्ध करण्यात आले. गांधीजींच्या शैलीतून वाचकांना विलक्षण अशी प्रेरणा मिळत होती.

**'अहिंसा का मार्ग तलवार की धार पर चलने जैसा है ।**
**जरा सी गफलत हुई कि नीचे आ गिरे ।**
**घोर अन्याय करनेवाले पर भी गुस्सा न करे,**
**बल्कि उसे प्रेम करे, उसका भला चाहें ।**
**लेकिन प्रेम करते हुए भी अन्याय के वश में न हो ।'**

'गांधीवाद' म्हणून एक स्वतंत्र विचार पद्धती आहे. ही विचार पद्धती अध्यात्म वादावर आधारलेली आहे. किंबहुना तो विशिष्ट प्रकारचा अध्यात्म वाद आहे. गांधीवाद हा धार्मिक मानवता वाद आहे. नीतिशास्त्र, समाज रचना व राजनीती यांसा आधार भूत अशी नैतिकदृष्टी या मानवता वादामध्ये स्वीकारलेली दिसते. 'ईश्वर म्हणजेच सत्य व सत्य म्हणजेच ईश्वर' असे गूढवादी समीकरण गांधीनी मांडले आहे. ईश्वर हेच सत्य, हा उपनिषदांचा व अद्वैत वेदातांचा सिध्दांत आहे. सृष्टीचे वैज्ञानिक पद्धतीने शोधलेले सत्य असा त्या सत्याचा अर्थ नाही, उच्च नैतिक नियम असा या सत्याचा अर्थ आपल्याला दिसून येतो, या संदर्भात मुद्दा उपस्थित करता येईल की, सत्य संशोधनास अंत नसतो. कारण माणसास सत्य पूर्णपणे सापडत नसते सर्वज्ञ कोणी नसतो. म्हणून लोकशाहीत विचार स्वातंत्र्य व प्रचार स्वातंत्र्य हा मुलभूत मानवी हक्क मानला जातो. गांधीजी बुद्धिवादापेक्षा आतल्या आवाजालाच प्राधान्य देत होते.

**''ज्या व्यक्तींमध्ये विचार करण्याची क्षमता असते,**
**त्या व्यक्तीला शिक्षकाचीही गरज नसते.''**

गांधीजी म्हणतात की, ईश्वर हा स्वत:सिद्ध, स्वयंप्रकाश व इंद्रियांच्या आणि बुद्धीच्या पलीकडचा असल्यामुळे, बुद्धिवादाच्या कसोट्या त्याला लागु पडत नाहीत, असा अनुभव सिद्ध आहे. असा अनुभव तपश्चर्येने

व वैराग्याने ज्यांचे अंत:करण शुद्ध झाले आहे, त्यांना म्हणजेच तुलसीदास, चैतन्य, रामदास, तुकाराम यांसारख्या भक्तांना आलेला आहे. ईश्वर हा सर्वांचा अंतरात्मा आहे. सर्व प्राण्यांमध्ये एकच प्राण किंवा जीव आहे व तोच ईश्वर आहे, असे म्हणण्यास वावगे ठरणार नाहीत. विश्व ही ईश्वराची लीला आहे. तो प्रकाश म्हणजे चैतन्य आहे व तोच अनंतानंद आहे.

**'अहिंसा पर आधारित स्वराज्य में,**
**व्यक्ति को अपने अधिकारों को जानना,**
**उतना आवश्यक नहीं है जितना कि,**
**अपने कर्तव्यों का ज्ञान होना ।'**

अहिंसा हा आपल्या मानववंशाचा जीवन धर्म आहे. मानव समाजाचे अस्तित्व अहिसेंवर आधारलेले आहे. शरीर आणि हिंसा यांच्या नित्य संबधाचे हे एक बंध आहे, या बंधातून मुक्त होण्याचा मार्ग 'अहिंसा' हा आहे. शरीर असे पर्यंत कमीत कमी हिंसा म्हणजे अहिंसा असा अर्थ करावा लागेल. शरीरावर जितकी आसक्ती तितकी हिंसा अधिक, म्हणून शरीरावरची आसक्ती कमी केली पाहिजे. शरीरावरील आसक्ती कमी केल्याने म्हणजे तपश्चर्येने संयमाने आत्मशक्ती वाढते, प्रकट होते. सर्वच प्राणिवर्ग अहिंस्य आहे. परंतु मानववंश श्रेष्ठ असल्यामुळे इतर प्राण्यांना वाचविण्याकरिता मानवाची हत्या होता कामा नये. मुंग्या, माकडे, कुत्री इ.इतर प्राण्यांना अन्न देणे हे युक्त नाही, असे एके ठिकाणी गांधी म्हणतात. परंतु याच्या उलटही त्यांची अनेक विचारधारा आपल्याला स्पष्ट करता येतील. **'मांसाहार वर्ज्य करावा'** हे हिंदु धर्मातील अहिंसेचे उत्कृष्ट उत्तर आहे, असेही ते म्हणतात. गायीचा जीव वाचविण्याकरीता प्राणार्पण करणे, याचीही ते प्रशंसा करत. गाय दयेचे काव्य आहे तिची मी पूजा करतो, हिंदु धर्मातील गोपूजा, वृक्षपूजा हे अहिंसेचे प्रत्युत्तर आहे, असे गांधी म्हणत.

**जग बदलायचे असेल तर,**
**आधी स्वत:ला बदलवा'**

गांधीचा ब्रम्हचर्याचा सिद्धांत, हा अहिंसेचाच उपसिद्धांत आहे. इंद्रियांवर, संभोगावर, विजय मिळविल्याशिवाय नि:स्वार्थता प्राप्त होत नाही. नि:स्वार्थता असेल, तरच अहिंसा साधते. संतती सृष्टीमध्ये सतत आवश्यक आहे, कारण परमेश्वराच्या लीलेचा तो भाग आहे. सृष्टी ही परमेश्वराची लीला आहे, परंतु स्त्री-पुरूष संभोग या अपवित्र क्रिया आहेत, अशा प्रकारचा दृष्टिकोन गांदीजींचा होता.

**'सत्य व अहिंसा हे बलवानांचे शस्त्र आहे.'**

सत्य व अहिंसा या दोन नैतिक तत्त्वांवर आधारलेल्या रास्कीनच्या पुस्तकावरून सुचलेला गांधीचा सर्वोदय हे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक तत्त्वज्ञान असते. समाजाचा आध्यात्मिक विकासवाद गांधीजींनी मांडलेला आहे. आर्थिक समता मानवी ऐक्याच्या तत्त्वावर विकसित करणे, ही ऐतिहासिक प्रगतीची गरज निर्माण झाली आहे. सत्याग्रह हे त्याचे साधन आपणांस दिसून येते. विकास व क्रांतीचे प्रयत्न निसर्गाप्रमाणे समाजातही चालणार याची जाणीव गांधीजींना झालेली होती, त्याच त्याप्रमाणे भूकंप, वादळी उलथापालथ ही निसर्गात चालते, तशी समाजातही चालणार त्यामुळे प्रगतीला तिची कित्येक वेळा आवश्यकता असते. परंतु शांतता पूर्ण मार्गाने सामाजिक विकास घडवून आणणे, यावरच गांधीजींचा मुख्यत: भर असायचा. सामाजिक उच्चनीय भाव व हिंदुची अस्पृश्यतेची संख्या हे सर्वोदयवादाशी विरूद्ध आहेत, म्हणुन उच्चनीय भाव व अस्पृश्यता नष्ट करणे, ही गोष्ट सामाजिक प्रगतीची गरज आहे, असा विचार गांधीजींनी मांडलेला आहे.

गांधीजींनी अकरा व्रतांचा स्वीकार केला होता. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, अपरिग्रह, शरीरश्रम,

आस्वाद, निर्भयता, सर्वधर्म समभाव स्वदेशी, अस्पृश्यतेचा त्याग यामधील निर्भयता या तत्त्वाला गांधीजी आधारभूत मानत.

**''तुम्ही मला कैद करू शकता,**
**माझा छळ करू शकता,**
**माझे शरीर नष्ट करू शकता,**
**पण माझ्या मनाला कैद करू**
**शकणार नाहीत.''**

गांधीजींनी आपल्या वेगवेगळया सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडण्यास आपली भूमिका स्पष्ट केलेली आहेत, त्याचप्रमाणे गांधीजींचे अर्थकारण या नवीन विचाराबाबतही मला सांगावेसे वाटते, गांधीजींनी आर्थिक धोरणाची मुलभूत तीन सुत्रे सांगितली आहेत. त्यात प्रथम म्हणजे न संपणाऱ्या नैसर्गिक संपत्तीवर अधिक भर असलेली अर्थव्यवस्था चिरकाल टिकू शकते, अशी अर्थव्यवस्था अंमलात आणली पाहिजे. निसर्ग संपत्तीचे दोन वर्ग एक संपणारा म्हणजे सर्व खनिजे उदा. दगडी कोळसा, लोखंडी धातू, खनिज तेल इ. दुसरा न संपणारा म्हणजे माती, दगड, लाकूड, वनस्पती, धान्ये, फळे, फुले, पाणी, प्रकाश, उष्णता, वायू, प्राणी, जनावरे इ. गांधीनी आपले दुसरे अर्थकारण सांगून गेले ते म्हणजे शरीर श्रमाचे महत्त्व असलेली अर्थव्यवस्था कार्यवाहीत आणली पाहिजे. विशेषत: हातापायांनी, कामे करण्यानेच मानव चांगला सशक्त, शरीराने आणि मनाने निरोगी व दीर्घायुषी राहू शकतो. तसेच त्यांचे तिसरे अर्थकारण ज्या अर्थव्यवस्थेत श्रीमंत व गरीब हा भेद जाचक स्वरूपात राहील, अशी अर्थव्यवस्था असता कामा नये. तत्त्वत: संपत्तीवर खाजगी मालकी कोणाचीच नसावी. शरीरश्रम करील, त्यालाच संपत्तीचा उपभोग घेण्याचा नैतिक दृष्ट्या हक्क आहे. श्रीमंत व गरीब या दोघांनाही असा हक्क आहे, असे गांधीजींचे अर्थकारणाचे विचार आपणांस दिसून येतात.

**'तुमच्या कृतीचे काय परिणाम होतील हे,**
**तुम्हांला कृती करण्याआधी कधीच कळणार नाही,**
**पण तुम्ही काहीच केले नाहीत,**
**तर त्यातून काही निष्पन्नही होणार नाही'**

असे संदेश देणाऱ्या या महान थोर नेत्याची आज १५० वी जयंती. अहिंसा आणि शांतीचा संदेश देणाऱ्या या थोर नेत्याचे विचार आजच्या काळात सुसंगत आहेत, हेच लक्षात येते. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात महात्मा गांधी नावाचे एक सोनेरी पान आहे. आपल्या लढ्याला नैतिकतेची जोड देत या महत्म्याने स्वातंत्र्य लढा नैतिकतेने लढला. म्हणूनच अवघ्या जगाला त्यांची दखल घ्यावी लागली. जगभरातल्या तत्त्वज्ञानात त्यांचा गांधीवादही समाविष्ट झाला, अनेकांनी त्यांच्याकडून प्रेरणा घेतली. अगदी नेल्सन मंडेलापासून अमेरिकेचे आत्ताचे अध्यक्ष बराक ओबामा यांचेही गांधीजी हेच प्रेरणास्थान आहे. गांधीजींनी आपले संपूर्ण संपूर्ण जीवन देशासाठी समर्पित केले, गांधीजींनी आयुष्यात अनेक विषयांवर माहनीय आणि मननीय विचार मांडले. अनेक नवीन विचार नवीन पिढीसमोर आदर्श म्हणून ठेवले.

**''आम्ही आमचा स्वाभिमान कुणाला दिलाच नाही,**
**तर कुणी तो हिरावून घेऊही शकणार नाही.''**

महान विचारांचा नेता या देशात होऊन गेला, यावर नवीन पिढीला विश्वासच बसत नाही, कारण असा आदर्श पुरूष होणे पुन्हा शक्य नाही, असे सुप्रसिद्ध वैज्ञानिक अल्बर्ट आईन्स स्टाईन, म्हणून गेले. त्याकाळात एका वैज्ञानिकाच्या दृष्टीने गांधीचे महत्त्व विशद केले

होते. आजच्या काळातही अमेरिकासारख्या बलाढ्य राष्ट्राचे माजी प्रमुख बराक ओबामा हे सुद्धा गांधीजींना त्यांचे आदर्श मानतात, यातूनच गांधी विचारांची व्याप्ती स्पष्ट होते. ग्रामस्वराज्य असो की ग्रामोद्योग, व्यक्तिगत आचरण असो की राहणीमान, पर्यावरण, आरोग्य सर्वधर्म समभाव, एक नव्हे तर अनेक विषयांवर त्यांनी मांडलेली मते आजच्या बदलत्या काळात सुसंगत असल्याचे दिसून येते. अनेक विद्यापीठात गांधी विचारांचा अभ्यास नव्याने सुरू झाला आहेत, त्यांचे महत्त्व नवीन पिढीला रूजेल आणि समजेल अशा पध्दतीने मांडून त्याची वर्तमानातील समस्यांशी सांगड घालून उपयुक्तता तपासली जात आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण विषयक आंतरराष्ट्रीय परिषदेतही वेळोवेळी गांधी विचाराला महत्त्व देण्यात आले आहे. संयुक्त राष्ट्रसंघानेच निश्चित केलेले 'संस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स' चा आधारही गांधी विचारातच दडलेला आहे.

**'स्वच्छतेविषयीची प्रत्येक कृती,**
**देईल सामाजिक आरोग्याला गती.'**

ग्राम स्वच्छता-ग्रामस्वच्छतेचे महत्त्व गांधीजींनी त्या काळातच ओळखले होते आणि त्याची सुरवात त्यांनी स्वत:पासून केली होती. आज हे सुत्र स्वीकारून देश-विदेशात 'स्वच्छता मोहीम' राबवली जात आहे. भारतात विद्यमान सरकारने तसेच त्या पूर्वीच्या राज्यातील सरकारने वेगवेगळया पध्दतीने पण गांधीजींच्याच स्वच्छतेच्या मंत्राचा आधार घेऊन मोहीम सुरू केल्या आहेत.

दोन युद्धांमध्ये झाला नसेल एवढा सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय विध्वंस गेल्या पंचवीस वर्षांत जागतिकी करणाच्या काळात झालेला दिसतो. यातून उद्‌भवलेल्या भांडवल शाहीने जगभरातील शेवटच्या गरीब आणि सामान्य माणसांच्या अस्तित्वालाच नख लावले आहे, म्हणूनच या भीषण कालखंडात नेल्सन मंडलेपासून बराक ओबामा पर्यंतच्या विवेकशील नेत्यांना फक्त एकच आशेचा किरण दिसतो, ते म्हणजे गांधीजी चोर पावलांनी येऊ पाहणारी धार्मिक झुंडशाही आणि क्रूर राष्ट्रवाद यांना गांधीवाद हेच उत्तर असल्याचे जाणवल्याने उच्च शिक्षित तंत्रज्ञ असो वा शास्त्रज्ञ यांना महात्मा गांधी अध्यासनातील गांधी विचार धारा विभागात प्रवेश घ्यावसा वाटतो, हे गांधीजींच्या १५० व्या जयंतीनिमित्त मला आश्वासक चित्र वाटते.

**'अहिंसा का पुजारी,**
**सत्य की राह दिखानेवाला,**
**ईमान का पाठ पढ़ा गया हमें,**
**वो बापू लाठी वाला ।'**

सत्य-अहिंसेची अनुभूती खेड्यातील जीवनातून मिळू शकते, असे गांधीजी म्हणत, पण आज खेडी ओस पडून शहरात गर्दी वाढु लागली. शहर विकास तज्ज्ञांचे मते, २०५० पर्यंत जगातील ६०% जनता ही शहराकडे वळेल. त्याचा परिणाम पाणी पुरवठा, स्वच्छता आणि पर्यायाने पर्यावरणावरही होईल. त्यातून प्रदूषण ही वाढेल. हे टाळण्यासाठी गांधीजींनी कुटीर उद्योग, ग्रामोद्योगाला प्रोत्साहन देऊन ग्रामीण अर्थव्यवस्था समृद्ध करण्यावर भर दिला होता, त्यामुळे गांधी हे आद्य पर्यावरणवादी होते, असे मला वाटते. गांधीनी कामगारांच्या शोषणाचा कायम विरोध केला होता. आज सुद्‌धा ही समस्या कायम असून त्यावर गांधी विचार हाच उपाय आहे, असे मला वाटते.

**''जिसकी सोच ने कर दिया कमाल,**
**देश का बदल गया सुरते हाल,**
**सबने बोली सत्य और अहिंसा की बोली,**
**हर गली में जली विदेशी वस्त्रों की होली ।''**

शिकागोमध्ये ११ सप्टेंबर १८९३ मध्ये झालेल्या सर्वधर्म परिषदेत विवेकानंद यांनी दिलेल्या भाषणाला १२५ वर्षे पूर्ण झाले आणि देश सध्या गांधीची १५० वी जयंती साजरी करीत आहे. याचा परस्परांशी संबंध आहे. शिकागोतून आव्हानांचे युग संपले आणि आवाहनांचे सुरू झाले. विवेकानंदानी धर्म कोणताही असो प्रत्येक मानवातील आत्मा हा सत्य आहे, असे विचार मांडले होते. तेच विचार पुढे नेत गांधीनी याचा आधारावर 'सत्याग्रहाचा' विचार मांडला. वाईट इच्छांमुळे मानवी शरीरात वाढलेले प्रदूषण कमी करण्यासाठी सत्याग्रहाची विचार आजही तेवढेच सुसंगत आहे. अशा महान नेत्याला आपल्या देशाचा तेवढाच अभिमान होता.

**'असे जगा जसे तुमचा उदयाचा शेवटचा दिवस आहे; आणि असे शिका जसे तुम्हांला कायम जिवंत राहायचे आहे.'**

या संबोधना प्रमाणेच गांधी तत्त्वज्ञ महाकर्मयोगी होते. ते त्या काळच्या प्रत्येक प्रश्नाला भिडले. म्हणून महात्मा केवळ 'पारायणाचा' विषय होऊ शकत नाही. त्याचे सारतत्त्व केवळ बुद्धी आणि तर्काने पकडणे हे पाऱ्याला हातात घेण्यापेक्षाही कठीण. परिणामत: 'जो अवयव ज्याच्या हाती लागला त्या-त्या आंधळ्याने त्याला संपूर्ण हत्ती मानले' या कथेसारखी आपली अवस्था महात्मा गांधी यांच्या बाबतीत होऊ शकते, असे म्हणण्यास काही हरकत नाही.

जगाच्या आजच्या समस्यांना 'गांधी' हे उत्तर आहे असे जेव्हा अगदी प्रामाणिकपणे सांगितले जाते, तेव्हा त्याचा अर्थ काय असतो ? कुठे चालले आहे जग आज ? कसे समाज जीवन हवे होते महात्मा गांधी यांना ? प्रथमत: लहानात लहान आर्थिक युनिट; समाज पाच-पन्नास गावांच की जेणेकरून सामान्यत: एवढ्या परिसरात निर्माण होणाऱ्या वस्तूंवरच भागेल, इतक्या मर्यादित गरजांचे आणि तेही शरीर श्रमांवर आधारित असलेले असे जीवन. तसेच, जास्तीत-जास्त राजकीय अधिकार हे या युनिट मधील लोकांनीच असतील व फारच थोड्या गोष्टींत त्या बाहेरील सत्ता-स्थानांचा त्यात हस्तक्षेप असेल. मात्र, आज गांधीजी यांच्या नंतरच्या पाऊणशे वर्षांत अगदी भारतासहीत संपूर्ण जगबरोबर उलट्या दिशेला अत्यंत वेगाने घोडदौड करीत आहे.

गांधीजी स्पष्टपणे असे नमूद करतात की, 'ही पृथ्वी, हवा, भूमी, पाणी हे सर्व म्हणजे आपल्या बापजाद्यांनी वारसा हक्काने दिलेली मालमत्ता नव्हे, तर ते पुढील पिढ्यासाठीची जोखीम होय, ती किमान जशीच्या तशी त्यांच्या हाती सोपवणे, हे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे.' असे उच्च विचारांचे महात्मा गांधी यांनी जगाला नवीन संदेश देऊन चांगले जीवन जगण्याची प्रेरणा दिली. आजच जगाची जवळपास अर्धी लोकसंख्या शहरात येऊन राहत आहे आणि शहरीकरण अव्याहत प्रचंड वेगाने वाढत चाललेले आहे. केवळ शहरीकरणाने राष्ट्रीय उत्पन्नात किती भर पडते ? याचे हिशोब अर्थतज्ज्ञ देत असतात. पण मुख्य म्हणजे आज खेड्यात जवळपास कोणीच स्वखुशीने राहतांना दिसत नाही. महात्मा गांधीनी एक छान संदेश दिलेला आहेत, 'खेड्याकडे चला' या संदेशामध्ये खूप काही मर्म लपलेले आहे, खेड्यांमधल्या जीवन पद्धतीत एक आनंदी, उत्साही वातावरण असते, त्या वातावरणात सगळे एकत्र येऊन नांदू लागतात, परंतु आज चित्रच बदलत चाललेले दिसते. शहरातील वस्तु, सेवा, सोयी यांचे प्रचंड आकर्षण सर्वांनाच वाटत आहे. श्रम आधारित जीवनाऐवजी जीवनाचे प्रचंड यांत्रिकी करण झालेले आहे,

आणि ते क्षणोक्षणी कमालीच्या वेगाने वाढतानाही दिसून येते.

**'तुम्ही करोडो रूपये खुशाल कमवा परंतु लक्षात ठेवा, की तुमची संपत्ती, तुमची नाहीतर ती जनतेची आहे.'**

अगदी गांधी विचारांचे जन्मापासून संस्कार झालेल्या कुटुंबातील पुढच्या पिढीतील किती जण उच्च स्तराचे जीवनमान देणाऱ्या शहरी नोकरी-व्यवसायांमधील संधी सोडून खेड्यांमधील श्रमावरील जीवन स्वीकारून राहत आहोत, हा आपल्याला 'गांधी उत्तरा' विषयी अंतर्मुख बनवणारा प्रश्न बनु शकतो, म्हणुन गांधीजी म्हणतात कितीही रूपये, संपत्ती कमावली, तरी ती संपत्ती प्रामुख्याने आपल्याला पुढच्या पिढीकडे हस्तांतरीत करावी लागते म्हणजेच ती संपत्ती आपली नाही तर जनतेची असते, असा मौलिक संदेश महात्मा गांधी सांगुन गेले. समाज म्हणून इतिहासात मानवाने तंत्रज्ञान विकासातून निर्माण केलेल्या वस्तु व सेवा याबाबतीत 'खा, प्या, मजा करा' हा चंगळवाद म्हणून नाकारलेल्या नाहीत. उलटआज विज्ञान-तंत्रज्ञानाचा विकास प्रचंड वेगाने वस्तु व सेवांची प्रचंड निर्मिती करीत आहे आणि तेवढ्याच वेगाने सारे जग या सर्व सुविधांचा व सुखांचा आनंदाने स्वीकार करत आहे.

**''एकादा देश आणि त्याची नैतिक मुल्ये, किती महान आहेत हे तिथल्या प्राण्यांना, कशी वागणूक देतात त्यावरून कळून येते.''**

भारतीय राजनिती और समाज का यह परिवर्तन का दौर है। बदलाव के बयार में कुछ भ्रम है, पशुपेश है और कुछ अंतर्विरोध है। बहुत कुछ कहने और ज्यादा से ज्यादा दिखा सकने की कवायद है। समाज में भ्रम है। दुराशा है तो राजनितिक स्तर पर नुरा कुश्ती है। यह कोई नई बात नही है, ऐसा पहले भी हुआ है। बिंदुसार–बिंबसार और अशोक के जमाने से लेकर इंदिरा गांधी – राजीव गांधी और राजा मांडा के कालखंड में – एक के कंधे पे चढ़कर अपनी बिसात बिछाने का और दुसरे की बिछाई चादर पर पाव फैलाकर आराम फरमाने का, चूँकि राजनिती में तो सब कुछ जायज माना जाता है। प्रजा की अधिकारों की किसी राजकारणी नेता को नही रहती, प्रजा को सब कुछ मिलना चाहिए ऐसा कोई राजकारणी नही सोचता उनकी वजह से हम आज उन्हींकी वजह से यहाँ पर है, ऐसा किसी को नही लगता, उनकी वोट की वजह से हम यहा पर है।

राजनिती सत्ता को चलाने का कौशल्य है। समाज हित में कार्य करने के लिए आदर्श की आवश्यकता होती है। इस गुण का संमेकित नाम ही नैतिकता है। सामाजिक आदर्शो की प्राप्ति के लिए व्यक्तीगत और सामाजिक व्यवहार के अनुकूल आचरण करना नैतिकता है, लेकीन वर्तमान में राजनिती, सत्ता को भोगने का कारण बन गई है जिससे चिंतन में विकृति आना शुरू हो गई है। सत्ता को लोभ कुछ राजनितियों को नैतिकता से विमुख करता है।

**'केशरीनाथ त्रिपाठी' कहते हैं, की –**

'जिस राजनिती में नैतिकता नही होगी वह तात्कालिक रूप से अगर सफल भी हो जाए तो उसका

दिर्घकालीन प्रभाव नकारात्मक ही होगा। 'केशरीनाथ त्रिपाठी' पश्चिम बंगाल के राज्यपाल थे।

**'राजर्षी टंडन' कहते हैं :-**

'राजनिती और नैतिकता' इस संदर्भ में 'सत्यम्, शिवम्, सुंदरम्' का आदर्श ग्राह्य है। इसमें सत्य के साथ सार्वजनिक कल्याणकारी कार्य सुंदर तरीके से कार्यान्वित है। बोले, सभी धर्मो में निहीत अनुकरणीय सिद्धांत राजनिती को धर्म से जोड़ते है। किंतू पूजा पद्धती को राजनिती से जोड़ देने पर सामाजिक आदर्श की प्राप्ती नहीं होती हैं। कहाँ की सिद्धांतिक रूप से नैतिकता एवं राजनिती में कोई भी विरोधाभास नहीं है, लेकीन व्यवहार में अवश्य नजर आता है। राजर्षी टंडन राजनिती में नैतिकता के प्रतिक थे। उन्होंने विधान सभा में बिताए अपने तमाम अनुभव भी लोंगो को बताए।

'न्यायमूर्ती गिरिधर मालवीय' ने कहा की:- आज राजनेताओं को नैतिकता का संबल लेकर आगे बढ़ना चाहिए। जिस प्रकार स्वतंत्रता से पूर्व की राजनिती, नैतिकता से जुड़ी थी, उसी प्रकार उन नितीओं को अपनाना चाहिए जिससे राजनिती नैतिकता से अलग न हो।

**'प्रो.एम.पी. दुबे' ने कहा :-**

'राजनिती एवं नैतिकता' दोनो ही अत्यंत गुढ विषय है। जिनकी अनेक व्याख्या मिलती है। नैतिकता के अभाव में संस्कृती का विकास सही दिशा में नहीं हो पाता है। और राजकारणी लोगो से वृक्षारोपण होना जरुरी है, ताकि उन्हें भी उसका महत्त्व समझें।

'राजनिती में नैतिकता' चुनाव सापेक्षिक होती है और व्यावहारिकता सत्ता सापेक्षिक होती है। राजनिती के इस गुणसूत्र यानी डीएनए की खोज मैंने इसकी खोज आप जनता ने को है, जिस पर जमी धूल को झाड कर में किर से पेश कर रहा हूँ। राजनिती के स्क्रैच कार्ड पर सजाई भावनात्मक मर्यादा की पतली परत खुरच चुकी है... अमेठी में छिड़ी जुबानी जंग की गूंज पूरा देश देख सून रहा है। उच्च नैतिकता का आडंबर 'नीच राजनिती' के रसातल में जा घसा है।

**'राजनिती में नैतिकता' बढ़ेगी।**
**तो देश की उन्नती होगी।**

कर्नाटक में भाजपा की सरकार गिरने के बाद विपक्षी दलो की प्रतिक्रिया भी आनी शुरू हो गई है। पश्चिम बंगाल की सीएम ममता बॅनर्जी ने कहा है, की यह लोकतंत्र और क्षेत्रीय मोर्चे (रिजनल फ्रंट) की जीत है उन्होने ट्वीट कर देवगौडा, कुमारस्वामी और काँग्रेस को बधाई दी, दुसरी तरफ पूर्व भाजपा नेता यशवंत सिन्हा ने कहा कही, कर्नाटक ने दिखाया है, कि अभी भी 'राजनिती में नैतिकता' बची हुई है। भारतीय राजनिती में सब कुछ हैं, बस एक तराजू नही है। जिस पर आप नैतिकता तोल सके। चुनाव बाद की कोई नैतिकता नही होती है। राज्यपाल के बारे में संविधान की जितनी धाराए उनकी व्याख्याए रट लें, व्यवहार में राज्यपाल सबसे पहले अपनी पार्टी के हित की रक्षा करते है। यही हम कई सालो से देखते आ रहे है। और यही हम कई सालों तक देखते रहेंगे। राज्यपालो ने संविधान की भावना और आत्मा से खिलवाड़ न किया होता तो कर्नाटक, बिहार, अरुणाचल प्रदेश और उत्तराखंड के मामले में अदालत को राज्यपाल के फैसले पलटने नही पडते। उत्तराखंड में राष्ट्रपती शासन लगाने के फैसले को जब चुनौती दी गई तब उत्तराखंड हार्डकोट ने कहा था लोग गलत फैसले ले सकते है चाहे वे राष्ट्रपती हो या जज ये कोई राजा का फैसला नही है, जिसकी न्यायिक समिक्षा नही हो सकती है।

आम आदमी पार्टी के साथ जुबानी जंग जारी रखते हुए भाजपा ने आरोप लगाया है, की यह पार्टी

'राजनितीक नैतिकता' का पाठ पढ़ाने की कोशिश करती है पर इसके कुछ विधायक सरकारी पदों और सरकारी कार का लाभ उठा रही है बल्कि उन्होने संकल्प किया था की, विधायक को मिलने वाली कोई सुविधा वह नही लेंगे। राजनिती में नैतिकता की सबसे बडी खूबी यह है कि, यह कहाँ और कब से लागू हो कोई भी तय कर सकता है, और जो इसका हिसाब करने निकलेगा वो गणित में फेल होकर केमिस्ट्री में टॉपर बनके निकलेगा। राज्यपाल कौन बनेगा और कैसे हटेगा। ये दो वक्त है जब पता चलता है की राज्यपाल भी होते हैं।

'राजनिती और नैतिकता' दोनो में अब कहाँ संबंध रहे है। राजनिती में साम-दाम-दंड सब जायज होते हैं। यह प्रचिती काल में संभव था। अब नैतिकता को तो राजनेताओं ने खुंटीपर टांग दिया। किसी भी राजनैतिक के नैतीक होने की बात न होतो ही अच्छा है। विशेषकर भारतीय राजनिती में।

※ राजनितीक दलों द्वारा खातो का प्रकाशन करना :

※ राजनितीक दलों का यह उत्तरदायित्व है, कि वे अपनी आय और व्यय के उचित खाते रखे और हर वर्ष उनकी लेखापरिक्षा करवाएँ।

※ निर्वाचन आयोग ने इस प्रस्ताव का एक बार फिर उल्लेख किया है। इसे जल्दी ही लागू किये जाने की आवश्यकता है। अंकेक्षित खातो को जनती की सूचना के लिए उपलब्ध कराया जाना चाहिए।

※ नैतिकता और राजनिती:-

जहाँ राजनिती में नैतिकता की दृष्टी से एक दोषमुक्त वातावरण में पूर्णता की आशा करना अवास्तविक और एकतरफा होगा दुसरी और इस बात से इनकार नही किया जा सकता की राजनिती में जो मानदंड स्थापित किए गए है, वे शासन के अन्य पहलुओं पर महत्त्व पूर्ण असर डालते है।

**※ राजनिती का अपराधीकरण :-**

'अपराधियों का चुनाव प्रक्रिया में भाग लेना' - यह हमारी निर्वाचन व्यवस्था का एक नाजूक अंग बन गया है। समाज मे 'अपराध और हिंसा' वृद्धी होने के अनेक मूल कारण है। कानूने की अनदेखी सेवाओ की खराब गुणवत्ता और उनमे विद्यमान भ्रष्टाचार कानून तोड़नेवालो का राजनितीक, वर्ग, श्रेणी, संप्रदाय या जाति के आधार पर संरक्षण, अपराधो की जाँच में पक्षपातपूर्ण हस्तक्षेप, मामलों का धीमा अभियोजन न्यायिक प्रक्रिया में वर्षो का असाधारण विलंब और ऊँची लागत, असंख्य मामलों का वापस लिया जाना पैरोल की अंधाधुंध मंजुरी आदि ऐसे कारण है जो अधिक महत्त्वपूर्ण है।

चुनाव में बड़ी संख्या में गैर-कानूनी और अनुचित धन का व्यय भ्रष्टाचार का एक और मूल कारण है, और उस पर अंकुश लगाने के लिए कुछ कदम उठाए गए है। फिर भी वास्तव में यह खर्च बहुत अधिक मात्रा के लिए आरोप हैं। साफ-सुथरे ढंग से किए जाने वाले चुनाव राजनिती में नैतिक मुल्यों में वृद्धी करने, भ्रष्टाचार रोकने और प्रशासन को सही ढंग से सुव्यवस्थि करने के लिए एक अत्यंत महत्त्वपूर्ण मार्ग है।

※ हाल ही में किए गए सुधार :-

※ निर्वाचन नामावलियों की परिशुद्धता में सुधार।

※ उम्मीद्वारों के पुर्ववृत्तों का ब्योर देना।

※ दंडित अपराध के दोषी लोगो की अयोग्यता।

※ आचार संहिता का प्रवर्तन करना।

※ स्वतंत्र तथा निर्भिक चुनाव।

※ मंत्रीपरिषद के आकार को कम करना, अधिनियम, सदन। राज्य विधानमंडल की संख्या १५%

तक प्रतिबंधित करता है। यह संशोधन मंत्रियों की संख्या कुछ सिमा तक सामान्य रखने हेतू एक कदम है।

**✲ राजनितीक सुधारों के मुद्दे :-**

राजनितीक कोबों में सुधार :-

भारत में राजनितीक दलों को धन उपलब्ध कराने के स्त्रोतों में निजी दान भी एक स्त्रोत है। आंतरराष्ट्रीय रुप से राजनितीक दलों के लिए राज्य धन के कोष के लिए तीन मुख्य सोपान है। पहला है, अत्यंत ही कम सोपान, जहाँ पर सामान्यत: विशिष्ट अनुदानो या राज्य द्वारा दी गई सेवाओं के माध्यम से चुनावों में आंशिक रूप से आर्थिक सहायती दी जाती हैं। संयुक्त राष्ट्र, आर्यलंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलँड, कॅनडा इस सोपान के उदाहरण है। जब की संयुक्त राज्य इनसे भिन्न है जहाँ चुनाव के लिए अधिकतर निजी धन का प्रयोग किया जाता है और सख्ती के साथ रिपोर्ट देने तथा किये गए खर्च के साथ रिपोर्ट देणे तथा किये गए खर्च को दिखाने एवं सिमित अंशदान आवश्यक शर्तो पर होता है।

दुसरा सोपान अधिकतम धन का प्रयोग करने से संबंधित है, जिसमें सरकारी दोष का धन उसका प्रयोग करने से संबंधित है। जिसने चुनाव के लिए सार्वजनिक धन के रूप में नही होता, बल्कि यह दलों की अन्य गतिविधियों पर भी खर्च होता है। जैसे स्वीडन और जर्मनी। इस सोपान में अंशदानो और खर्चो के विस्तृत नियमन की कमी संलिप्तता रहती है, क्योंकि राजनितीक दल अधिकतर शासन की सहायता पर निर्भर रहते है, और यह स्थानिय आवश्यकताएँ, आंतरिक लोकतंत्र तथा सामान्य पारदर्शिता को प्रभावी बनाता है।

'राजनिती और नैतिकता' को कितना महत्त्व दिया जाता है। यह देश का बच्चा-बच्चा जानता है। लेकीन जाने क्यों बार-बार नैतिकता के सवाल उठते रहते है। जैसा की गुजराज के मुख्यमंत्री नरेंद्र मोदी से उनके त्रिदिवसीय 'सद्‌भावना' उपवास कार्यक्रम के दौरान पत्रकारों ने पुछा की, क्या वे २००२ के गुजरात दंगो की 'नैतिक जिम्मेदारी' किस चिड़िया का नाम है।' मोदी ने अपने शासन की उपलब्धियों और काँग्रेस की ना कामियों की जमकर चर्चा की, तो दुसरी ओर गुजरात काँग्रेस नेताओं ने उन्हे भ्रष्टाचारी और निरकुंश करार देते हुए जवाबी उपवास किया। दोनों उपवासो में अनेक अंतर देखने को मिले। जैसे मोदी को भारी जनसमर्थन मिला और मिडिया कवरेज भी लेकिन सभा में अपेक्षित लोग उपस्थित रहें। जिन्हे १९८४ की दंगो की जिम्मेदारी लेने चाहिए थी, वे 'बडा' पेड़ गिरता है, तो जमीन हिलती है।'' का तर्क प्रस्तृत कर रहे थे। भ्रष्टाचार के लिए आज तक किसी ने स्वंय को दोषी नही माना। रंगे हाथो पकड गए। घर से करोड़ो नकद बरामद हुए लेकीन बेशर्मी से स्वयं को 'षडयंत्र' का शिकार बताया। तोप से चारे तक गोलामाल हुआ, लेकिन दोषी बच निकले। एन्डरसन हो या क्वातारोची, वे इस देश के अपराधी है, लेकिन उन्हे सुरक्षित बचाने वालों ने क्या कभी अपने अपराध को स्विकारा?

नेताओं के विदेशी खाते, भारीभरकम खर्च, शाही जीवनशैली लेकिन देश की आधी से अधिक आबादी को स्वच्छ पेयजल उपलब्ध नही है। आधुनिक शिक्षा और स्वास्थ सुविधाओं की जानकरी तक नही। हजारो गावो में पक्की सड़के नही है, लेकिन यह अंत आंतकवाद, नक्सलवाद, कानून व्यवस्था की दशा क्या है। लेकिन सब खामोश है। यदा-कदा किसी मंत्री को नैतिकता की याद आ जाती है। तो वह नैतिक जिम्मेदारी लेकर फिर से आँखे मूंद लेता है। ऐसा लोगो के लिए नैतिकता की बाते करना सुरक्षा कवच है। खुद को बचाने के लिए नैतिकता की बाते करना सुरक्षा कवच है। भूगोल की चर्चा करना नैतिकता है। कटू सत्य यह है, की राजनिती में दुसरों को

नैतिकता की याद दिलाई जाती है। लेकीन स्वंय भूलकर भी याद दिलाई जाती है। लेकीन स्वंय भूलकर भी याद नही रखा जाता। हाँ, गलती सलामत रहने की गॉरंटी हो और कुछ लाभ होने वाला हो तो 'नैतिक जिम्मेदारी' का ढकोसला करने का जोखिम उठाया जा सकता है।

कभी शास्त्री जी ने एक रेल-दुर्घटना होने पर नैतिक जिम्मेदारी लेते हुए इस्तिफा दे दिया था। लेकिन जब हररोज रेल-दुर्घटना होती है, किसी को भी इस्तिफा देना ऐसी परिस्थितीयों में सुधार नही कर सकता। लेकीन एकवाली सरकारे दुर्लभ होती जा रहीं है। राजनिती में नैतिकता ही नही है।

हमारे देश में यह चिंताजनक पहलू है कि चुनाव बाद के गठबंधनो को पूर्व गठबंधन बेहद आम है। भारतीय अनुभव बताता हैं की इस तरह का गठबंधन साझा सहमती के आधार पर बने कार्यक्रमो को लोग लागू करने के लिए सरकार नही बना पाता। चुनावों के बाद गणित बदल जाता है। कैबिनेट में सीट और अन्य लाभो के चक्कर में यह गठबंधन टूट जाता है। इस कारण सहयोगी घटक सरकार बनाने के लिए सहयोग नही करते और ये दल स्वतंत्र होकर चुनाव बाद के गठबंधन को दरजा देते है। दक्षिण कोरिया और भारत जैसे देशो में चुनाव पूर्व गठबंधन बेहद आम बात है।

इस स्थिती के लिए सभी राजनितीक दल जिम्मेदार है। आम आदमी पार्टी ने सुशासन के नए युग का वादा किया। लेकिन इसका रिकॉर्ड भी उल्लेखनीय नही रहा। चुनाव के दौरान दलबदल लोकतंत्र के लिए बेहद खतरनाक है। अभी दलबदल विरोधी कानून केवल पाला बदलाने वाले निर्वाचित प्रतिनिधीयों पर लागू होता हैं, लेकिन इस संशोधन का अब वक्त आ चुका है। उसमें यह अनिर्वाय कर देना चाहिए की दलबदल करने वाला कोई भी नेता संबंधित पार्टी में पांच साल काम करने के बाद ही टिकट पाने का हकदार होगा। इस मसले में (पर) गांधीजी की प्रसिद्ध उक्ती हैं, 'जब राजनेता सत्ता के खेल में शामिल होते है। तो वो बिना किसी सिद्धांतो के व्यवहार करते है। किसी भी किंमत पर सत्ता में बने रहने का निश्चय अनैतिक है। जब राजनेता या वातावरण अवश्य उत्पन्न हो सकता हैं। इस्तिफा न भी दे लेकीन विनाशकारी परिस्थितीयों के निर्माण के अवसर घटाते-घटाते समाप्त करने का प्रयास तो करें। पिछले कुछ दर्शको/दशको का रिकॉर्ड देखा जा सकता है, किसी भी रेलमंत्री ने व्यवस्था को ईमानदारी से बेहतर बनाने की कोशिश नही की, बल्कि इसे राजनितीक संसाधनो के यप में इस्तेमाल किया। बार बार की जाँच रिपोर्ट पटरियो और पूलों की स्थिती की दशा पर ऊंगली उठाती रही हैं, लेकिन किसी में भी इतना नैतिक तो क्या मानवीय बोध भी नहीं रहा की इस कार्य को प्राथमिकता के आधार पर करतें।

राजनैतिक नुकसान उठाकर भी राष्ट्रहित में कार्य करने की प्रवृत्ती लगता है, विदा हो चूकि है, वरना एक परिवार विशेष के नाम पर हवाई अड्डा, अस्पताल, विश्वविद्यालय, अनेक संस्थान, नगर, बस्तियाँ लेकीन उनसे भी बढ़कर त्यागी, तपस्वी, समर्पित नेताओं को यथोचित सन्मान तक न मिलने ने किसी की नैतिकता को क्यों नही कुरेदा? काश्मीर मे धारा ३७० लगाने अलग-अलग कानून बनाए और उसे जारी रख एक देश में दो व्यवस्थाओं का दोष किसी ने स्विकारा? संविधान में सभी भारतीयों को समानता और अलग-अलग कानून बनाए रखने के औचित्य पर चर्चा तक स्विकार नही, आखिर साध लेते है, की इस देश का सर्वोच्च न्यायालय अनेक बार समान नागरिक कानून बनाने वाला निर्देश दे चुका है? कभी-कभी लगता है, की जिम्मेदारी और नैतिक जिम्मेदारी का सुक्ष्म अंतर समाप्त हो गया है।

नैतिकता भूजल स्त्रोता सी सुखती जा रही है, जैसे जमीन का पाणी लगातार सूख रहा हैं। हमारी आँख का पानी भी सूख रहा हैं। हम रिश्वत देने और बटोरने की बाद भी नैतिकता पर बेशर्मी से घंटो भाषण देते हैं। स्वार्थ की मोटी चादर ने हमारी नैतिकता को ढ़ककर सुला दिया है, जो बार-बार शोर मचाने पर भी नही जागती। नैतिकता बताती हैं, की इसका संबंध अंतरआत्मा से होता है, लेकीन आत्मा-परआत्मा के दूरदर्शनी अवतार भी 'माया महा ठगनी' बताते हुए हजारो हाथों से माया बटोर रहे है। शायद वे नैतिकता की बाते सुनाते-सुनाते इतना थक जाती हैं की अपने जीवने उतारने की सामर्थ्य उनमें शेष नहीं रहती। ईमानदार लोगों को इसलिए टिकट नहीं मिलती क्योंकि उन्होंने अनैतिक तरींको से साधन नहीं जुटाए, बडे नेताओ की चाटूकरिता नहीं की। हमारे देश में 'नैतिकता' होनी जरूरी हैं।

**⁕ नैतिकता का पतन मानवता ⁕**

का पतन ....

नैतिकता का पतन मानवता का पतन यह वाक्य बिलकूल सत्य है। मनुष्य जीवन में नैतिकता का होना बहुत जरूरी है। मनुष्य का चरित्र चला गया तो समझो उसका सबकुछ चला गया। मानव चरित्र में उसकी सबकुछ चला गया। मानव चरित्र में उसकी आदत उसके स्वभाव की नैतिकता का पता चलता हैं। और मनुष्य में नैतिकता नहीं है, तो कभी भी सफल नहीं हो सकता। बिना नैतिकता समाज में विनाश होता है। सब जगह अशांती फैलती है। इसलिए यह सत्य कहा गया है, की 'नैतिकता का पतन मानवता का पतन हैं।

⁕⁕⁕

## मी देवाचे दार

**- कांचन पांडे**

(एफ.वाय. बी.कॉम)

मी देवाचे दार वाजवले,

आतुन आवाज आला, काय पाहिजे?

मी म्हणाले, भरपुर आयुष्य आणि सुख पाहिजे

आतुन आवाज आला, कुणासाठी?

मी म्हणाले,

आता जी कोणी माझी कविता वाचत आहे,

त्या गोड व्यक्तीसाठी....

# आमचा लाडका ब्रुनो

– दुर्गा मारुती तायडे
(११ वी वाणिज्य)

सगळ्यांनाच पाळीव प्राणी पाळायची आवड असते. तशीच मलाही होती. कुत्रा पाळायची आवड खूप आहे. प्राण्यांच्या प्रति माझ्या मनात खूप प्रेम होते.

मी लहान असतांना मला एक कुत्र्याचे छोटे पिल्लू दिसले. ते त्याच्या आईच्या शोधात होते. त्याची अवस्था खूप बिखरलेली होती. मला वाटले की, मी याला घरी घेऊन जावे. पण आई–वडील काय म्हणतील? असा विचार मनात आला. तो विचार विसरून मी कुत्र्यांच्या पिल्लाला घरी आणले. घरी आल्यानंतर त्याला सर्व प्रथम स्वच्छ आंघोळ घातली. स्वच्छ झाल्यावर त्याला खायला दुध–पोळी दिली. तरीही आई म्हणाली ''कशाला आणल ह्या कुत्र्याच्या पिल्लुला''. पण ईलाज नव्हता. पिल्लाची अवस्था मला बघवत नव्हती. मी सर्वांना सांगितले. पिल्लाला मी आणले आहे. आजी नेहमी माझ्या बाजूने बोलत असे. म्हणून आजीच्या समोर कोणी बोलत नसे. हळहळू सर्वांना ब्रुनोची सवय झाली.

त्याचे नाव मी ब्रुनो असे ठेवले. ब्रुनोचा ऐटदारपणा सर्वांनाच आवडायचा. काळा रंग, मानेवर सफेद पट्टा, शेपटीचे थोडेसे टोक सफेद, टपोरे डोळे, बघता क्षणीच तो सर्वांना आवडायचा. त्याच्या ब्रुनो नावामागे ही एक गम्मत आहे. घरी यावर चर्चा सुरू झाली की, त्याचे नाव काय ठेवणार. कोणी म्हणे, टॉमी, तर कोणी म्हणे टायगर. पण मला काहीतरी वेगळं नाव ठेवायचे होते. एके दिवशी मी माझ्या एका आवडत्या इंग्रजी गायकाचे गाणे ऐकत होते. त्या गायकाचे नाव आहे. 'ब्रुनो मार्स' त्या क्षणी मी ठरवले, त्या चिमुकल्या मी 'ब्रुनो' म्हणणार. आई–पप्पा, आजी–बाबा यांनी सुरुवातीला अवघड वाटले. पण नंतर सवट झाली.

सुरुवातीला त्यांची सर्व काळजी मी घेत असे. त्याला आंघोळ घालणे, खायला दुध–पोळी देणे, खेळवणे, डॉक्टरकडे घेऊन जाणे, सर्व देखभाल मी करत असे. काही दिवसांत मात्र ब्रुनो सर्वांचाच आवडता बनला. सगळ्यांना ब्रुनोचा लळा लागला. आता घरातील सर्वजन त्याची काळजी घेऊ लागले.

अनोळखी माणूस गेटच्या समोर येताच ब्रुनो सावध व्हायचा. खूप कडी नजर होती. आमच्या गेटजवळील झाडावर एका चिमणीचे घरटे होते. काही दिवसांत तिचे ३–४ पिल्लू जन्माला आले. ब्रुनोची नजर सतत पिल्लांकडे असायची. त्याच्या मनात काय विचार होता कुणाला कळत नसे. पावसाचे दिवस होते. सुसाट्याचा वारा सुटला होता. आम्ही सर्वजण घरासमोरील ओट्यावर बसलो होतो. ब्रुनो ही होता. अचानक हवेमुळे चिमणीचे पिल्लू खाली पडले. बिचाराला उडता येत नव्हते. ब्रुनो चटकन धावत गेला आणि चिमणीच्या पिल्ल्याला ओट्यावर घेऊन आला. पाऊस संपल्यावर त्या पिल्ला त्या चिमणीकडे देऊन टाकले.

ब्रुनोच्या मनातील भावना आता घरातील सर्वांना समजत होत्या. म्हणून ब्रुनो काय म्हणत आहे ते आम्हांला

कळत होते. त्याला भूक लागली की, तो त्यांची शेपूट हलवत आईच्या मागे मागे फिरायचा. घरात सुद्धा आरामाने वावरायचा. कुणालाही घाबरत नव्हता.

ब्रुनो आता खूप मोठा झाला होता. छान ऐटीत शेपूट हलवत चालत असे. पण काही दिवसांनी मात्र त्याला काय झाले कळालेच नाही? तो रस्त्यावरून जाणाऱ्या प्रत्येकाला भुकांयचा पण चावण्याचा प्रयत्न सुद्धा करू लागला. त्याला लगेच डॉक्टरांकडे घेऊन गेले. डॉक्टरांनी त्याला इंजेक्शन औषधे दिले. परंतु याने त्याला काही फरकच पडला नाही.

आम्ही सर्वांनी असा निर्णय घेतला की याला दूरवर सोडून येऊ. सायंकाळ होताच. पप्पा आणि बाबा ब्रुनोला सोडायला निघून गेले. एका शेतावर असणाऱ्या घराजवळ त्याला सोडून दिले. रात्रीचे जेवण करतांना ब्रुनोची आठवण झाली. मी म्हणाले,''ब्रुनोसुद्धा आपल्याबरोबर जेवण करत असता. पण बिचारा कुठे आहे? माहिती नाही?'' यावर सर्वांची चर्चा सुरू झाली. ३-४ दिवस घरातील कुणालाच करमत नव्हते. खूप प्रेमाने वाढवले होते. ब्रुनो १ वर्ष आमच्या सोबत होता. पण आता नाही. पप्पांनी विचार केला. ब्रुनोला परत आणायचे. पण ब्रुनो मात्र सापडलाच नाही! कुठे गेला? काही माहितच नाही?

आमच्या ब्रुनोची आठवण आत्तासुद्धा सर्वांना येते. काही गोष्टी अशा असतात. त्यांना कितीही विसरण्याचा प्रयत्न केला तरीही ती विसरत नाही. तिची आठवण येतच राहते. जशी आम्हांला आमच्या लाडक्या ब्रुनोची येते.

***

## मुलगी वाचवा

- निलम पाळदे
(टी.वाय.बी.ए)

सुशिक्षित असो वा अशिक्षित असो
सर्वांचा हा एकच धडा
सर्वांना हवा आहे
वंशाचाच दिवा, वंशाचाच दिवा...

झाले जरी असतील
अनेक वृद्धाश्रम
तरी हवा आहे सर्वांना
वंशाचाच दिवा, वंशाचाच दिवा...

अहो....
झाली ती म्हण जुनी
स्वामी तिन्ही जगाचा
आई विना भिकारी
अता त्यास कोणी ना मनी घेई
आता होई
मुली विना जग भिकारी....
मुली विना जग भिकारी....

## निसर्गाचे रूप

– अंकीता पोरजे
(एफ.वाय.बी.ए)

हे निसर्ग रम्य वातावरण
बघूनी, फुलपाखरू जणू,
बोलती...
या निसर्गाचे नवे रूप देखने
या निसर्गात रात्र होते
टळून जाते,
सकाळ होते, उजळून टाकते,
सुर्य येतो, सगळ्यांच्या
मुखावर हास्य उमलते,
नव्याने हे जग उजळून जाते...

## बेटी

– कु. पांडे कांचन सोमनाथ
(एफ.वाय.बी.कॉम)

बेटी तो बेटी होती है।
हर घर में खुशियाँ लाती है।
बेटी होती है, हर घर की शान
वह बढाती है माँ-बाप का मान ।। १।।
बेटी होती है धन की पेटी
फिर क्यू जाँच कराते बेटा है या बेटी ।। २ ।।
जिस घर में मिलता बहू-बेटी को मान
उस घर में रहते सदा लक्ष्मी सह भगवान ।। ३।।
बेटी है तो कुछ नही कम ।
बेटी नही तो गम ही गम
भारत देश में कब होगी स्त्री भृण हत्या कम?
स्त्री भृण हत्या कम? ........... स्त्री भृण हत्या कम?

## गोदावरी

– मयुरी केदार
(एफ.वाय.बी.कॉम)

प्रदुषण हटवा वो...
गोदावरी नटवा वो...
नाही तर होतील रोग विकार, त्रास, व्याधी
ही होई जिवनाची भीषण परिस्थिती
अध्यात्माची प्रतिक आहे, गोदावरी
सर्व संस्कृती जपणारी
तरी आली, ती प्रदुषणाची दारी
तिचा उगम त्र्यंबकेश्वरी...
प्रदुषणाने होईल, तिचा ऱ्हास
मग गुदमरेल सर्वांचाच श्वास
ती आहे, नैसर्गिक धन
तिचा मांडला आपण छळ
ती होईल, जेव्हा भयंकर, निर्भय, प्रलय
तेव्हा ती नाही, करणार कोणाची हयगय
ती नेते आंनदाची डोही या तीरीच्या
त्या तिरी...

तरी अतिक्रमणे आले तिच्या उरी...
पवित्रता व समृद्धीची ती सम्राज्ञी
ती तर आहे, नाशिकची राणी
अशी तिच्या जीवनाची कहाणी
सारे शब्द राहिले अपुरे पुढे तिच्या...
पाहुनी तिची व्यथा
मी गेले भारावून....
म्हणून म्हणते....
प्रदुषण हटवा वो...
गोदावरी नटवा वो...

## आई

- शुभांगी बोथे
(एस.वाय.बी.कॉम)

जगण्याच्या धडपडीत,
घर सुटत पण...
आठवणी कधी सुटत नाहीत...
आयुष्यातलं आई नावाचं पान...
काहीही झालं तरी कधीच मिटत नाही...
तळहाताच्या पाळणा करून सांभाळते ती आपल्याला...
आपल्या आयुष्यात आनंदाचा...
नेहमीच खुलवते ती मळा
आपण जरी विसरलो...
तरी माया तिची कधी घटत नाही
आयुष्यातलं 'आई' नावाचं पानं...
काहीही झालं तरी कधीच मिटत नाही.
तीच्या अखेरच्या श्वासापर्यंत...
तिला आपलाच लळा असतो...
आपलं भलं व्हावं...
ह्यातच तिचा जगण्याचा सोहळा असतो
तिच्या पंखाखाली मन निवांत असते...
चिंता कधी वाटत नाही.
आयुष्यातलं 'आई' नावाचं पान...
काहीही झालं तरी कधीच मिटत नाही
कधीच मिटत नाही

## मैत्री

- हर्षदा गोडसे
(एस.वाय.बी.कॉम)

ओळख नाही बदलत,
वाटा बदलल्या तरी,
ओढ नाही संपत,
पाऊले अडखळी तरी,
चालणं नाही थांबत
अंतर वाढलं म्हणून
प्रेम नाही आटतं
बोलणं नाही झाल तरी,
आठवण नाही थांबत
गाठी नाही बांधल्या म्हणून,
बंधनही नाही तुटतं.
परके झाले तरी
जुनी नाती नाही तुटतं,
रक्ताची नसली तरी
काही नाती नाही तुटतं,
एकही मित्रही नाही असा
माणूस कोठे नसेलच
थोड्यापुरत्या का होईना,
प्रत्येकाने मैत्री केली असेलचं
शरीरात रक्त नसेल तरी चालेल पण,
आयुष्यात मैत्री ही हवीचं
कितीही जुनी झाली तरी
ती वाटते नेहमी नवीच,
रक्ताच्या नात्यात नसेल तेवढी,
मैत्रीच्या नात्याला ओढ असते,
कशी असली तरी शेवटी
मैत्री खूप गोड असते.

## मैत्री म्हटली की...

– कांचन पांडे
(एफ.वाय.बी.कॉम)

मैत्री म्हटली की आठवतं ते बालपण आणि
मैत्रीतून मिळालेल ते खरंखुरं शहाणपण

कोणी कितीही बोललं तरी
कोणाचं काही ऐकायचं नाही
कधीही पकडले गेलो तरी
मित्राची नावं सांगायची नाही.

मैत्रीचं हे नातं सगळ्या नात्यात श्रेष्ठ,
हे नातं टिकवण्यासाठी नकोत खूप कष्ट
मैत्रीचा हा धागा रेशमापेक्षाही मऊसुत
मैत्रीच्या कुशीतच शमते मायेची ती सुप्त भूक.

मैत्रीच्या सहवासात
श्रम सारे विसरता येतात,
पण खरे मित्र मिळविण्यासाठी
कितीतरी पावसाळे जातात.

मैत्री म्हणजे रखरखत्या उन्हात मायेची सावली !
सुखाच्या दवात भिजून
चिंब चिंब नाहली!

मैत्रीचं बंध कधीच नसतात तुटणारे
जुन्या आठवणींना उजाळा देऊन
गालातल्या गालात हसणारे
अशी ही मैत्री सगळ्यापेक्षा न्यारी
या मैत्रीच्या या नात्यात कधी ही ना पडो दुरावा.

## आई (संकलीत)

– आश्विनी पोरजे,
(एस.वाय.बी.एस्सी)

'आई' म्हणोनि कोण । आईस हाक मारी
ती हाक येई कानी । मज होइ शोककारी
नोहेच हाक, मारी । मारी कुणी कुठारी
आई कुणा म्हणु मी । आई घरी न दारी ।।
ही न्युनता सुखाची । चित्ता सदा विदारी ।
स्वामी तिन्ही जगाचा । आईविना भिकारी ।।

चारा मुखी पिल्लांचा । चिमणी हळून देई ।।
गोठ्यात वासरांना । या चाटतात गाई ।।
वात्सल्य हे पशुचे । मी रोजरोज पाही
पाहून अंतरात्मा । व्याकूळ मात्र होई ।।

वात्सल्य माउलीचे । आम्हा जगात नाही ।
दुर्भाग्य याविना का । आम्हांस नाही आई ।
येशील तु घराला । परतून केधवा ग ।।
दवडू नको घडीला । ये ये निघून वेगे ।।
हे गुंतले जिवीचे । पायी तुझ्याच धागे ।
रूसणार मी न आता । जरि बोलशील रागे ।
ये रागवाक्याही । परि येइ-येई वेगे ।।

## मेरी कहानी

**- अनिकेत गावंडे**

(एस.वाय.बी.ए)

बेटी बनकर आयी, मैं माँ-बाप के जीवन में।
बसेरा होगा कल मेरा किसी और के आँगन में,

क्यों यह रित भगवान ने बनाई होगी।
कहते है आज नही तो कल तू परायी होगी,

देकर जनम पाल-पोसकर जिसमे हमे बड़ा किया। और बुरा वक्त आया तो उन्ही हाथों ने हमे विदा किया।

टूट कर बिखर जाती है हमारी जिंदगी वही, पर फिर भी उस बंधन मे प्यार मिले जरूरी ते नहीं।

यह रिश्ता हमारा इतना अजीब होता है क्या बस यही हम बेटियों का नसीब होता है क्या?

## गुरूपौर्णिमा

**- कांचन पांडे**

(एफ.वाय.बी.कॉम)

जमलोय सर्व आज,
पौर्णिमेला
वंदन आमुचे गुरुजनांना ।।

आयुष्याच्या या टप्प्यावर,
मी भक्कम उभा
कारण धरला होता, तुम्ही
हात आमचा

एक उनाड-अजाण, होतो
बच्चे आम्ही
घडलो सुजाण, तुमच्या
आशिर्वादांनी

केली सुरुवात, हातचा
वजाबाकींनी
हिशोब चुकतो
आयुष्याच्या घडामोडींनी

नव्हती ठाऊक तेव्हा, उत्तरं
प्रश्नांची
दिल्या कित्येक परीक्षा
जेव्हा खेळलो जीवनाशी

होता तुमचा हात, आमच्या
पाठीवरी
म्हणूनच जिंकलो आम्ही,
कसोटी प्रसंगाची

# अहवाल

# मराठी विभाग

**प्रा. दिलीप जाधव**
विभाग प्रमुख

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून मराठी हा विषय भाषिक कौशल्य विकास व व्यक्तिमत्व विकास या हेतूने शिकवला जातो.

मराठी विषयाला सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात पुढीलप्रमाणे विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता.

| अ.नं. | | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | प्रथम वर्ष कला | ५९ | ७६ | १३५ |
| २. | प्रथम वर्ष वाणिज्य | ६१ | ७९ | १४० |
| ३. | द्वितीय वर्ष कला | ४५ | ९२ | ९२ |
| ४. | तृतीय वर्ष कला | ४४ | ५३ | ९७ |
| ५. | द्वितीय वर्ष विज्ञान | १७ | ६७ | ८४ |

निकाल

विभागाचे सन २०१८-१९ या वर्षाचे निकाल कौतुकास्पद लागले आहेत.

| अ.नं. | वर्ग | शेकडा निकाल |
|---|---|---|
| १. | प्रथम वर्ष कला | ८७.५०% |
| २. | प्रथम वर्ष वाणिज्य | ९८.७७% |
| ३. | द्वितीय वर्ष कला | ९६.९९% |
| ४. | तृतीय वर्ष कला | ९१.७४% |
| ५. | द्वितीय वर्ष विज्ञान | १००% |

**विभागाच्यावतीने या शैक्षणिक वर्षात –**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृती दिन प्रश्नमंजुषा स्पर्धा, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा १ ते १५ जानेवारी, जागतिक मराठी भाषा दिन दि.२७ फेब्रुवारी २०१९ निर्मिती प्रा.अनिल देशमुख यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

मविप्र दिवगंत सरचिटणीस आमदार डॉ.वसंत पवार स्मृती दिन (प्रेरणा दिन) कार्यक्रमाचे आयोजन, लोकमान्य टिळक जयंती कार्यक्रम आयोजन, राजर्षी शाहू महाराज जयंती कार्यक्रम व म.फुले जयंती कार्यक्रम यांचे आयोजन महाविद्यालयीन स्तरावर केले.

मराठी विभाग प्रमुख प्रा. दिलीप जाधव यांनी या शैक्षणिक वर्षात नॅक मुल्यांकन समिती क्रायटेरीय समन्वयक, वादविवाद मंडळ प्रमुख, सारथ्य नियतकालिक प्रमुख संपादक, परीक्षा समिती सदस्य, सांस्कृतिक मंडळ सदस्य म्हणून काम केले. तसेच वार्षिक पारितोषिक वितर स्पर्धामध्ये काम केले. वर्षभरात कामकाज करत असताना महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.विजय मेधणे सर्व उपप्राचार्य, सर्व प्राध्यापक, कार्यालयीन सेवक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांचे मोलाचे सहकार लाभले. त्याचे मन:पूर्वक आभार मानतो. धन्यवाद.

***

# विद्यापीठ स्तरीय निबंध स्पर्धा

**प्रा. दिलीप जाधव**
स्पर्धा समन्वयक

म.वि.प्र. समाज नाशिक संस्थेच्या श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय देवळाली कॅम्प, नाशिक च्या वतीने प्राचार्य मा.डॉ.विजय मेधणे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया विद्यापीठ स्तरीय निबंध स्पर्धा २०१९-२० संपन्न झाली. त्या स्पर्धेत सध्याची परिस्थिती लक्षात घेवून

१) महात्मा गांधी : एक विचार  २) मी मुलगी नसलेली बरी!  ३) राजकरणातील नैतिकता
४) आपत्तीला जबाबदार कोण?  असे लेखन प्रस्ताव दिले होत.

लेखनासाठी इंगजी, मराठी आणि हिंदी असे तीन भाषांचे विकल्प देण्यात आले होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील २५ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला. त्यात पुढीलप्रमाणे स्पर्धक पारितोषिकाचे ठरले.

| पारितोषिक क्र. | स्पर्धकाचे नाव | महाविद्यालयाचे नाव | निबंधाचा विषय |
|---|---|---|---|
| प्रथम रु. ४००१ | श्रीमती दौंड संगीता संपत | देवळाली कॅम्प, नाशिक | महात्मा गांधी : एक विचार |
| द्वितीय रु. ३००१ | कु. झाडे माधुरी राजेंद्र | कै.बिंदू रामराव देशमुख, नाशिकरोड महाविद्यालय, नाशिक | मी मुलगी नसलेली बरी! |
| तृतीय रु. २००१ | कु.सूर्यवंशी पल्लवी हशिराम | कर्म.शांताराम बापू कोंडाजी वावरे, सिडको महाविद्यालय | आपत्तीला जबाबदार कोण? |

के.टी.एच.एम.महाविद्यालयाचे मराठी विषयाचे प्राध्यापक डॉ. पी.एस.तायडे, डॉ.डी.पी.पवार यांनी परीक्षक म्हणून काम केले. स्पर्धा यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.व्ही.बी.कापडी, डॉ.शशिकांत भोज, प्रा.डी.एस.शिंदे, प्रा.एस.एम.जाधव, प्रा. श्रीमती.एस.डी.आहेर, डॉ.स्वाती सिंग, प्रा.सतीश कावळे, प्रा.एस.डब्लू. पवार आदि प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# हिंदी विभाग

**प्रा.श्रीमती. सविता आहेर**
विभाग प्रमुख

महाविद्यालयात कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतून हिंदी विषय साधारण स्तरावर शिकविला जातो. 'विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास' हे ध्येय ठेऊन त्यांच्यावर साहित्याच्या माध्यमातून चांगले संस्कार व्हावे यासाठी महाविद्यालयात वाङ्मय मंडळ कार्यरत आहे.सन २०१९-२० या वर्षी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन प्रसिद्ध कवयित्री श्रीमती सुरेखा बोऱ्हाड यांचे हस्ते झाले.त्यांनी साहित्याची मानवी जिवनातील भूमिका भाषानिर्मिती, प्रक्रिया,

सामाजिकता व राजकारण, सांस्कृतिक निर्मिती यांचे अनुबंध विशद करत कविता सादर केल्या .

वाङ्मय मंडळातर्गत १४ सप्टेंबर हा हिंदी दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रा.शाम जाधव यांनी हिंदी भाषेचे अनन्यसाधारण महत्व या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच १० जानेवारी विश्व हिंदी दिवस प्रसंगी काव्यवाचन स्पर्धा संपन्न झाली व प्रा.अनिल देशमुख यांनी 'विश्व हिंदी दिवस'ची पार्श्वभूमी सांगत गजल सादर केल्या. वार्षिक गुणगौरव समारंभा निमित्त काव्यवाचन वक्तृत्व आणि निबंध स्पर्धा संपन्न झाली. विभागाच्या वतीने विमालाबेन खिमजी तेजुकाया विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

***

## Department of English

**Dr. Swati Singh**
Head of Department

The Department of English is one of the leading departments of the college, it was established in the year 1984. It offers English subject at special level. Along with the traditional courses the department is keen in running various skill oriented courses and activities. It has a well established language laboratory. The Language Lab. is made available for all students form the college and is being used extensively by the students who have desire to improve their communication skill in English. Audio cassettes on various skills such as listening, speaking reading and writing are used by the students. A proper timing slots have been displayed on the departmental notice board so that maximum number of students can avail the facility.

The faculty from the department is consistently engaged in research activities, Dr. Swati Singh, the head of the department, has published her research papers in reputed journals. She has been working as a coordinator of Dr. MR Jaykar Employability Schemes introduced by SPPU, Pune. She has also worked as a coordinator for the Student Induction Programme. Under her guidance the department of English conducted the three months Soft Skills Development Programme. She is also a member of IQAC of the college. Dr. Kiran Rakibe has published his research papers in the International Journals. He has also worked as a resource person for the National and State Level Seminars. He has delivered lectures at various colleges in and around Nashik district under various schemes introduced by SPPU. He is member of Examination committee of the college and also looks after the preparation of NAAC, IQAR and SSR of the college. Mr. Milind Thakare, the third faculty of the department is the NSS Programme Officer of the college and consistently engages students in various curricular, extra-curricular and co-curricular activities.

Over all the department of English has good contribution in the development of the college.

## इतिहास विभाग

**प्रा.सुधाकर पवार**
विभाग प्रमुख

शैक्षणिक वर्ष २०१९-२० या काळात महाविद्यालयात इतिहास विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी विविध अभ्यासक्रम पूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालय स्थापने पासून इतिहास विषय विशेष स्तरावर शिकविला जातो. विदयार्थी मोठ्या प्रमाणात पानी स्तरावर लिहास विषयाची निवड करतात, म्हणून राज्य देश आणि जागतिक इतिहास जाल व्हावा यासाठी राष्ट्रीय पुरुषांच्या जयंती पुण्यतिथी तसेच राष्ट्रीय प्रसाचानिमित्त विविध व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. ०१ ऑगष्ट रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व आण्णाभाऊ साठे जयंतीचे आयोजन करण्यात आले. लोकमान्य टिळक व आण्णाभाऊ साठे याच्या कार्याचा आढावा व्याख्यानातून विभाग प्रमुख एस.डब्ल्यू.पवार यांनी घेतला. समाजशास्त्र मंडळ उद्घाटन प्रसंगी गडकिल्ल्याचा इतिहास विषयांतर्गत 'रायगडाचे महत्व' या विषयावर प्रा. हेमंत टिळे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

विभागाच्या वतीने इतिहास प्रेमी व विदयार्थ्यांसाठी कालबाहय परंतु संशोधनासाठी उपयुक्त ठरणाच्या य मोडी लिपी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केले. प्रशिक्षक म्हणून पुरातत्व विभाग महाराष्ट्र शासनाने प्रमाणित केलेले प्रशिक्षक श्री. कैलास तांबे यांनी कामकाज पहिले. विभाग प्रमुख प्र.सुधाकार पवार आणि प्रा.आर.आर.सोनवणे यांनी विविध स्तरावरील परिसंवाद व चर्चासत्रास सहभाग नोंदविला. सिडको महाविद्यालय नाशिक येथे दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रास उपस्थित राहून सत्रीय सहभाग नोंदविला. वर्षभर विभागाच्या वतीने विद्यार्थी केंद्रबिंदू मानुन अभ्यासक्रमपुरक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

## राज्यशास्त्र विभाग

**डॉ. व्ही.बी. कापडी**
विभाग प्रमुख

महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१९-२० या काळात विद्यार्थ्यांसाठी विविध पूरक उपक्रम राबवून विद्यार्थ्याचा शैक्षणिक विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

महाविद्यालयाच्या स्थापने पासून 'राज्यशास्त्र' हा विषय विशेष स्तरावर शिकवला जातो. या ही शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात पदवी स्तरावर राज्यशास्त्र या विषयाची निवड केली. मार्च २०१९ विद्यापीठ परीक्षांचे निकाल हे चांगले असून एफ.वाय.बी.ए.- ७१.०९, एस.वाय.बी.ए.-९२%, टी.वाय.बी.ए. १००% असून कु.चंदनशिवे वसुधा राहुल विभागातून प्रथम तर महाविद्यालयातून व्दितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

राज्यशास्र विभागाच्या वतीने महाविद्यालयातं विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रथम सत्रात 'समाजशास्त्र मंडळाचे' उद्घाटन करण्यात आले. यावेळी उद्घाटक व मार्गदर्शक म्हणून मा.डॉ.पी.डी. देवरे उपस्थित होते. विभागाच्या वतीने २६ नोव्हे. 'संविधान दिन, १०

डिसें. 'मानवी हक्क दिन' व '२५ जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिवस' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांना अनुक्रमे डॉ.संजय काळे व्ही.एन.नाईक महाविद्यालय नाशिक, डॉ.प्रशांत देशपांडे एच.पी.टी. महाविद्यालय नाशिक यानी मार्गदर्शन केले. नागरिकांना मतदानाचे महत्व कळावे. त्यांच्यात मतदानाविषयाची जाणीव जागृती निर्माण व्हावी. या दृष्टीने विभागांतर्गत मतदार जागृती फेरीचे आयोजन करण्यात आले. तसेच राज्यशास्त्र विभागाच्या वतीने विशेष स्तरावरिल विद्यार्थ्यांनी स्थानिक ग्रामपंचायत स्तरावर मतदार जाणीव जागृती उपक्रमान्तर्गत 'मतदार सर्वेक्षण' करण्यात आलेत. या वेळी विभागातील विद्यार्थ्यांनी घरो घरी जाऊन मतदारांची नोंद घेतली. विभाग प्रमुख डॉ. विठ्ठलराव कापडी आणि प्रा.सतीश कावळे यांनी विविध स्तरावरील परिसंवाद चर्चासत्रात सहभाग नोंदविला. डॉ. विठ्ठलराव कापड़ी यांनी कोल्हापुर विद्यापीठ येथे चर्चासत्रास उपस्थित राहून शोधनिबंध सादर केला. प्रा.सतीश कावळे यांनी के.एस.इब्लू.सिडको या महाविद्यालयातील चर्चासत्रास उपस्थित राहून शोधनिबंध सादर केला.

वर्षभर विभागाच्या वतीने विद्यार्थी केंद्रबिंदू मानून अभ्यासक्रम पूरक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

***

# भूगोल विभाग

**प्रा.एस.एम. जाधव**
विभाग प्रमुख

महाविद्यालयात भूगोल विषय हा सामान्य स्तरावर (जनरल) शिकविला जातो. महाविद्यालयाबरोबर भूगोल विभाग अद्ययावत असून निकालाची परंपरा देखील उच्चप्रतीची आहे. या विभागातून नवीन अभ्यासक्रमानुसार गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न केले जातात. ११ जुलै रोजी 'जागतिक लोकसंख्या दिन' साजरा करण्यात आला. त्या वेळी प्रा. डी. एम. ढोली यांनी विद्यार्थ्यांना लोकसंख्या विस्फोट या समस्या आणि भारत या विषयावर व्याख्यान दिले. भूगोल विभागाने ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा केला. भूगोल विभागाने २७ सप्टेंबर रोजी 'जागतिक पर्यटन' दिन साजरा केला. त्या दिवशी विद्यार्थ्यांना पर्यटन उद्योगातील व्यवसायाच्या संधी या विषयावर प्रा. पा. पी. सी. गांगुर्डे यांनी व्याख्यान दिले. ४ जानेवारी रोजी भूगोल विभाग प्रमुख प्रा.एस.एम. जाधव यांचे मार्गदर्शना खाली विज्ञान शाखेच्या भूगोल विषयाच्या विद्यार्थ्यांनी विहितगाव गावचे खेडे सर्वेक्षण केले. भूगोल विभागाने १४ जानेवारी रोजी भूगोल दिन साजरा केला. त्या दिवशी विद्यार्थ्यांना भूगोल विभाग प्रमुख प्रा.एस.एम.जाधव यांनी भूगोल दिन व भूगोलाचे महत्व या विषयावर व्याख्यान दिले आणि 'पृथ्वी व माणूस यांचे बदलते नाते' या विषयावर कला शाखा प्रमुख प्रा.एस.के. जाधव यांनी व्याख्यान दिले. तसेच जानेवारी मध्ये एम.एस.जी, महाविद्यालय मालेगाव येथे झालेल्या अभ्यासक्रम पुनर्रचना कार्य शाळेत सहभाग नोंदवला व सूचना नोंदविल्या. महाविद्यालयातील ११ वी व १२ वी कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना प्रा.एस.के. जाधव व प्रा. डी. एम. ढोली वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन करत आहेत व उच्च प्रतीच्या निकालाची परंपरा कायम ठेवण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

***

## अर्थशास्त्र विभाग

**डॉ. एस.के. पगार**
विभाग प्रमुख

शैक्षणिक वर्ष -२०१९-२० मध्ये बी.ए अर्थशास्त्र स्पेशल विषयाचा निकाल ९१.३०% टक्के लागला. व एम.ए अर्थशास्त्र विषयाचा निकाल १०० टक्के लागला. या शैक्षणिक वर्षात एम.ए. अर्थशास्त्र भाग १ व भाग २ या वर्गासाठी कायम संलग्नीकरण मिळाले. या शैक्षणिक वर्षात विभागामार्फत विविध शैक्षणिक कामांचे नियोजन करण्यात आले. अर्थशास्त्र विभागामार्फत दि. ११/०७ २०१९ रोजी जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा.एस.डब्लू.पवार होते. त्यांनी 'जागतिक लोकसंख्या आणि भारत' या विषयावर विद्यार्थी आणि प्राध्यापकांना मार्गदर्शन केले.

विभागामार्फत समाजशास्त्र मंडळाचे उद्घाटन प्रा. हेमंत टिळे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. त्यांनी गडकिल्लयांचे महत्व या विषयावर विद्यार्थी आणि प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. विभागामार्फत "बौद्धीक संपदा हक्क (IPR)" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा दि.२१ जानेवारी २०२० रोजी आयोजीत करण्यात आली. या एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. मृदूला बेळे (नाशिक) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यशाळेत तज्ञ मार्गदर्शक म्हणून ॲड.आसावरी साठे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे संयोजनाचे काम डॉ.मनिषा आहेर यांनी केले. प्रा.डॉ.एस.के.पगार यांनी प्रास्ताविकातून मार्गदर्शन केले. मा.प्राचार्य डॉ.विजय मेधणे कार्यशाळेचे अध्यक्ष होते. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापकांचे सहकार्य लाभले.

अर्थशास्त्र विभागातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.एस.के.पगार यांनी २०१९-२० या शैक्षणिक वर्षात विविध Research Journal मध्ये Balancing Career family, Analysis for Rural Development Grant २०१८-१९, एकात्मिक बालविकास सेवा योजना या विषयांवर संशोधन पेपर प्रकाशित केले. दि.३०/१२/२०१९ रोजी लहवित येथे NSS मध्ये स्वयंरोजगार या विषयावर विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच या शैक्षणिक वर्षात प्रा.डॉ.एस.के.पगार यांच्या मार्गदर्शनानुसार दोन विध्यार्थ्यांनी Ph.D संशोधनाचे काम पूर्ण केले. तसेच या शैक्षणिक वर्षात विद्यापीठाच्या विविध निवड समितीवर त्यांनी काम पाहिले.

डॉ.जयश्री जाधव यांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये दैनिक वृतपत्र देशदूत, लक्ष महाराष्ट्र, दिव्यमराठी मध्ये दर रविवारी लेखमाला अखंडपणे प्रसिद्ध होत आहे. डॉ.जयश्री जाधव यांना मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने ४३ व्या राष्ट्रीय अधिवेशनात सोलापूर येथे वर्तमानपत्रातील प्रसिद्ध लेखाबद्दल सौ.अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार प्राप्त झाला. जनता विद्यालय लहवित येथे दि. ३०/१२/२०१९ रोजी 'यश तुमच्याच हातात' या विषयावर इयत्ता १० वी च्या विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ.मनिषा आहेर यांनी खेडगाव महाविद्यालयात दि.११/०२/२०१९ रोजी बजेट २०१९-२० या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्रांत शोधनिबंध वाचन व प्रसिद्ध केले आहे.

विभागाच्या कामकाजात विभागातील सर्व प्राध्यापक आणि वाणिज्य विभागातील प्राध्यापकांनी सहकार्य केले. तसेच विभागातील कामकाजात मा.प्राचार्य आणि शिक्षकेतर सेवकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

***

# एन.सी.सी.

**प्रा.पी.सी. गांगुर्डे**
एन.सी.सी. प्रमुख

सन २०१९-२०२० हा शैक्षणिक वर्षात १५ जुन २०१९ पासून छात्रसेनेचे नियमित कामकाज सुरू झाले. ०७ जून ते २० जुन २०१९ या कालावधीत योग सराव करण्यात आला व २१ जुन २०१९ रोजी अंतराष्ट्रीय योगा दिवस निमित्त HPT COLLEGE येथे सहभाग नोंदवला. तसेच या शैक्षणिक वर्षात एन.सी.सी. च्या प्रथम वर्षात २२ छात्राना प्रवेश देण्यात आला. दि. १५ ऑगस्ट २०१९ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त छात्रसैनिकांनी संचलन केले व मा. प्राचार्य व प्रमुख पाहुण्यांनी मानवंदना स्वीकारली व मा. प्राचार्यानी सर्व छात्राना एन.सी.सी. ची शपथ दिली.

१९ ऑगस्ट २०१९ रोजी समाजविना निमीत्त सर्व छापानी संचलन केले व प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली. यावर्षी सीनियर अंडर ऑफिसर म्हणून मोजाड संतोष खंडू व ज्युनीयर अंडर ऑफिसर म्हणून गावंडे अनिकेत व गौरी मोजाड यांची निवड करण्यात आली. वर्षभरात ३८ छात्रांनी वार्षिक ट्रेनिंग कॅम्प व ०१ छाप आर्मी ॲटॅचमेंट कॅम्पमध्ये सहभाग घेतला. सन २०१९-२० मध्ये बी व सी प्रमाणपत्र परिक्षेसाठी अनुक्रमे २२ व १६ छात्र प्रविष्ट झाले आहेत. तसेच दि. ३०/१२/२०१९ रोजी मेजर, अमेय कानडे, Artillery Center, देवळाली कॅम्प, यांचे Student Outreach Programme अंतर्गत सैन्यदलामध्ये भरतीचे विविध मार्ग व संधी याबाबत व्याख्यान आयोजित करण्यात आले.

दि. २६ जानेवारी २०२० रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त छात्रसैनिकांनी संचलन केले. या शैक्षणिक वर्षाची विशेष बाब म्हणजे मोरे धिरज या कॅडेटची स्टुडेंट एक्सचेंज कॅम्प CAT 2 पर्यंत निवड झाली. त्याचप्रमाणे ०४ छात्र सैन्यामध्ये भरती झाले आहेत व ४ कॅडेटने आर्मी भरतीची लेखी परीक्षा दिली आहे. ही महाविद्यालयासाठी भूषणावह बाब आहे.

वर्षभराच्या कार्यात छात्रसैनिकांनी वृक्षारोपण, रक्तदान, देवळाली रेल्वे स्टेशन व महाविद्यालय परिसर स्वच्छता, जनजागृती अभियान व इतर समाज सेवा तसेच समाज कार्यात यशस्वी सहभाग घेतला. त्याचप्रमाणे रस्तसुरक्षा सप्ताहामध्ये सर्व छात्रांनी सहभाग नोंदवला. मविप्र मॅरेथॉन मध्ये देखील ३० छात्रांनी स्वयंसेवक म्हणून काम केले.

वर्षभराच्या कामकाजात प्राचार्य, उपप्राचार्य, कार्यालयीन सेवक वर्ग, कमांडिंग ऑफिसर व ७ महाराष्ट्र बटालियन एन. सी. सी. नाशिक यांचे सहकार्य लाभले.

***

# राष्ट्रीय सेवा योजना

**प्रा.एम.जी. ठाकरे**
(कार्यक्रम अधिकारी)

**※ दैनंदिन कार्यक्रम अहवाल ※**

१) दिनांक २७ डिसेंबर २०१९ – सकाळी ठिक १०.३० वाजता कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी मा. माणिकराव माधवराव बोरसे सभापती, म.वि.प्र . समाज व मा.सचिन पंडितराव पिंगळे कार्यकारिणी सदस्य, म.वि.प्र. समाज, नाशिक यांच्या उपस्थितीत व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. आचार्य रामकृष्णदास महाराज लहवितकर यांच्या हस्ते विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर उद्‌घाटन समारंभ संपन्न झाला. त्यानंतर सर्व स्वयंसेवकांनी भोजन केले सर्व स्वयंसेवकांचे गट करुन त्यांच्या पसंतीनुसार गटाला नावे दिली व ७ दिवसांच्या कामाचे नियोजन केले.

२) दिनांक २८ डिसेंबर २०१९–सकाळी ०६.०० ते ०७.३० वाजेपर्यंत योगा व प्रार्थना घेतली. ०७.३० ते ०८.३० चहा व अल्पोपहार स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी घेतला. ०८.३० ते १२.३० या वेळेत डॉ. आचार्य रामकृष्णदास महाराज लहवितकर यांच्या कुटीया स्थळी जाऊन सर्व स्वयंसेवकांनी मंदिराच्या परिसरातील वृक्षांची आळी खोढुन आळयांना विटांची मांडणी केली, तसेच भिंतीच्या कडेने असलेले मुरुमांचे ढिग पसरविले व मंदिराच्या आजुबाजुचा परिसर स्वच्छ केला. महाराजांनी विद्यार्थ्यांना सर्वधर्मसमभावाची शिकवण दिली व दोन विद्यार्थ्यांनी अथर्वशीर्ष व गितेचा अध्याय सादर केला. दुपारी ०३.०० ते ०५.०० या वेळेत प्रा. सुहास फरांदे सरांनी एन.एस.एस. व मुल्यशिक्षण य या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. तसेच श्री. विलास देवळे यांनी 'ग्राहक संरक्षण कायदा' या विषयावर मार्गदर्शन केले.

३) दिनांक २९ डिसेंबर २०१९ – सकाळी नेहमीप्रमाणे योगा व प्रार्थना करुन चहा व प्रार्थना करुन चहा व अल्पोपहार घेतला. ०८.३० ते १२.३० या वेळेत रेल्वेगेटपासुन ते शाळेपर्यंत रस्त्यावरील मुरुमाचे ढिग, खडयांमध्ये पसरविले. १२.३० ते ०३.०० या वेळेत भोजन व विश्रांती घेतली. दुपारी ०३.०० ते ०४.०० या वेळेत प्रा. ज्ञानेश्वर ढगे यांनी 'संविधान लोकशाहीचा मजबुत आधार' या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी आपल्या व्याख्यानात मानवी जीवनात सकारात्मक दृष्टिकोनाची आवश्यकता असल्याचे सांगितले.

४) दिनांक ३० डिसेंबर २०१९ – सकाळी नेहमीप्रमाणे योगा, प्रार्थना, चहा व अल्पोपहार घेतला. ०८.३० ते १२.३० यावेळेत गावातील पाण्याची टाकी व परिसरातील प्लॅस्टिक कचरा स्वच्छता मोहीम राबविली. दोन गटांनी राहुरी या ठिकाणी उन्नत भारत निमित्ताने सर्वेक्षण केले. सकाळी १०.०० ते ०३.०० या वेळेत डॉ. वसंतराव पवार वैद्यकिय महाविद्यालय, नाशिक यांच्या पथकाने आरोग्य तपासणी शिबीर घेतले, यामध्ये नेत्र तपासणी, रक्त तपासणी, हृदयविकार तपासणी केली त्यात गावातील व परिसरातील १८० लोकांनी शिबीर सेवेचा लाभ घेतला. स्वयंसेवकांनी गावात फिरुन वृद्ध लोकांना शिबीरापर्यंत पोहचविण्याचे काम केले. ०३.०० ते ०५.०० या वेळेत डॉ.एस.के.पगार यांनी स्वयंरोजगार या विषयावर मार्गदर्शन केले. ३८ इसीजी केले व ३० रुग्णांना वैद्यकिय महाविद्यालयात पुढील उपचारासाठी बोलविले .

५) दिनांक ३१ डिसेंबर २०१९ – सकाळी नेहमीप्रमाणे योगा, प्रार्थना, चहा, अल्पोपहार घेतला. सकाळी ०८.३० ते १२.३० या वेळेत बाजगिरा येथे राधाकृष्ण मंदिर परिसर व गावातील परिसर स्वच्छ केला. तसेच शाळेतील व ग्रामपंचायत परिसरातील झाडांना गेरु व चुना लावला.

दुपारी ०३.०० ते ०५.०० या वेळेत प्रा.श्रीमती आशा लांडगे यांनी गांधी विचार या विषयावर व्याख्यान दिले. सकाळी ०९.३० ते ०३.०० यावेळेत निलवसंत फाउंडेशन अंतर्गत नेत्रतपासणी करुन चष्म्यांचे वाटप केले त्यत १३४ लोकांनी सेवेचा लाभ घेतला. व मोतीबिंदु उपचारासाठी १० लोकांना बोलविण्यात आले.

६) दिनांक ०१ जानेवारी २०२०- सकाळी नेहमीप्रमाणे योगा, प्रार्थना, चहा व अल्पोपहार घेतला. ०८.३० ते १०.३० या वेळेत शाळेचा परिसर स्वच्छ केला. सकाळी १०.३० ते १२.४५ या वेळेत गावातुन जनजागृती फेरी काढण्यात आली. स्वयंसेवकांनी गावकऱ्यांशी हितगुज करत जलसुरक्षा, वनसंरक्षण, स्वच्छता, प्लॅस्टिक बंदी, मुलींची सुरक्षा या विषयावर घोषणा दिल्या, तसेच स्वयंसेवकांनी ठिकठिकाणी निर्भया - सुरक्षा या विषयावर पथनाटय सादर केले.

७) दिनांक ०२ जानेवारी २०२० - सकाळी नेहमीप्रमाणे योगा, प्रार्थना, चहा व अल्पोपहार घेतला. ०८.३० ते ११.०० या वेळेत गावातील पशुधनाचा सर्वेक्षण केले. यानंतर विशेष श्रमसंस्कार शिबीराचा समारोप कार्यक्रम पार पाडला. यासाठी प्रमुख पाहुने मा.खातळे साहेब व कॉलेजचे प्राचार्य डॉ.विजय मेधणे, उपप्राचार्य कापडीसर,कार्यक्रम अधिकारी प्रा. मिलिंद ठाकरे, प्रा.श्रीमती सविता आहेर, प्रा. विजय गायकवाड, प्रा.देवराम ढोली शिंदेसर, संधानसर, जाधवसर व पटेल सर उपस्थित होते.

## NSS Regular Activites

21th June 2019 : International Yoga Day

11th Jully : Tobacco Addiction Liberation Pledge

15th Jully : Blood donation Camp

19th Jully : Tree Plantation at Lahvit 1200 trees

30th Jully : Free DENTAL Checkup Camp

01th August : Tree Plantation at College Premises

26th August : AIDS / HIV awareness Programme

29th August : Fit India Campaign

03 September : Cleanliness Drive at Deolali Railway Station

05th September :Organ donation Programme

12th September : Ganpati Idol Collection

24th September:NSS Orientation Programme

02th October : Water Reservior Cleanliness at Waldevi River

25th November : Sanvidhaan Din

01th December : AIDS / HIV Awareness Rally, Red Ribbon Club

07th December : No Single Plastic Use Campaign

27thDec to 02 Jan.2020 : Special Winter Camping at Lahvit

12th Jan 2020 : Swami Vivekananda Birth Anniversary Celebration , Youth Week , Swami Vivekananda Portrait Competetion .

24th Jan 2020 : National Girl Child Day Celebration

25th Jan 2020:National Voter Day Celebration

# कलामंडळ अहवाल

**डॉ. जयश्री पं.जाधव**
कलामंडळ प्रमुख

शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० चा कलामंडळाचा वार्षिक अहवाल सादर करताना विशेष आनंद होत आहे. कलामंडळाने या वर्षी विविध सांस्कृतिक कार्यक्रमात विशेष सहभाग नोंदविला आहे.

* दि. २७ /०९ / २०१९ रोजी महाराष्ट्र शासन मराठी विज्ञान परिषद मुंबई आयोजित राज्यस्तरीय विज्ञान एकांकिका स्पर्धेत डॉ.जयश्री जाधव लिखीत 'जिज्ञासा' एकांकिका महाविद्यालयातील एकुण १२ विद्यार्थ्यांनी सादर केली. एकांकिका व्दितीय क्रमांकाचे पारितोषिक अभिनेता श्री.विजय पाटकर यांच्या हस्ते कुसूमाग्रज नाशिक येथे प्राप्त झाले.

* दि. २/१०/२०२० रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधीच्या १५० व्या जयंती निमित्ताने भारत सरकार सूचना एवं प्रसारण मंत्रालय क्षेत्रीय लोकसंपर्क ब्युरो आयोजित गांधी उत्सव पथनाटय स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने सहभाग घेतला. पथनाटय लेखन डॉ.जयश्री जाधव यांनी केले.

* दैनिक वृतपत्र लोकसत्ता आयोजित राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन मराठी एकांकिका स्पर्धा २०१९ मध्ये महाविद्यालय संघाने 'निशस्त्र योध्दा' एकांकिका सादर केली.

* दि.११/१०/२०१९ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे आयोजित युवक महोत्सव इंद्रधनुष्य स्पर्धेत नाशिक के.टी.एच.एम. कॉलेजमध्ये विभागीय पातळीवर एकांकिका, मुकनाटय, लघुनाटय, तालवाद्य, लोकनृत्य, सुगमसंगित, शास्त्रीय गायन, कोलाज, वकृत्व, समुहगीत. **विविध कलाप्रकारात सहभाग घेतला एकुण पाच कला प्रकाराची विद्यापीठ स्तरावर निवड झाली.**

* दि. ०५,०६ नोव्हेंबर २०१९ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे युवक महोत्सव विद्यापीठ स्तरीय स्पर्धेत पाच प्रकारात एकुण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

* दि.१२ व १३ डिसेंबर २०१ ९ रोजी म.वि.प्र.युवास्पंदन स्पर्धा २०१९-२० प्राथमिक फेरीत महाविद्यालयाने सर्व १४ कलाप्रकारात वरिष्ठ व कनिष्ठ गटातून एकुण १८ संघ सहभागी झाले. त्यापैकी १७ संघानी बक्षिस प्राप्त केली. अंतिम फेरीसाठी १० संघानी प्रथम क्रमांक मिळवून यश प्राप्त केले. महाविद्यालयातील ६० विद्यार्थी सहभागी झाले होते.

